१९५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ५५५
REFBK-0008203

# राजगड

लेखक

बाबासाहेब पुरंदरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
(203
ग्रं. क्र.
REFBK-0008203

जोशी ब्रद[illegible] ड पब्लिशर्स
[illegible] पुणे २

मूल्य दीड रुपया

प्रथमावृत्ति जानेवारी १९५४

प्रकाशिका :
श्री. सौ. निर्मलाबाई पुरंदरे
२४ पर्वती, पुरंदरे वाडा,
राजहंस प्रकाशन,
पुणें २

● ● ●

मुखपृष्ठ : श्री. दीनानाथ दलाल

● ● ●

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २

आमच्या भगिनी

**ती. श्री. सौ. इंदिराबाई ठकार**

आणि आमचे मेव्हणे

**ती. श्री. विठ्ठलराव नारायण ठकार**

यांसी सादर अर्पण.


अनुक्रम ..........
विभाग
क्र
नों. दि.

## ★ अनुक्रम


- देवडी
- टांच मारण्यापूर्वी
- दिल्लीच्या लाल किल्ल्यांत
- नवाब शाहिस्ताखान
- किल्ले चाकण
- पन्हाळा आणि चाकण
- फिरंगोजी नरसाळा
- उंबरखिंड
- जंजिऱ्याचा सिद्दी
- बाळाजी आवजी
- संगमेश्वर
- झडप

## शिवचरित्र-मालेंतील पुस्तकें :

**विक्रीस तयार :**

- लाल महाल
- प्रतापगड
- पन्हाळगड
- राजगड

> रा ज ग ड ह्या पुस्तकाचें प्रकाशन गुरुवर्य प्राध्यापक डॉ. के. ना. वाटवे यांचे हस्तें पुणें येथें स. प. महाविद्यालयांत झालें.

**आगामी :**

- पुरंधर
- आग्र्याच्या किल्ल्यांत
- सिंहगड
- राज्याभिषेक
- सज्जनगड
- रायगड

## देवडी !

मकर संक्रान्त. निसर्गातील सर्व चराचर वस्तुमात्रांत संक्रमणास सुरुवात होणार. मग 'मराठी वाङ्मय मंडळ' तरी त्याला अपवाद कसें ठरेल ! तेंहि आज संक्रमण करीत आहे. सर परशुरामभाऊ महाविद्यालयांतील वाङ्मयप्रेमी लोकांनीं इ. स. १९२२ सालीं म. म. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखालीं 'मराठी वाङ्मय मंडळाची' स्थापना केली. या मंडळांतून अनेक नामवंत लेखक, कवि अन् टीकाकार उदय पावले. मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीनें एक-दोन प्रकाशनेंहि झालीं आहेत. आज पुन्हां कांहीं वर्षांनीं वाङ्मय-मंडळास स्वतःच्याच सभासदांच्या लेखनकृतीचा पुरस्कार करण्याचा 'सोनियाचा दिवस' उगवला.

श्री. ब. मो. पुरंदरे हे मराठी वाङ्मय-मंडळाचे खऱ्या अर्थानें क्रियाशील सभासद आहेत. वाङ्मयाचा प्रभाव सर्वत्र पसरविण्यासाठीं ते सातत्यानें झगडत आहेत. त्यांच्या लेखणींत ती तजस्विता आहे. त्या लेखणींतील 'जाळत्या ठिणग्यांनीं 'महाराष्ट्रांतील वाचकांना चेतविलें. 'मुजऱ्याच्या मानकऱ्यांचा' दरबार त्यांच्याच लेखणीनें सुशोभित केला. 'दख्खनची दौलत' जतन करण्याची तश्रीफ त्यांनीं दोनदां दिली. त्याच लेखणीने आतां एका मागून एक बाका बुलंद आणि मोहरेदार गड सर करण्याची मोहीम आंखलेली आहे. 'प्रतापगड' व 'पन्हाळगड' सर केलेलेच आहेत. आज 'राजगडा'वरील जयमंगल वाद्यें नाद घुमवीत आहेत.

या लिखाणांत इतिहास तर आहेच, पण त्यांत खरा जातिवंत महाराष्ट्र दिसतो. मनाचें समाधान होतें त्या दर्शनानें ! त्यांतील कथांना तंत्राच्या चौकटींत बसवून त्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहणें मला तरी पसंत नाहीं. 'मला माझा महाराष्ट्र मिळाला यांतच समाधान आहे,' असेच उद्‌गार रसिक काढील यांत वाद नाहीं.

१४ जानेवारी १९५४
पुणें

**प्रभाकर बोधनी**
कार्यवाह, मराठी-वाङ्मय मंडळ
(स. प. महाविद्यालय पुणें.)

# टांच मारण्यापूर्वी

राज्य आणि विद्या कष्टाशिवाय साध्य होत नाहीं. तेथें परिश्रमांची पराकाष्ठा करावी लागते. मग वाटेंत संकटांचें कडे कोसळोत, अडचणींच्या दऱ्या आडव्या येवोंत वा मोहाचे मदन मोहरोत. महाराज छत्रपति शिवाजीराजांनीं असंख्य संकटांचा उपभोग घेत घेत राज्य स्थापिलें. सद्धर्म आणि सुसंस्कृति त्यामुळेंच जगली. स्वाभिमानावर आणि महत्त्वाकांक्षांवर त्यामुळेंच फुंकर पडली. पराक्रमाचा स्फुलिंग त्यामुळेंच फुलला. त्यागाची हौस आणि निष्ठेची चटक त्यामुळेंच लागली. आणि त्यामुळेंच रायगडावर रत्नजडित सुवर्णाचं स्वतंत्र सिंहासन प्रभा पसरवीत प्रकटलं.

हें सर्व घडविणारा तो महापुरुष आमच्यांतच जन्मला होता. आम्ही आजहि जर त्या महापुरुषाच्या सांवलीमागून गेलों तर सद्धर्माचें, सुसंस्कृतिचें आणि स्वदेशाचेंच काय, पण मानवतेचेंच वज्रदेही संरक्षक बनूं शकणार नाहीं का? पण शहाणपण शिकायची आमच्यांत चालच नाहीं! आम्ही फक्त ह्या महापुरुषाचीं मंदिरें उभारतों, पालख्या मिरवतो, जयजयकार करतों! त्या महापुरुषाला आम्ही माणसांतून उठवून देवळांत नेऊन कोंडलं आहे. गुरव बनलों आहोंत फक्त आम्ही त्याचे!

आमच्या देशांत जन्मलेल्या महापुरुषांचा उपयोग फक्त शिल्पकारांनाच व्हावा काय? गल्ली-बोळांत पुतळे! चौका-चौकांत पुतळे! छत्रपति शिवाजीराजांच्या स्मारकांना तर काय तोटा? धान्य दळणाऱ्या गिरणीपासून तों भजी विकणाऱ्या हॉटेलपर्यंत! खरोखरच शिवरायाचं स्मारक करायला आणि त्यांची मूर्ति स्थापायला एकच योग्य जागा! कोणती?— अंतःकरण! ना लाल किल्ल्यांतील औरंगझेबाचें सिंहासन, ना हिमालयाचे अत्युत्तुंग गौरीशंकर. बस्स! जास्त काय सांगूं?

तारुण्याकडे पावलें टाकीत निघालेल्या बाल युवकांच्या उमलत्या अंतःकरणांत शिरून मृदु-संथ स्वरांत शिवस्तोत्र म्हणत म्हणत अगदीं अलगद राजे शिवराय छत्रपतींची मूर्ति नेऊन ठेवावी याकरितां मी ही वाङ्मयीन

वाटचाल करीत आहें. यश येईल काय ? श्रेय मुळींच नको. परिणाम मात्र दिसावा ही तहान आहे. माझ्यासारख्या रायगडच्या व्रतस्थ वारकऱ्याला दुसरं काय हवंय् ?

कथारूप शिवचरित्राचा हा चौथा भाग आहे. हा सत्य इतिहास आहे. फक्त लक्षांत ठेवणं आवश्यक आहे कीं हा गोष्टीरूपानं सांगितलेला इतिहास आहे. संवाद व वर्णनें अस्सल ऐतिहासिक साधनांतून जशींच्या तशीं मीं घेतलीं आहेत. जेथें तशी तीं उपलब्ध नाहींत तेथें सत्याच्या व भौगोलिक वस्तुस्थितीच्या अनुरोधानें व संयम राखून केली आहेत, तरी हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हा कथारूप इतिहास आहे; शास्त्रशुद्ध, कांटेकोर इतिहास नव्हे. आख्यायिकांचा उपयोग केलाच असेल तर तसा स्पष्ट उल्लेख आधारांत मी केला आहे. आधार सर्वत्र दिले आहेत. तसेच ऐतिहासिक सत्याबरोबरच ऐतिहातिक संस्कृतीचे स्वरूपही दाखविण्याचा मीं प्रयत्न केला आहे.

उपलब्ध असलेली ऐतिहासिक साधनें व लहानसान स्थळें मीं स्वतः पाहण्याची दक्षता घेतली आहे. त्यांतून उणीव व दोष दृष्टोत्पत्तीस आल्यास आपण निर्भीडपणें कृपा करून कळवावेत. मी अत्यंत कृतज्ञ राहीन.

आणखी एक खुलासा करणें आवश्यक आहे. प्रत्येक पानावर मधून मधून जे आंकडे घातलेले आहेत ते आधारभूत ग्रंथ पाहाण्याकरितां आहेत. ह्या आंकड्यांचे संकलन प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस 'आधारां'त केलेलें आहे.

बहुत काय लिहावें ! आमचें अगत्य असो द्यावें, विज्ञापना.

श्रीशिवराज्याभिषेक शके २८०
मकर संक्रमण,
१४ जानेवारी १९५४

**बाबासाहेब पुरंदरे**
२४ पर्वती, पुरंदरे वाडा.
पुणें २.

मराठी ... (८२०३) ग्रा. १ ... अनुक्रमांक

# १ दिल्लीच्या लाल किल्ल्यांत

" बाआदब बामुलाहिजा होशिया ऽ ऽ ऽ र ! "

पहाडी आवाजांत गुर्झबारदारानें ललकारी दिली. किल्ल्यांतल्या शाही महाला-महालांतून त्या ललकारीचे प्रतिध्वनी उमटत उमटत गेले. लगेच प्रत्येकाची गर्दन कुर्निसाताकरितां खाली झुकली.

दिवाण-ई-खासच्या संगमरवरी सदरेवर बादशाही मसनदीच्या नजीक उभा राहून गुर्झबारदार बादशाहाचा अल्काब पुकारीत होता. हातभर उंचीचा पांढरा शुभ्र संगमरवरी नक्षीदार विशाल चौरंग होता. त्यावर कीनखाफी रुजामा अंथरला होता. त्यावर पराची दीड वीत उंचीची मसनद होती. त्यावर हिरवी हिरवी गार मखमल, तिच्यावर जरीचं भरगच्च कशीदकाम केलेलं, आणि तसल्याच किंमतवान कशीद्याचे मखमली लोड अन् गिरद्या वर व्यवस्थित ठेवलेल्या. सबंध दिवाण–ई–खासमध्ये अफगाणी गालिचे अंथरलेले होते. कमानींना रेशमाच्या झालरदार कनाती व पडदे लावले होते. पडदे खेंचण्याकरितां लावलेल्या रेशमी पीळदार दोऱ्या अन् झुपकेदार गोंडे कमानींवर हालत होते. मोंगल दरबारचे खास खास मातबर अमीरच फक्त सदरेवर उभे होते. हीच मजलीस–ए–खास.

दिवाण–ई–खासच्या नजीकच असलेल्या बादशाही हमामखान्याच्या कमानीबाहेर दोन काळेकुट्ट धिप्पाड हबशी गुलाम गालिचाची एक मोठी थोरली वळकटी हातांत धरून उभे होते. हमामखान्यांतून अस्सल इराणी अत्तरांचा घमघमाट दरवळत बाहेर येत होता. वाऱ्याच्या झुळकीनें गुलाब-पाण्याचा खूशबूही त्यांत मिसळत होता. चंदनाच्या धुराची वलयें हवेत तरंगत तरंगत बाहेर येत होती.

गुर्झबारदाराच्या ललकाऱ्या सुरू होतांच दूरवर असलेल्या नगारखान्यांत नौबत व कर्णे वाजू लागले. दिवाण–ई–खासच्या सदरेवर हजर असलेले अमीर अन् वजीर अदबीनें कुर्निसात करीत उभे राहिले.

सर्र्र्र्र्र्र ! हमामखान्याबाहेर उभे असलेल्या त्या दोघा हबशी गुलामांनी आपल्या हातातील गालिचाची गुंडाळी सर्रकन सोडली. तो शानदार सप्तरंगी रेशमी गालिचा हमामखान्यापुढच्या संगमरवरी शुभ्र फरसबंदीवर पाण्याच्या लाटेप्रमाणें शंमर हात उलगडत गेला. सूर्याच्या कोवळ्या किरणांत ते काश्मीरचे रेशमी सप्तरंग झगमगूं लागले. गालिचाचं शेवटचं टोक दिवाण-ई-खासच्या पायरीशी अचूक जाऊन भिडलं. ते गुलाम आपले हात पोटापाशीं रुमालांत झाकून घेऊन अन् माना खाली घालून मागें मागें सरकत गेले.

“ ऑऽऽस्ते कदम ! नजरबर्कदम ! हुकुमते–हिंदोस्ताँ ! खास–उल–खास ! शहेनशाह आलमगीऽऽर ! ऑऽस्ते कदम ! ऑऽऽस्ते कदम ! ” गुर्झबारदार मसनदी शेजारून अल्काब पुकारीत होता.

हमामखान्याच्या कमानीवरचा झिरझिरीत पडदा बाजूला झाला आणि शहेनशाह औरंगझेब हमामखान्यांतून बाहेर पडला. गालिचावरून झप झप चालत तो दिवाण-ई-खासकडे निघाला. त्याचा पोशाख अगदी पांढरा-शुभ्र होता. अंगावर हिऱ्या-मोत्यांचे अलंकार मोजके होते. औरंगझेबाची रहाणी नेहमीच अगदी साधी असे. त्याच्या उजव्या हातात स्फटिकाची जप-माळ होती. माळेचे मणी ओढीत ओढीत तो पुटपुटत होता, “ रब्बना, रब्बना, रब्बना, रब्बना—! ”

अमिरांचे कुर्निसात चालूच होते. गुर्झबारदाराच्या ललकाऱ्याही चालूच होत्या. बादशाह पायऱ्या चढून गेला व खासमध्यें प्रवेशला. समोरच चौरंगावर मसनद होती. मसनदीवर लोडाशी टेकून तो बसला. तो बसतांच अल्काबच्या ललकाऱ्या थांबल्या. ललकाऱ्या थांबतांच नौबद-कर्णेही बंद झाले. उभ्या गुडघ्यावर हात ठेऊन बादशाहाची जपमाळ चालू झाली.

अमिरांनीं बादशहास नजर गुजारली. मसनदीच्या उजव्या बाजूस वजीर उभा होता. त्याच्याच शेजारी अर्जबेगी उभा होता. अर्जबेगीच्या हातांत पत्रांच्या व अर्जांच्या थैल्या होत्या. सदरेवर अत्यंत शांतता पसरली होती. औरंगझेबाची शिस्त आणि दरारा मोठा कडक असे. उगीच कारणाशिवाय पापणीही हलवायचं धारिष्ट कोणाला होत नसे ! मग बोलणं अन् हंसणं तर अशक्यच. शिंक आली तरी आंतल्या आंत शिंकायचं !

सर्वांनीं सत्का नजर केला अन् नंतर वजीर आदबीनें म्हणाला, " जिल्ले सुब्हानी आलीजाह ! अपनी निगाहे–मुलतेफत इस फिदवीकी अर्जे–नाचीजकी जानीब मुतवज्जा फरमाएं, ऐसी खिदमते–अकदसमें मोअद्बाना इल्तेमास है * ! "

" कहो ! माबदौलत अपनी नजरे–करम् फेरते हूए तुम्हारे हर लफ्जकी गहराईपर अपनी तवज्जह मरकूज कर लेंगे ! "× औरंगझेब म्हणाला.

लगेच मान लवऊन वजीर म्हणाला, " हुजूरकी नजरे–इनायत दुनियाके लिये आगोशे–मादरसे कम नहीं ! "+

आणि एवढं बोलून वजिराने अर्जांची एक गुंडाळी उलगडली. ह्या अर्जाच्या वरच्या व खालच्या बाजूस चंदनाचे नक्षीदार रूळ बसविलेले होते आणि वरच्या दोन्ही टोकांस रेशमांचे गोंडे लावलेले होते. अर्जाच्या कागदावर सोनेरी वर्खानें फुलदार बुट्टी काढलेली होती व काळ्याभोर चमकदार शाईत व घोटीव अक्षरांत फार्सी मजकूर कलम केलेला होता.

" जिल्ले इलाही आलम पनाह् ! यह अर्ज दख्खनके दारूस्सलतनत बीजापूरके आदिलशाहकी जानिबसे आया है ! अली आदिलशाहने खुदावंदकी मुकद्दस खिदमते–आलीमे बडीही आजजीके साथ इल्तेजा की है ! " वजीर म्हणाला.

" क्या कहना है आदिलखानका ? " बादशहानें किंचित् हंसून तिरप्या नजरेनें पहात विचारलें. विजापूरच्या बादशहाला ' बादशाह ' किंवा आदिल ' शाह ' ह्या गौरवपर नांवानें उल्लेखणें औरंगजेबास आवडत नसे. म्हणून तो आदिलशाहास ' आदिलखान ' याच[१] नांवानें नेहमीं उल्लेखी.

---

* " हुजुरची कृपा ह्या नम्र सेवकाच्या बोलण्याकडे वळावी अशी ह्या दासाची अत्यंत नम्र विनंति आहे ! "

× " बोला ! आम्ही पूर्ण कृपादृष्टि ठेऊन तुमचे सर्व कामकाज ऐकूं ! "

+ " हुजूरची कृपा खरोखर ह्या जगावर मातृछायेप्रमाणेंच आहे ! त्यांत उणीव नाहीं ! "

" जिल्लल्ला ! अली आदिलशाहनें अपनी चालीस हजार फौज बतौरे–इमदाद हमराह देकर सलाबतखान सिद्दी जौहर और फाजलखान जैसे दो मशहूर सरदारोंको शिवाजीपर चढाईके लिये रवाना किया है ! अली आदिलशाहकी दिली तमन्ना है, और साथही कवी उम्मीद है के शिवाजी और कुल मराठोंकी धज्जियाँ उडा कर उनकी बगावतको जड पेडसे उखेड कर फेंक दिया जाय ! और इस् जबरदस्त इकदाममें हुजूरे–अक्दस भी इमदादसे सरफराज फरमाएं ऐसी अली आदिलशाहने इल्तेजा की है ! " वजिराने आदिलशाहाच्या अर्जातील मजकूर सारांशानें तोंडीं सांगितला. [२]

अफझलखानाच्या वधानंतर शिवाजीमहाराजांनीं वांईपासून पन्हाळगडापर्यंतचा सर्व मुलुख व किल्ले काबीज केले. लगेच विजापूर दरबारनें रुस्तुमेजमानला महाराजांवर फौजेसह रवाना केलें. परंतु त्याचाही महाराजांनीं साफ धुव्वा उडविला. [३] आतां मात्र विजापूर दरबार भयंकर हादरला अन् त्याहूनहि भयंकर चिडला. शिवाजीचा नाश करून दख्खनच्या पहाडी मुलुखांतून ह्या मराठ्यांच्या काफिरी दौलतीचा कायमचा सफा नायनाट करण्याचा मुस्तकीम इरादा आदिलशाहानें मनांत धरला. कर्नूलचा नवाब सलाबतखान सिद्दीजौहर व अफजलखानाचा मुलगा फाजलखान या दोघांस चाळीस हजार फौजेसह विजापुराहून बादशाहानें रवाना केलें. [४] आणि लगेच दिल्लीस औरंगझेबाकडे विनंती अर्जाच्या थैल्या देऊन सांडणी-स्वार तडकातडक पिटाळले. या अर्जात अली आदिलशाहानें औरंगझेबास अत्यंत आग्रहाची विनंती केली कीं मी, शिवाजीची नांवनिशाणी ह्या जगातून नाहींशीं करण्यांकरितां चाळीस हजार फौज शिवाजीवर पाठवीत आहे; [५] तुम्हीही जास्त पायदळ, घोडदळ, तोफखाना व तमाम शाही सरंजाम आमच्या मदतीस पाठवा. [६] किंवा अगदीं स्वतंत्रपणें एखादा हुन्नरबाज, तब्रेज, समशेरजंग सरदार शिवाजीवर परस्पर रवाना करा, [७] म्हणजे तुमच्या व आमच्या फौजांच्या चरकांत शिवाजीसकट त्याचे सारे हरामखोर साथीदार चिरडून भरडून जातील ! दख्खनच्या पहाडांत मराठ्यांचं स्वतंत्र तख्त निर्माण होऊं पहात आहे. ही गोष्ट इस्लामला कमीपणा आणणारी आहे.

" ......इस लिये इस् मुहीमपर कोई बा–हिम्मत, दिलेर, वाकिफे–

फने-अरब, तजरूबेकार सरदारको भेजा जाय ताके मराठोंकी और शिवाजीकी कुव्वत बीखो बुनयादसे उखड जाय !— ”

वजिरानें अर्ज वाचून पुरा केला आणि मान लवविली.

औरंगझेबाचे उग्र पिंगट डोळे त्या अर्जाकडे स्थिरावले. माळेचे मणी ओढणारी बोटें थांबली. त्याच्या डोक्यांत विचार सुरु झाले. वजीर अर्जाची गुंडाळी करीत होता.

......कोहस्तानें-दकनमें मराठोंकी खुद मुख्तार सल्तनतकी बुनयाद डाली जा रही है, यह बात हमारे लिये बाइसे-शर्म है ! लिहाजा हम और अलीजाह मिलकर शिवाजीको मआ अहलो अयाल दफ्न कर डालें !—अर्जातील ह्या ओळी औरंगझेबाच्या महत्त्वाकांक्षा फुलवीत फुलवीत वळकटीत लपल्या. त्याच्या माळेचे मणी पुन्हां झर झर झर सरकूं लागले. तीक्ष्ण धारेंत शून्य नजर रोखून तो विचारांत गढून गेला. माळेतील झरझरणारे मणी एकेका मोंगली डावपेंचाचे होते. मण्यागणीक खुदाचें नांव ओठावर यायच्या ऐवजी शिवाजीचंच नांव येत होतं !

आणि औरंगझेबाची मान एकदम वळली, “ वजिरे आझम ! ”

“ आलमपनाह-- ! ”

“ तुम्हारी सलाह क्या है ? ”

“ आलमपनाह ! नाचीजकी अकले-नाकारा गोया सूरजके आगे चिरागके मिस्ल है ! फिरभी मेरीं अकले-नाचीज यह कहती है के बागी शिवाजीको अपनी ताकतसे खाको खूनमें मिलानेका यहीं जरींन मौका है ! हुजूरके सिर्फ मुतवज्जह होनेकी देर है ! * ” वजीर म्हणाला.

“ बस् बस् बस् ! हमाराभी यही खयाल हैं ! उस सरकश हरामखोर पापी बदमाश शिवाजीको जहन्नम रसीद करनेका यही मौजूं मौका है ! ”

---

* “ आलमपनाह ! ह्या दासाची बुद्धी आपल्यापुढें सामान्यच आहे. सूर्यापुढें पणतीची ऐट ती काय ? तरीही माझ्या सामान्य बुद्धीलाही असेंच वाटतें कीं बंडखोर शिवाजीस मातीस मिळविण्यास हीच संधी योग्य आहे ! हुजूरनी फक्त मनांत आणायचाच अवकाश आहे ! ”

औरंगझेब म्हणाला त्याच्या त्या जन्मजात खुनशी चेहऱ्यावर भयानक स्मित झळकलें.

तीन वर्षांपूर्वी महाराजांनीं जुन्नरचं मोंगली ठाणं साफ लुटलं होतं.[७] ( ता. ३० एप्रिल १६५७ ) अहमदनगरवरही छापा घातला होता.[८] ( ता. ४ जून १६५७ ) महाराजांनी ह्या दोन्ही छाप्यांत मिळून शेंकडों घोडे, कापड-चोपड, जडजवाहीर व सुमारे चाळीस लाख रुपये, एवढी दौलत पळविली होती. औरंगझेब त्या वेळी भयंकर चिडला होता. औरंगझेबाचा त्या वेळी औरंगाबादेस मुक्काम होता. महाराजांचा समूळ नाश करण्याचा त्याचा मनसूबा होता. परंतु आकस्मिकपणें त्याचा बाप शाहजहान आजारी पडल्यामुळें राज्य बळकावण्याकरिता घाईघाईनें त्याला दिल्लीस जावं लागलं आणि महाराजांचा नायनाट करण्याचा बेत अपुराच राहिला.

साऱ्या भावांचें अन् पुतण्यांचे मोठ्या कलात्मक रीतीनें मुडदे पाडून आणि बापाला आग्र्याच्या किल्ल्यांत डांबून टाकून आतां औरंगझेब निर्धास्त झाला होता. आतां त्याची नजर महाराजांकडे वळली. तो जुना सूड घ्यायला अन् शिवाजीसारखा दुष्मन उखडायला हीच संधी योग्य आहे असं त्याला उघड उघड दिसलं आणि त्यानें वजिरास फर्मावलें, "वजिरे आझम ! बुरहानपूरको बनाम हमारे मामूजान नवाबे आझम शाहिस्ताखान एक फरमान तहरीर कर दो ! उसमें लिख दो के पौन लाख घोडेसवार, बख्सारी पियादा, तोपें और तमाम शाही हरबे-जंग तय्यार करके फौरन दक्खनकी ओर कूच करें ! शिवाजीको नेस्त व नाबूद करनेका सेहरा आपके सर रहेगा ! उस् फर्मानमे यह भी लिखो के शिवाजी जहां मिले, जिस हालतमें मिले, उसे गिरफतार कर लो, या कत्ल कर डालो ! उसके हम-खयाल मराठों के अहलो अयाल समेत कत्ले-आम कर डालो ! उनके घरबार और जमीनोंको फी-नारे-जहन्नम बना दो ! चारो ओर आग लगा कर होली रचा दो ! सारे दक्खनका कब्रस्तान बन जाये तो बेहत्तर होगा ! लेकिन शिवाजी का नामो-निशान भी बाकी न रहना पाये ! "

वजिरानें होकारार्थी अदबीनें मान लवविली.

"—और जो जो मदद दरकार हो, वह फौरन मामूसाहब शाहिस्ता—

खानकी तरफ बुरहानपूरपर रवाना कर दो! आजही तामील हो!"[२] बादशाहा म्हणाला.

बऱ्हाणपुरास खुद्द औरंगझेबाचा सख्खा मामा सुभेदारीवर होता. भलतीच जरब होती त्याची. बादशहाचा दुसरा अवतारच तो.[९]— अमीर-उल-उमरा नवाब मिर्झा अबु तालीब ऊर्फ शाहिस्ताखान!

"खाकसार हुक्मकी तामील फौरन कर रहा है!" वजिरानें कुर्निसात करीत म्हटलें.

"बस्! इरशादे अली हो जाय! अल्ला हू अक्बर!"

* आधारः—(१):–अलमगीरनामा, (२ व ३):- शिवभारत अध्याय २५; (४ ते ७):–शिवकालीन पत्रसार संग्रह; (७ व ८):–जेधे शकावली; (९):–सभासद.

## २ . . . . . . . नवाब शाहिस्ताखान

दिल्लीहून फर्मान सुटलें ! लाल किल्ल्यांतून चार सांडणीस्वार ब्ऱ्हाणपुराकडे दौडत निघाले. तोफखाना आणि एक लाख फौज घेऊन मराठ्यांची दख्खनची दौलत बर्बाद करण्यासाठीं ताबडतोब कूच करण्याचा औरंगजेबानें शाहिस्तखानास हुकूम सोडला.

शाहिस्ताखानाची छावणी ब्ऱ्हाणपुरास होती. अफ़ाट लष्कराचा तळ पडला होता. एका भव्य अलीशान शामियान्यांत नवाबे आझम अमीर शाहिस्ताखानाचा मुक्काम होता. मोंगल रियासतींत शौर्याची शर्थ करून अनेक मोहिमा फत्ते केलेल्या सुमारे साठ मशहूर सरदारांचे तंबू भोंवती उभे होते. मोंगलशाहीचें हिरवें निशाण छावणीत फडकत होतें. शामियान्याच्या भोंवती अरबी हशमांचा पहारा होता.

सांडणीस्वार खानाच्या छावणीत शिरले. दिल्लीची डांक आलेली दिसतांच छावणीत कुतूहल पसरलें.

सांडणीस्वार खानाच्या शामियान्याकडे दौडत गेले. खान शामियान्यांतून बाहेर आला. स्वार थांबले. उंटास बसवून ते खाली उतरले व कुर्निसात करीत करीत खानापुढें गेले. फर्मानाची थैली एकानें खानास पेश केली. थैली मोहरबंद होती. थैली घेऊन खान आंत गेला.

खानानें फर्मान उलगडून वाचलें. खान निहायत खूष झाला ! दख्खनची स्वारी ! शिवाजीवर मोहीम ! मग हमखास फत्ते, हमखास फत्ते ! शिवाजीची बंडखोरी चिरडून टाकणं म्हणजे काय ? सारा दुन मीन तीन महिन्यांचा सवाल ! आणि सिद्दी जौहर व फाजलखान यांच्या चाळीस हजार फौजेचा शह शिवाजीला बसलेला असल्यावर तर मग इतकेहि दिवस लागणार नाहींत. शिवाजीजवळ असून असून फौज असणार किती ?

नव्या कामगिरीवर खान खूष झाला. त्यानें लगेच आपल्या निसबतीच्या सर्व सरदारांस तश्रीफ फर्माविली.

खानाचे चोपदार छावणीत सर्व सरदारांस निरोप सांगत फिरूं लागले.

एकेक सरदार उत्सुकतेनें खानाच्या शामियान्यांत दाखल होऊं लागला. सरदार खमसखान पठाण, नामदारखान, ग्यासुद्दीनखान, हसन मुनीम, सुलतान मिर्झा, तुरुकताझखान, कुबाहतखान, हौदखान, इमाम विरूदीखान, लोदीखान, दिलावर मौलद, अब्दुल बेग, जौहरखान, खोजा सुलतान, सिद्दी फत्तेखान, फत्तेजंग, गाझीखान, मनचेहर, कारतलबखान, भावसिंग, किशोरसिंह, शामसिंह, राजा गिरिधर मनोहर, प्रद्युम्नसिंह, अनिरुद्धसिंह, पुरुषोत्तमसिंह, गोवर्धन गौड, राजा राजसिंह, वीरमदेव, रामसिंह, रायसिंह, अमरसिंह, अरिंदम, द्वारकाजी, खोजा भंगड वगैरे[1] सरदार कुर्निसात करून बसले. स्वतः शाहिस्ताखान मसनदीवर बसला होता.

येवढ्यांत शामियान्याच्या दारांत बांगड्यांचा किण्किण् आवाज उमटला. सर्वांचीच नजर तिकडे गेली. अस्सल मराठी पेहरावांतील एक प्रौढ स्त्री डोक्यावरचा पदर किंचित् पुढें सरकवीत मान लववून आंत आली. स्त्री ? शाहिस्ताखानाच्या मोंगली मजलिसीत अस्सल महाराष्ट्रीय स्त्री ?

होय ! स्त्री ! एक अस्सल महाराष्ट्रीय–महिला ! अन् तीही मोंगलांच्या मजलिसींत !

"तश्रीफ लायीये रायबागनसाहेबा ! मैं आपका तहे–दिलसे व आदबके साथ इस्तकबाल करता हूं !" शाहिस्ताखान म्हणाला व शामियान्यांत एका बाजूस मुद्दाम राखून ठेवलेल्या लोडाकडे हात करून बसण्याची त्यानें तिला विनंति केली.

हीच ती माहूरच्या उदाराम देशमुखाची बायको. शूर होती. कर्तबगार होती. तडफदार होती. हुशार होती. मुत्सद्दी होती. अत्यंत अभिमानी होती. पण तो अभिमान होता मोंगली सुलतानांच्या सेवेचा ! नवरा मेल्यापासून ती स्वतः जातीनिशी मोंगलाच्या फौजेंत पदर बाधून अन् समशेर घेऊन हजर रहात आली होती. तिच्या शौर्यावर खूष होऊन औरंगझेबानें तिला किताब दिला होता,—'रायबागन!'[2] खरोखरच वाघिणीसारखी शूर होती ती. वाघीण होती. पण वैरीण बनली होती देवाची, धर्माची, महाराजांची अन् महाराष्ट्राची.

शाहिस्ताखानानें बादशाही[1] फर्मानाचा मतलब सर्वांस सुनावला. सर्वांसच उत्साहाचें मोठें भरतें आलें.

"शाही हुक्मके मुताबिक हमे जल्द अज जल्द कूच करना चाहिये !"[2] खान म्हणाला.

"जरूर जरूर !" सर्वांनीच दुजोरा दिला.

"ठीक है ! आगे बढनेकी मुनज्जम तय्यारी करो ! हमारी हरावल फौजके झंडे अभीके अभी पहली मंझीलपर रवाना किये जाय !"

खानासह सर्वजण उत्साहानें तयारीस लागले. लष्करांत नौबती वाजूं लागल्या. तोफखाना सज्ज झाला. लहान गर्नाळी तोफेपासून प्रचंड फिरंगाणी तोफेपर्यंत असंख्य लहान-मोठ्या तोफा दख्खनकडे 'आ' करून उभ्या राहिल्या. अक्षरशः हजारों बैल, उंट, खेचरें व गाड्या सैन्याच्या सामानानें खच्चून भरून निघाल्या. लाख फौजेचा सुभा दख्खनवर चालला.[3]

लष्करचा पेशखाना पुढच्या मुक्कामावर उभारण्यासाठीं रवाना झाला. पाऊणलाख घोडेस्वार रिकिबी ताणून तयार झाले.[4] बख्सारी पायदळाचें[5] हजारों हशम हुकुमाकरिता बेइस्तकलाल झाले.

खानाने कूचाची इशारत केली. नौबतीच्या दणदणाटांत मोंगली फौज निघाली. शेंकडो हत्तींची प्रचंड जिवंत भिंतच चालूं लागली. खजिन्याच्या चिलखती तिजोऱ्या उंटांच्या चारचाकी गाड्यांवर साखळदंडांनीं जखडून फौजेच्या मध्यावरून चालल्या. धान्याच्या, वैरणीच्या, तंबूंच्या, दारुगोळ्याच्या इतर युद्धसाहित्याच्या हजारो गाड्या निघाल्या. एकंदर फौज एक लाखाच्या वर होती.[6] तितकीच जनावरें. फौजेंत कझाकी, बख्सारी, पठाणी, अरबी, राजपुती, मोंगली वगैरे जातीचे अत्यंत धिप्पाड व लढाऊ शेर सामील होते. ही राक्षसी फौज निघाली. महाराजांचा नायनाट करण्याकरितां !

...............पावसाळा अगदीं नजीक येऊन ठेपला होता. अति भयंकर संकटांचे काळे कुट्ट ढग, स्वराज्यावर आठही दिशांनीं गोळा होत होते. सर्व परकीय व स्वकीय शत्रु एकदम महाराजांवर उठले होते. स्वराज्य अगदीं लहान. फौज अगदीं थोडी. रांगत्या बाळकृष्णा-

सारखं होतं स्वराज्य. पण दहाही अवतारांत मिळून भेटले नाहींत असे एकेक वैरी एकाच वेळी एकमेकांच्या हातांत हात घालून यशोदेच्या अंगणाकडे येत होते.

आईसाहेब राजगडावर होत्या महाराज पन्हाळडावर होते. स्वराज्यांतील जनता या नव्या संकटांच्या भयानें व्याकुळ झाली होती. आतां ह्या दीड पावणेदोन लाख फौजेखालीं काय होणार होतं स्वराज्याचं अन् महाराजांचं ? कधींही आलं नाहीं असं संकट आलं. कुत्रीं हेल काढून रडत होती. आकाशांत पावसाळी ढग गडगडत होते. विजा दांत विचकीत होत्या.

आपल्या गरीब मराठी प्रजेच्या संरक्षणाकरितां राजगडावरून आईसाहेब जिवापाड धडपड करीत होत्या.[७] आपल्या मायेचा पदर त्या स्वराज्यावर पांघरीत होत्या. परंतु शत्रूची वादळी फुंकर एवढी जबरदस्त होती कीं तो पदर भिरकावला जात होता.

स्वराज्याच्या साऱ्या सरहद्दींवरून आक्रोश ऐकूं येऊं लागले. जीव आणि अब्रू वांचविण्यासाठीं घरं दारं सोडून लोक दीनवाणें धावूं लागले.[८]

पन्हाळ्याला सिद्दी जौहर अन् फाजलखान यांचा वेढा पडला ! चाळीस हजार फौजेच्या[९] ह्या बकासुरांनीं पन्हाळ्याच्या कमरेला करकचून मिठी मारली.

सावंतवाडीचे लखम सावंत, पालीचे जसवंतराव, श्रृंगारपूरचे सूर्यराव दळवी आणि सारेच[१०] महाराजांविरुद्ध तरवारी उपसून पन्हाळ्याकडे धांवले. राजापूरचे वखारवाले इंग्रज टोपीकर व्यापारी सुद्धां महाराजांचा विश्वासघात करून तोफा व दारुगोळा घेऊन जौहर व फाजलखानच्या मदतीस गेले.[११] महाराज काळजीनें जळत होते.

एवढ्यांत शाहिस्ताखानाची तुफानी लाट रोंरावत अहमदनगरांत येऊन दाखल झाली.[१२] महाराजांना पाण्यांत पाहणारे अनेक मराठे खानास, धांवत धांवत जाऊन सामील झाले.[१३] घाटगे, जाधवराव, कोकाटे, गाढे[१४] आणि इतर कित्येक !

शाहिस्ताखान अहमदनगरहून निघाला.[१५] ( दि. २५ फेब्रु. १६६० ). आणि भिंवरा ओलांडून स्वराज्यांत घुसला.[१६] त्यानें आगीच्या चौफेर

चुळा टाकीत दौड मांडली.[१७] गांवेच्या गांवें वणव्यासारखी धडाडून जळूं लागली.[१८] देव आणि देवळं उध्वस्त होऊं लागली.[१९] एक नाहीं, दोन नाहीं शेंकडों आणि हजारों. माणुसकी नामोहरम झाली. चैन सुरु झाली गिधाडांची, कावळ्यांची अन् कुत्र्यांची !

सुपें, बारामती, इंदापूर, शिरवळ वगैरे परगण्यांची राख उडवून खान सासवडास दाखल झाला.[२०]

घणांच्या घावाखाली आईसाहेबांचं हृदय सांपडलं. पावणे दोन लाख फौज दोन दिशांनीं स्वराज्यावर आली आणि खुद्द महाराज मात्र पन्हाळ्यात कोंडून पडलेले ! कसा टिकाव लागायचा ? ओंजळभर सैन्य अन् मूठभर दारूगोळा ! स्वराज्याच्या महत्त्वाकांक्षा रूईच्या कापसासारख्या हवेत फुंकरल्या जाणार काय ?

महाराष्ट्राच्या दावेदारांचं बाहूबळ फार फार मोठं होतं. अजूनहि ते जमवीतच होते. तें वाढतही होतं.

पण आईसाहेबांचं राजगडावर, महाराजांचं पन्हाळगडावर आणि प्रत्येक मावळ्याचं स्वराज्यांतल्या गडागडावर भवानीच्या भक्तीनं भावबळ वाढत होतं. आम्ही मराठी हाडाचीं माणसं वाकणारही नाहीं अन् मोडणारही नाहीं.

*आधारः—( १ व ३ ते ६, ८, १०, १३, १४, १७ ते १९ ):- शिवभारत अध्याय २५; ( २ व १२ ):-आलमगिरनामा; ( १२, १५, १६, २० ):-शिवचरित्र फार्सी साहित्य खंड ३ रा; ( ७, ९ व ११ ):- शिवकालीन प. सा. संग्रह.

# ३ . . . . . . किल्ले चाकण

मावळांतून सळसळ वहात येणाऱ्या मुठा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर पुणें कसबा वसला होता. नदीकांठावर उंच उंच जोतीं घालून लहान लहान घरं अन् मोठे मोठे वाडे बांधलेले होते. गांवाला मोठ्या मोठ्या वेशी होत्या. कुंभारवेशींतून आंत गेल्याबरोबर उजव्या हाताला शेख सल्ल्याचा दर्गा अन् पांढरी शुभ्र मशीद होती. झांबरे पाटील, शितोळे देशमुख, होनप देशपांडे आणि वैद्य, ढेकणे वगैरे आठघऱ्यांचे मोठमोडे वाडे होते.

पंत दादोजी कोंडदेवांनी आईसाहेबांना आणि लहानग्या शिवाजीराजांना घेऊन प्रथम पुण्यात पाऊल टाकलं तेव्हांचं पुणं अगदीच वेगळं होतं. सगळीकडे जाळपोळ अन् पडझड झालेली[१]. सगळीं देवळं उध्वस्त.[२] देवळांत देव नाहीं. दिवा नाहीं. पाकोळ्यांची घाण. मोगलांच्या स्वाऱ्यांनीं आणि दुष्काळानें हैराण होऊन रयत दाही दिशांस परागंदा झालेली. भरादिवसा चोऱ्या माऱ्या व्हाव्या, खून व्हावे. ना दाद ना फिर्याद ! भकास अन् भयाण मसनवटीसारखा झाला होता पुणे कसबा[३]. महाराजांच्या लहानपणची गोष्ट ही. शिवबाराजे अवघे सहा वर्षांचे होते तेव्हां.

आईसाहेब पुण्यांत आल्या. लक्ष्मीचेच पाय पुण्याला लागले. पुण्याची काया पालटली. वेशींना तोरणं लागली. देवघरांत देव आले. ओसरीला दिवे लागले. घरंदारं गजबजली. शेतंभातं घमघमली. आंबेराया मोहरल्या.

पंत दादोजी कोंडदेवांनी सव्वाशें पावलांचं जोतं घालून सायसंगीन जडावाचा चिरेबंदी वाडा खास आईसाहेबांच्या आणि शिवाजीराजांच्या करितां मोठी हौस धरून बांधला. [४] पंतांची माया म्हणजे आटीव दूधच होतं. पंतांनीं वाड्याचं नांव ठेवलं ' लाल महाल. ' लाल महालाच्या आसऱ्यानं पुण्यांतले संसार निर्धास्त नांदू लागले.

——आणि आज ?

शाहिस्ताखानाचे आघाडीचे स्वार सासवडहून पुण्याकडे दौडत निघाले. खान पुण्यांत येणार ही खबर पुण्यांत पसरली. आधी धास्ती होतीच.

कसब्यांतील कुटुंबेंच्या कुटुंबें भांडीकुंडी घेऊन पळत सुटलीं. पण पळायचं तरी कुठें ? अनेक कुटुंबें केवळ जिवाच्या करारावर पुण्यांतच राहिलीं.

बंदुकीच्या गोळ्या झाडीत खानाचे स्वार पुण्यांत घुसले. मागोमाग फौजेचा लोंढा आला. लाल महालावरचे मावळे मरेतो. लढले. पुणें शहराला कोट नव्हता.[५] कशाच्या आधारानं लढायचं ? जो कोट होता तो पूर्वींच आदिलशाही सरदारांनीं पाडून टाकला होता.[६] पुण्याचा पाडाव झाला.[६]

तोफा बंदुकांच्या कडकडाटांत खानाचा हत्ती पुण्याच्या वेशींतून आत शिरला. शिवाजीचं पुणं कब्जांत आलेलं पाहून खानाच्या डोळ्यांत वेगळाच कुर्रा चढला.

मुठेच्या कांठीं छावणीचा प्रचंड पसारा पसरला. तंबू, राहुट्या, पालें, शामियानें दाटीनें लागले. बगळ्यांचा थवाच जसा. जनावरांना ठाणबंद करण्याकरितां हजारो मेखा घणांचे घाव खात जमिनींत घुसूं लागल्या. औरस चौरस दीड कोसाची छावणी पसरली.

खानानें खुद्द लाल महालाचा कब्जा घेतला.[७] स्वतःच्या मुक्कामासाठीं त्याला लाल महालच निहायत पसंत पडला. लगेच पडदे, ग़ालिचे, कापड चोपड, भांडीं-कुंडीं, खजाना वगैरे गोष्टींची रीघ लागली. खानाचा जनाना महालांत दाखल झाला. तार्तर बाया, खोजे, गुलाम, लौंड्या, भटारणी, भिस्ती आणि इतर नोकरपेशानें वाडा गजबजून गेला. गाद्या–लोड–तक्याच्यापुढें पानविड्याची भली मोठमोठी नक्षीदार तबकें आणि तस्तें आलीं. कलाबुतीनें विणलेलीं हुक्कादानें, वाळ्याचें पंखे आणि चांदीच्या अत्तर–गुलाबदाण्या महालांत प्रवेशल्या. जाळीदार धातूच्या धूपदाण्या, सुगंधी सुस्कारे टाकीत महालाच्या कोपऱ्यांत येऊन बसल्या.

लाल महालाचा गीर्दपेशा एक लाख फौजेनें व्यापून टाकला. मावळ वेशीपासून कुंभारवेशीपर्यंत चौक्या-पहारे कडक बसले. लाल महालावर हिरवें निशाण फडकूं लागलें. शेखसल्ल्यांत बांगेच्या आरोळ्या घुमूं लागल्या. मोंगली हशम, सांडणीस्वार, महमील, गोषाचें मेणे, खोजे, तार्तर बाया, दाढ्या रंगविलेले मुल्ला, फकीर, तोफांचें गाडे याचीच दाटी उडाली.

ढोलक्यावर खडा वाजूं लागला. चालदार डफ झळाळूं लागले. तोंडावरचा नाजूक पडदा वर करून कुणी सलमा–रोषन–नजमा–निगार बेहोष नाचूं लागल्या. कानावर डावा हात ठेवून अन् उजव्या हाताचा मुरकेदार वळसा छातीवर ठेवून एक डोळा झाकीत कुणी गुलजार मज्नू कवालीच्या ताना उलगडूं लागले. हास्याच्या लकेरी, हुक्क्याची खुमारी, धुराची फुंकर अन् चांदणी दहीवर ! बस्स् ! मोंगली छावणी रंगून गेली.

—महाराज पन्हाळगडावर जगदंबेपुढं सचिंत शतपावली करीत होते.

—आईसाहेब राजगडावर देवापुढच्या नंदादीपाला हाताचा आडोसा धरीत होत्या. वावटळ फार सुटली होती.

—हें पुणं महाराजांचं राहिलं नाहीं. हा लाल महाल आईसाहेबांचा राहिला नाहीं. धुपाच्या धुरांत शाहिस्ताखानाची राजकारणं रंगूं लागलीं.

सबंध पुणें प्रांतांत आतां कुठेंही मराठी राज्याची नांव-निशाणी उरली नव्हती. सारा मुलुख खग्रास ग्रहण लागल्याप्रमाणें बेचिराख झाला होता.[८] पुण्याच्या ईशान्येला फक्त एकच भाला चमकत होता. अन् तेवढाच खानाच्या काळजांत खुपत होता. तेथें अजून एका मराठ्याची गर्दन बुलंद होती. तेथें अजून मराठ्यांचा भगवा झेंडा बुलंद फडकत होता. तें ठाणं म्हणजे चाकणचा भुईकोट किल्ला–किल्ले संग्रामदुर्ग !

हा किल्ला जिंकलाच पाहिजे. त्याशिवाय पुणें–गुलशनाबादचा रस्ता निर्धास्त होणार नाहीं हे खान जाणून होता. गुलशनाबाद म्हणजे मराठ्यांचं प्रसिद्ध पुण्यक्षेत्र नाशिक ! खानाच्या डोक्यांत सारखं एक नांव घुमत होतं– चाकण ! चाकण !

चाकणच्या किल्ल्याची जी माहिती खानाला मिळाली होती त्यावरून त्याची खात्रीच झाली होती कीं, चाकणचा किल्ला जिकणं म्हणजे एक दिवसाचं काम. एकदा आपल्या तोफा किल्ल्याच्या दरवाजावर धडकूं लागल्या कीं आपोआप किल्ल्यांची दांतखीळ उचकटेल. शिवाय, आपली अफाट फौज अन् हत्ती आहेतच. एक चाकणच काय, सारी दख्खन भरडणार होता तो फौजबळावर.

आणि एक दिवशीं खानानें आपल्या सरदारांस लाल महालांत

बोलावलं. मजलीस भरली. सय्यद हसन, ऊझबेगखान वगैरे त्यांत प्रमुख होते. खानानें मसलत सुनावली. मोहिमेचा तपशील सांगितला. आणि ठरलं! चाकणचा मनसुबा मुस्तकीम झाला. प्रत्येकाचं डोकं आपल्या वजनदार फौजेनें आणि अवजड तोफांनी जड झाले होते. प्रत्येकाला खात्री कीं जिंकूंच! खानानें लोडावर मूठ आपटून हंसत हंसत चाकणकडे बोट केलें!

तोफखान्याला हुकूम सुटला. वीस हजार फौज चाकणसाठीं मुक्रर झाली. हबशखान, सय्यद हसन, ऊझबेगखान, जाधवराव वगैरे मोठमोठ्या अनेक सरदारांस निघण्याचा हुकूम झाला.[९] खुद्द शाहिस्ताखान जातीनें निघाला.[१०] चाकण पुण्यापासून फक्त नऊ कोस. खानाची ढाल कुंभार वेशींतून बाहेर पडली.

गवताच्या पात्याआड, झाडांच्या बुंध्याआड, पडक्या भिंताडांच्या मागें, निवडुंग निर्गुडीच्या मागें दोन दोन डोळे टकमक टकमक टकाकत होते. मराठ्यांचे हेर हे. खारीसारखे टेहळत होते. चाकणवर खान निघाल्याची खबर त्यांना मिळतांच ते चाकणला घोडे पिटाळीत पळत सुटले.

चाकणच्या चौफेर चौऱ्यांशी गांवं आहेत. ह्या सर्व गांवांना मिळून चाकण–चौऱ्यांशी म्हणतात. ही गांवं म्हणजे जसे चौऱ्यांशी तांबूस मोतीच होते अन् चाकण म्हणजे त्यांत झळझळणारा जणूं तांबडा खडाच. हा मोत्याचा घांस गिळायला खान निघाला. ही चौऱ्यांशी गांवं अजूनपर्यंत चाकणच्या मराठी अमलाखाली होती.

चाकणचा किल्ला तो केवढा? किल्ला नव्हेच. गढीच ती. जास्तीत जास्त चारशें हशम राहूं शकतील येवढंच आवार. अवघा चार बिघ्याचा पसारा. किल्ल्याचा आकार चौकोनी होता. चार टोंकावर चार व मधे मधे एक एक असे भव्य अन् अत्यंत बळकट बुरूज होते. पूर्वेच्या तटांत प्रचंड बुरुजांच्या मध्यावर दरवाजा होता. तटांची रुंदी आठ हात अन् उंची तीस हात होती. चिरेबंदी बांधणीचा हा मोहरेदार किल्ला अंगाबांध्यानें असा खणखणीत होता कीं जसा कांहीं भीमच बसलाय मांडी ठोकून.

ह्या दगडी तटबंदीच्या बाहेर खंदक होता. खंदकाच्या बाहेर परकोट

होता. किल्ल्याच्या प्रत्येक बुरुजावर तोफा उभ्या होत्या अन् दरवाजावर उंच उंच अस्मानांत मान ताठ करून भगवा झेंडा फडफडत होता.

अशा ह्या पिळदार किल्ल्याचा किल्लेदारही असाच बळवंत होता. सह्याद्रीचा तुटलेला कडाच. पायांत मावळी वहाणा, तंग मांडचोळणा, कमरेला शेला, हातात समशेर, अन् कंबर म्हणजे बाभळीचं खोड. आडवी पेलेदार छाती. वर बंदाचा तटतटलेला अंगरखा. मनगटावर अस्तनीच्या चुण्या, दोन वितीच्या विळख्यांत गवसायचे नाहींत असे दण्ड, वाघासारखी मुद्रा, मूठमूठ मिशा. सुपारी सारखे टप्पोरे डोळे, कानांत चौकडे, डोक्यावर कंगणीचं झोंकदार किंचित् कलतं घातलेलं पागोटं. आवाजांत कडक दरारा अन् रक्ताच्या अगदीं थेंबाथेंबांत इमानदारी. स्वराज्याच्या ईशान्य सरहद्दी-वरील ह्या चाकण किल्ल्याच्या किल्लेदारीची शेला-समशेर महाराजांनी या बहाद्दराच्या कमरेला बांधली होती. याचं नांव फिरंगोजी नरसाळा !

महाराजांवर फिरंगोजीची निष्ठा जबर होती. मान तोडून दे म्हटलं तरीही देईल अशी निष्ठा. विचारायचा नाहीं, कां म्हणून.

चाकणच्या किल्ल्यांत अवघे साडे तीनशें हत्यारबंद मावळे होते. फिरंगोजीनें किल्ल्याचा बंदोबस्त पक्का ठेवला होता. रात्रंदिवस तो जागरूक होता. आज नाहीं उद्यां, खान चाकणवर येणार हे तो ओळखून होता. अन् तो चिंतेतही होता. चिन्ता महाराजांची. महाराज पन्हाळ्यांत अडकले होते. ते सुटतील केव्हां, ते दिसतील केव्हां !

फिरंगोजीचे हेर दौडत दौडत चाकणच्या दरवाजाशीं येऊन टापा आपटीत राहिले.

दरवाजा उघडला गेला. हेर किल्ल्यांत शिरले. ते थेट फिरंगोजीकडे गेले त्यांनीं फिरंगोजीला मुजरे करून उभ्या उभ्या सगळं सांगितलं.

“ आँ ? ”......

“ व्हय धनी ! पंधरा दस्ते फौज हाये खानासंग ! आन् तोफखानाबी ! आज रातच्याला त्यो इंद्रायनीचं पानी वलंडील ! ”

" खरं कीं काय ? चला चला चला बिगी बिगी ! "

लगेच किल्ल्यांत धाई गर्दी उडाली. जो तो नेमल्या कामांत गढला. लढाईची तयारी सुरू झाली. फिरंगोजीने लगेच पांच पन्नास स्वार तयार करण्यास पागनिसास फर्माविलें. ते स्वार लगेच तयार होऊन फिरंगोजीपुढें हाजीर झाले.

" साऱ्या चाकण चौऱ्यांशीला आजच्या आज खबर गेली पाहिजे ! समद्या पाटील—कुरकळण्यान्‌ला हुकूम सांगा ! म्हनावं गवताची येकबी काडी आन्‌ धान्याचा येकबी दाना खानाच्या हातीं गवसायला न्हाई पाहिजे ! समदं पळवा ! गावं उजाड पाडा ! नेता यईल तेवढं संगं घेऊन जावा ! न्हाईल ते जाळून अक्षीं खाक करा ! चाकनचौऱ्यांशींत खानाला कायबी घावतां कामा नये ! जावा जावा जावा, दौडा ! " फिरंगोजीनें आपले स्वार पिटाळले. धाड धाड दौडत स्वार किल्ल्याबाहेर पडले व चारी दिशांस उधळत नाहींसे झाले.

खानाची खबर अन्‌ फिरंगोजीचा हुकूम सबंध चाकण-चौऱ्यांशीच्या वेशी-वेशींत पोहोंचला. गांवोगांवच्या लोकांनीं फिरंगोजीच्या सांगाव्या-प्रमाणं तंतोतंत केलं. नेता आलं तेवढं घेऊन ते लांब डोंगराच्या सांदी कोपऱ्यांत पळाले. जातांना उरलं सुरलं ते त्यांनीं जाळून खाक केलं.[११] दांत कोरायला काडी ठेवली नाहीं.

खान इंद्रायणी ओलांडून पुढं आला. सारा मुलुख उजाड पाहून तो चकितच झाला. आतां फौजेच्या पुरवठ्याला पुण्याहून किंवा जुन्नरहून दाणा-वैरण आणणं त्याला भाग पडणार होतं.

खान झपाट्यानें अंतर काटीत निघाला. तोफांची चाकें, घोड्याच्या टापा, हत्तींचे चीत्कार आणि घंटा-घुंगरांची घण्‌ घण्‌, खुळ्‌ खुळ्‌ एकमेकांत मिसळत होती.

फिरंगोजीनें दरवाजा जाम बंद केला. परकोटाच्या तटातटावरून तो स्वतः सारखा फिरत होता. त्याचे मावळेही मोठ्या उत्सुकतेनें मोंगल टिपायला टपले होते. बंदुका अन्‌ तीर-कमानी सज्ज होत्या. फिरंगोजी

आपल्या लोकांना प्रोत्साहन देत होता. त्यांच्या खणखणीत आवाजानेंच लोकांची वीरश्री प्रत्येक क्षणाला वाढत होती.

खान चार कोस पुढं आला. आतां चाकण एकच कोस राहिलं. खानानें आपल्या सरदारांना हल्ला कसा कसा आणि कोणी कोणी कोणत्या बाजूनें करायचा हे आधीच समजाविलेलं होतं. टापांचा वेग वाढला.

खान चाकणच्या अगदीं टप्प्यांत आला. लांब झाडीच्या पलीकडून अस्मानांत फडफड करणारा भगवा झेंडा दिसूं लागला. जणूं फुरफुरती मशालच. किल्ल्याच्या तटांचा अन् बुरुजांचा वरचा भाग दिसूं लागला. ताठ केलेल्या बोटांसारखीं एकेक तोफ तटा-बुरूजावर दिसूं लागली.

फिरंगोजी तटावरून टेहळत होता. खानाची मोंगली निशाणें दिसूं लागलीं. हत्तींच्या उंचावलेल्या सोंडा दिसूं लागल्या. गलबला वाढत्या प्रमाणांत ऐकूं येऊं लागला.

पहिला एल्गार कारिगार जर झाला नाहीं तर वेढा घालायचा हें खानाचं ठरलंच होतं. कोणी कोणती बाजू धरायची, कोणत्या बाजूस मोर्चे लावायचे हेंही खानानें आधीच ठरविलेलें होतें. त्याप्रमाणें सर्वांस हुकूमही केलेले होते.

खानाची फौज किल्ल्याच्या अगदीं नजीक आली. किल्ल्याची खडी तटबंदी दिसूं लागतांच मोंगली फौजा प्रचंड आस्मानभेदी गर्जना करीत किल्ल्याकडे धांवत सुटल्या. घोडे जोडलेल्या तोफा थाड थाड चाकें उडवीत दौडत होत्या. घोड्यांच्या टापांखालीं जमीन पिंजत होती.

किल्ल्यावरचे लोक सरसावले. फिरंगोजी एका तोफेवर उभा होता.

“ हुश्शा ऽऽऽऽर ! ”

किल्ल्याच्या नौबतखान्यांत वाद्यें गर्जूं लागलीं.

मोंगली फौज किल्ल्याच्या सांवलीपर्यंत आली. किल्ल्यावरच्या तोफांना एकदम बत्ती मिळाली. धडाड धडाड गोळे सुटूं लागले. बंदुकांच्या फैरी फाड फाड उडूं लागल्या. खानाची फौज गांगरली. एकदम किल्ल्याला भिडायचीं स्वप्नें विरघळलीं. आरडा ओरडा, रणवाद्यांचा कल्लोळ, तोफा बंदुकांचा धुमधडाका आणि हत्ती घोड्यांच्या ओरडण्याची त्यांतच भर.

तोफांच्या धुरानें तर कांहींही दिसेना. दारूच्या वासानें हवा सर्द झाली. घसे फोड फोडून सरदार हुकूम सोडीत होते. धुळीचे लोट उंच उंच उसळत होते. दारूगोळ्याच्या दणदणाटांत कांहींच ऐकूं येत नव्हतें.

किल्ल्यावरून होणाऱ्या माऱ्यामुळें मोंगली फौजेचा डाव फिसकटला. शाहिस्ताखान स्वतः किल्ल्याच्या उत्तरेच्या बाजूस गेला. खानाच्या खास दिमतीचे सरदार गिरिधरकुंवर, वीरमदेव, हबशखान, दावाजी वगैरे खानाच्या मागोमाग गेले. शम्सुद्दीनखान, मीर अब्दुल मबूद दरोगा, सय्यद हसन, ऊझबेगखान, खुदावंतखान हबशी, विजयसिंह, सुलतान अली अरब, व अलायार बुखारी हे किल्ल्याच्या पूर्वेच्या बाजूस धांवले.[१२] किल्ल्याचा दरवाजा ह्याच बाजूस होता. राव भावसिंग, शर्फराजखान, जाधवराव, जौहरखान हबशी हे दक्षिणेच्या बाजूस सरकले.[१३] आणि राजा रायसिंग हा एकटा सरदार आपल्या फौजेसह पश्चिमेच्या बाजूवर थांबला.[१४]

—आणि सर्वांनीच बंदुकीच्या टप्प्याच्या अंतरापासून बरेंच लांब तळ दिले. किल्ल्यास चारही बाजूंनी मोंगलांचे मोर्चे बसले. चौफेर वेढा पडला.[१५]

किल्ल्यांतील मंडळी मात्र खानाच्या फौजेची उडालेली तिरपीट अन् फसलेला बेत पाहून खूष झाली होती.

* **आधार:**—( १ ते ७ ):—शिवचरित्र प्रदीप, पृष्ठ ७०, ७१; शिवभारत; शि. का. प. सा. सं; राजवाडे खंड, १७, १८, २०; शिव च. सा. खं. २; ( ८ ):—— शिवभारत अध्याय २५; ( ९ ते १५ ):—— आलमगीरनामा. मुन्तखबुल्लुबाब; ( ११ ):——शिवचरित्र निबंधावली. चाकणच्या वेढ्यास सुरुवात:—२१ जून १६६०.

## ४ ■ ■ ■ ■ ■ ■ पन्हाळा आणि चाकण

शाहिस्ताखानाच्या वेढ्याचा दुसरा दिवस उजाडला. किल्ल्याच्या नजीक जाऊन तटावर यशस्वी मारा करणं जरूर होतं. परंतु किल्ल्यावरून बाण आणि बंदुकांच्या गोळ्या इतक्या अचूक अन् असंख्य सुटत होत्या कीं तटाजवळ जायचं नांवच नको. पोत्यांत माती भरून त्याची छोटी छोटी भिंताडें उभी करून त्याच्या आडून तटावर मारा करण्याचा मोंगल प्रयत्न करूं लागले.

फिरंगोजीनें दारुचे मोठ मोठे बाण मोंगलावर सोडण्यास सुरुवात केली.[१] त्यामुळें मोंगल अगदीं हैराण झाले. त्यांचे मोर्चे कांहीं ठरेनात. धारिष्ट करून मोंगली हशम पुढें जात अन् गोळ्या झाडीत. पण परिणाम उलटाच होई. मावळे त्यांना अचूक टिपीत. तटाच्या आडून जांग्यांतून गोळ्या झाडणारे मावळे सुखरूप होते. बेदरकार होते.

खानाची नाकेबंदी मात्र पक्की होती.[२] किल्ल्यांत चोरून मारून जाण्या-इतकीसुद्धां फट ठेवली नव्हती. खान ही पक्की खात्री धरून होता कीं आंतलें लोक धान्य संपलें आणि दारूगोळा संपला कीं उघड्या वाळूवर पडलेल्या माशासारखे तडफडूं लागतील. किल्ला हा हमखास मिळणारच. पण इतकी वाट बघत बसायला खानाला धीर नव्हता.

—पांच दिवस उलटले. मावळ्यांनीं मोंगलांची बंदुकींनीं टवाळी चालविली होती. मोंगलांचा मोर्चा दहावीस पावलं निर्धास्त पुढं येऊं द्यावा अन् मग फिरंगोजीनें बुरुजावरून एकच तोफ अशी डागावी कीं केलेली सारी धडपड अस्मानांत ! फिरंगोजी हंसत हंसत खानाच्या फौजेकडे पहात राही. खान मात्र चडफडत होता.

—तिकडे महाराज पन्हाळगडावर सुटकेकरितां तळमळत होते.

—दहा दिवस गेले. फिरंगोजीच्या अन् त्याच्या मावळ्यांच्या आतां सारं अंगवळणी पडलं. गेल्या दहा दिवसांत खानानं खंडींनीं दारू-गोळा उडविला होता. पण फक्त आवाज अन् धूर याशिवाय त्यांतून कांहींच निर्माण

झालं नव्हतं. अन् होतही नव्हतं. किल्ल्याची मूठभर मातीसुद्धां निखळली नव्हती. रात्र झाली कीं फिरंगोजीला उजाडे. मोंगली फौज श्रमानें सुस्तावे त्यांतच पाऊस सुरू झाला होता. रात्री-अपरात्री छावणींत सुस्त शांतता दिसली कीं किल्ल्याचा दिंडी दरवाजा उघडून फिरंगोजी आपल्याबरोबर टोळकी घेऊन मुंगसासारखा बाहेर पडे. भराभर छावणीत घुसून सपाटून कापाकाप उडवी. [३] छावणीत गोंधळ उडाला कीं मोंगली शिपाई खड-बडून धांवत. पण तोंपर्यंत हे सारे किल्ल्यांत पसार होऊन दिंडी लावून घेतांना त्यांना दिसत ! जवळ जायची तर सोयच नव्हती. जरा जवळ गेलं कीं ठः ठः ठः गोळ्या सुटत.

— पंधरा दिवस होऊन गेले. खानानें शिकस्त चालविली होती. दारू गोळ्याचे पेटारेच्या पेटारे रिकामे होत होते. तोफांची तोंडे आग ओकून ओकून लालावली होती. फिरंगोजीची रग वाढत होती. त्याची अन् त्याच्या मावळ्यांची पुरेपूर खात्री होती कीं आज ना उद्यां, लौकरांत लौकर आपले महाराज पन्हाळगडांतून निसटतील. आणि मग आपल्याला कुमक येईल. [४] मग बघूच ह्या खानाकडे. महाराज सुटेपर्यंत ह्या खानाला मिशीच्या केसाइतकंही पुढं येऊं द्यायचं नाहीं. किल्ल्यांतला प्रत्येक मावळा न् मावळा जबर निष्ठेचा होता. त्यांच्या पाठीशीं फिरंगोजी डोंगरासारखा उभा होता. फिरंगोजी हंसत, ओरडत, रागावत, कौतुक करीत, दरडावत, पाठी थोपटीत तटावरून फिरूं लागला कीं मावळ्यांचं बळ वाढे. किल्ल्या-वरची अचूक गोळी लागून मोंगलांच्या मोर्च्यावरचा एखादा हशम किंचाळत कोसळला कीं फिरंगोजीनें मोठ्यानें हंसत हंसत त्या अचूक नेमबाज मावळ्या-पाशी जावं अन् दोन्ही दोन्ही हातांनीं त्याची पाठ थोपटीत म्हणावं, " शाबास रे माझ्या वाघा ! "

—एक एक दिवस उलटत होता. फिरंगोजीची अन् सर्वांचीच हिम्मत कमी व्हायच्या ऐवजीं वाढतच होती. पण किल्ल्याच्या सबनिसांची मुद्रा मात्र रोज जास्त जास्तच चिंताक्रांत होत होती. त्यांच्या छातींत धस्स होत होतं.

एक दिवशीं काळजी उराशीं धरून सबनीस फिरंगोजीकडे आले. त्यांचं तोंड सुकलं होतं.

" आं ? कां म्हुन इकतं चिंतावला पंत तुमी ? " फिरंगोजीनें पुसलं.

" दिल धास्तावलय माझं ? आतां ह्या गोष्टीकडे डोळेझांक करून चालणार नाहीं ! "

" म्हंजी ? झालं तरी काय इकतं ? सांगा तरी ! " फिरंगोजीनं काळजीनं हलक्या आवाजांत पुसलं.

सबनिसाच्या भिवया काळजीनें वर सरकल्या अन् ते म्हणाले, " धान्याचं कोठार दर दिवसाला कमी कमी होतंय ! असंच कमी कमी होत राहिलं तर— ! "

" —तर वारा पानी खाऊन जगूं ! पर किल्ला न्हाई देनार ! तुम्ही आम्ही महाराजांची माणसं आहोंत ! " आखाड्यांत दंड ठोकल्यागत खणखणीत आवाजांत फिरंगोजी म्हणाला.

आतां काय बोलणार सबनीस ?

" आन् अशी काय मोठी खानाची पत्रास लागून गेली हाये ? आमचं महाराज पन्हाळ्यांत अडकून पडल्येत म्हुनून त्येचा एवढा तोरा ! महाराजान्‌ला मोकळं व्हऊं द्या, आन् मंग बगा ! महाराज काय कायमचं अडकून बसतायत् व्हय् ? कवा जातलि शिद्दी जव्हाराचं मुंडकं उडऊन तर त्ये त्येलाबी उमगायचं न्हाई ! "

आतां शाहिस्ताखान काय डोसकं फोडणार इथं ? मराठ्यांच्या किल्ल्यांना वेढे घालणं म्हणजे थट्टा नव्हे. मराठ्यांची मनं जिंकायला कठीण, तसे त्यांचे किल्ले जिंकायलाही कठीण. त्यांचे किल्ले जिंकायला कठीण, तशी त्यांची मनं जिंकायलाही कठीण !

ह्या किल्ल्यांत घुसण्याकरितां काय करावं हें खानाला समजेना.

—आणि पन्हाळगडांतून निसटण्याकरितां काय करावं हे महाराजांस समजेना. पन्हाळगडचा वेढा आवळत चालला. जौहर-फाजलनें अगदीं मगरमिठी मारली. गड त्यांच्या 'बा'ला मिळाला नसता. पण महाराजांना मात्र बाहेर निसटायला फटसुद्धां न उरल्यामुळें गुदमरल्यासारखं झालं होतं.

—चाकणचाही वेढा खानानें कमालीच्या नेटानें चालविला होता.

महाराजांकडून कुमक येईल ह्या खात्रीवर चाकणचे डोळे पन्हाळ्याकडें लागले होते.

आखाडाची एकादस उलटली. बारस ओलांडली. तेरस कलंडली. पुनव ढळली. काळा पंधरवडा सुरू झाला. आतां—?

येवढ्यांत शाहिस्ताखानाच्या छावणीत धाडकन् बातमी येऊन धडकली कीं शिवाजी पन्हाळगडावरून पसार झाला! प्रचंड खळबळ उडाली. कुणी डोकं खाजवूं लागला. कुणी तोंडांत बोटं घातलीं. कुणी बगळ्यासारखी उंच मान करीत आश्चर्यानें भिंवया चढवून खालचा ओठ बाहेर मुडपूं लागला. खान तर चकितच झाला. अखेर डोंगरचा उंदीर पळाला! सव्वाचार महिने चाळीस हजार फौजेनिशी डोंगर पोखरून अखेर उंदीरसुद्धां सांपडला नाहीं सिद्दी जौहरला!!

महाराज चाळीस हजार फौजेच्या गराड्यातून पसार झाले! तहाची हूल देऊन महाराज रातोरात पसार झाले. सिद्दी जौहरच्या फौजेनें पाठलाग केला. पावनखिंडीच्या अरुंद घशांत मराठ्यांचं स्वराज्य घटसर्प होऊन मरायची वेळ आली होती; पण बाजी प्रभु देशपांड्यानं आपला प्राण देऊन दख्खनच्या दौलतीचा प्राण वांचाविला.[६]

महाराज निसटल्याची चाहूल किल्ल्यांत फिरंगोजीला लागली! एकदम समुद्राला उधाण आलं! दिव्याच्या वाती पुढें सरकरल्या! तोफा-बंदुकांच्या फैरी मोंगलांवर दणदणल्या—नव्हे चाकणचे बुरूजच दंड ठोकून खानाला आव्हान देऊं लागले—आतां ये लेका कुस्तीला!

महाराज सुटले! आतां लौकरच कुमक येईल! आशा! आशा! नव्हे खात्रीच!

---

* **आधारः**—(१ ते ३):—आलमगीरनामा, मन्तुखबुल्लुबाब; (४ व ५):-शिवभारत, अध्याय २५; (६):-जेधे शकावली, एक्याण्णव कलमी. महाराज पन्हाळ्यातून सुटले व बाजी प्रभू—प्राणार्पणः— १३ जुलै १६६०.

## ५ . . . . . . फिरंगोजी नरसाळा

खान तर अगदीं बेचैन होऊन गेला. चाकणच्या किल्ल्याकडे पाहून रागानें तो मुठी वळीत होता. ही असली दीड वितीची भुईकोट भिंताडे जर इतकी छळूं लागली, तर डोंगरी किल्ल्यांवर कसं काय व्हायचं आपलं ? आतां हा किल्ला घेण्यासाठीं कोणता अचूक डाव टाकावा याचा तो रात्रंदिवस विचार करीत होता. विचार करून करून डोकं पिचायची वेळ आली. एक दिवस विचार करतां करतां एकदम त्याच्या डोक्यांत एक विलक्षण मनसुबा चमकून गेला ![१] त्याची नजर किल्ल्याच्या प्रचंड बुरुजांकडे गेली. त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटले ! त्यानें एकदम चुटकी वाजविली ! !

——महाराज निसटले. चार दिवस होऊन गेले. आठ दिवस गेले. पंधरावडा उलटला ! अजूनही फिरंगोजीस महाराजांकडून कसली खबर, आली नाहीं कीं कुमक नाहीं ! कांहीं नाहीं, कांहींही नाहीं !

आखाड संपला. श्रावण उजाडला तरीही महाराजांकडून कुमक येण्याचें चिन्ह दिसेना ! तरीही फिरंगोजीची रग पहिल्या दिवसाइतकीच ताजी होती. चिंतेचे ढग चाकणवरून जात. क्षणार्ध फिरंगोजीच्या मुद्रेवर सांवली पाडीत; पण पुन्हा फिरंगोजी पहिल्यासारखाच ! बेफिकीर, बेदरकार !

महाराज विशाळगडाहून राजगडावर येण्यास निघाले. पन्हाळगडचा फसलेला डाव पाहून सिद्दी जौहर इतका भयंकर दुःखी व शरमिंदा झाला कीं तंबूतून तोंड बाहेर काढवेना त्याला. तो फौजेसह परस्पर कर्नुळास निघून गेला.[२] विजापुरास जाण्यास त्याचें मनच धजेना.

महाराज राजगडावर आले.[३] आईसाहेब गेले पांच महिने घारीसारख्या नजर लावून वाट पहात होत्या. एकेका काळजीनें आईसाहेब फार थकल्या होत्या. शिवबा आल्याची खबर त्या माउलीला जातांच केवढा आनंद त्यांच्या हृदयांत उसळला.[४] जौहरच्या भयंकर संकटांतून सुटून आपला बाळ येत असलेला पाहून भेटीकारितां जीव आसूसला त्यांचा.[५] डोळे आनंदाश्रूंनी भरले.

महाराज आले.

" शिवबा ! " आईसाहेबांच्या दाटलेल्या गळ्यांतून हांक उमटली.

" आई ! " महाराजांनी वासराच्या ओढीनं जाऊन आईसाहेबांच्या पायावर मस्तक ठेवलं.[६]

दोघांनाही असं झालं किती बोलूं अन् काय काय बोलूं. पण कोणालाच कांहीं बोलतां येईना !

महाराज सबंध दिवसभर आईसाहेबांपाशीच बसून राहिले.[७] सगळीकडच्या गोष्टी झाल्या.[८] चाकणला वेढा पडल्याची हकीकत महाराजांस आधी समजलेली होतीच. खानानें गेल्या पांच महिन्यांत कसा धिंगाणा घातला हेही महाराजांस आईसाहेबांनी सांगितलें. शाहिस्ताखानाच्या पातकांच्या पताका पुणें प्रांतांत पावला पावलावर फडफडत होत्या.

महाराजांची गंभीर नजर राजगडच्या बालेकिल्ल्यावरून पुण्याकडे अन् चाकणकडे गेली. चाकणची काय परिस्थिती असेल याची पुरेपूर कल्पना महाराजांना आली होती. खान वीस हजार फौजेसह चाकणला विळखा घालून किल्ल्यावर तोफांचे विषारी फूत्कार टाकीत होता. असंच तडख चाकणच्या कुमकेस जावं असं महाराजांसही वाटत होतं. पण एवढ्या प्रचंड फौजेशीं उघड्या मैदानावर झुंज देणं म्हणजे उघड उघड आत्मघातच होता. महाराज चिंतेत पडले.

--फिरंगोजी रोज मोठ्या आशेनें किल्ल्याच्या दक्षिण बुरुजावरून राजगडच्या दिशेला लांब लांब नजर लावून बघत होता.

--आपल्याच एका किल्ल्याच्या प्राणरक्षणाकरितां आपण ह्यावेळीं जाऊं शकत नाहीं हे पाहून महाराजांनी डोळे घट्ट मिटून घेतले.

—शाहिस्ताखानाच्या डोक्यांत 'तो' अति विलक्षण मनसुबा घोळत होता. त्यानें उझबेगखान, शर्फराजखान, सुलतान अली अरब, अलायार बुखारी वगैरे आपल्या खास सरदारांस आपल्या शामियान्यांत अगदीं गुपचूप बोलावून घेतलें. ते सर्व आले. अगदीं सख्त बंदोबस्तांत व गुप्तपणें खलबत सुरू झालें. खानानें तो आपला भयंकर मनसुबा सर्वांस सांगितला.[९] मोठा विलक्षणच ! एक निमिषभर सारेच दिपले. सर्वांस एकदम पटला. लगेच खानानें कामास सुरुवात करण्यास फर्मावले. मजलीस संपली.

सर्व सरदार नव्या हिरिरीनें बाहेर पडले. चाकणच्या तटबंदीकडे कुत्सितपणें ते पहात होते.

—वद्य श्रावणाची प्रतिपदा उलटली. आपल्या दांडग्या उत्साहाखाली आणि चिलखती निष्ठेखालीं फिरंगोजीनें आपल्या काळज्या खोल दडपून टाकल्या होत्या.

वद्य द्वितीया गेली. खानाचे सरदार रोज चारदा एकांतांत खानाशीं कुजबुजून जात होते.

वद्य तृतीया उजाडली. उमलली. मावळली. फिरंगोजी अवसानांत होता. तो सहज आशाळ नजरेनें महाराजांच्या दिशेला बघे.

वद्य चतुर्थी उगवली. सकाळ झाली. दुपार झाली. संध्याकाळ झाली. रात्र झाली. मध्यरात्र झाली. मध्यरात्र ओलांडली. खानाच्या छावणींत कुठेशीं अंधारांत कांहीं तरी खटपट चालली होती.

वद्य पंचमी उजाडली. सकाळपासूनच मोंगल सरदारांची धांवपळ गडबड चालली होती. सर्वांनीं आपल्या नायब अमलदारांस कसल्या तरी खबरदारीचे हुकूम गुपचूप देण्यास सुरुवात केली होती. आपआपल्या मोर्चांत मोंगली फौज चोरपावलांनीं जमत होती.

अगदीं रोजच्या इतक्याच कडक खबरदारीनें किल्ल्यावरचे मावळे तटातटावर व बुरुजांवर सक्त टेहळणी करीत होते. थोडीही ढिलाई नव्हती. दरवाजावरचा भगवा झेंडा फडफड करीत होता.

मध्यान्हीचा समय होता. मोंगल सरदारांचा खानास निरोप गेला. खान शामियान्यांतून बाहेर आला.

किल्ल्याच्या आग्नेय बुरुजावर पांच पन्नास मावळे बंदुका ठासून शिकार टेहळीत होते. एक मोठी तोफ चबुतऱ्यावर तेथेंच उभी होती. फिरंगोजी एका बाजूच्या तटावर होता. सूर्य माथ्यावरून कलला. ढगाच्या काळ्या लोटाखालीं तो पार पार झाकाळून गेला. वाऱ्याची झुळूक उठली. झेंडा फडफडला. जणूं झेंड्याची डावी पापणीच फडफडली !

—आणि—आणि—धडाड धड्ड्ड्ड्ड् धाड् धाड् !

किल्ल्याचा आग्नेय बुरूज अस्मानांत उडाला [१०] ! ! धुराचा लोट, मोठमोठे धोंडे अन् बुरुजावरची पांच पन्नास माणसें पांखरांसारखी उंच उंच अंतराळावर उडाली ! [११] ती बुरूजावरची प्रचंड तोफही भिरकावली गेली ! किंकाळ्या उठल्या ! आवाजानें कान फुटले ! मस्तक सुन्न झालं ! चक्कर आली ! सबंध किल्ला हादरला !

" महाराऽऽज ! " फिरंगोजीनें कळवळून आरोळी मारली ! त्याच्या देखत बुरूज उडाला ! त्याच्या जणूं काळजाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या ! त्या भयंकर प्रचंड स्फोटानें मावळे भांबावून गांगरून भरकटत सुटले ! फिरंगोजीचा तटावर तोल गेला. त्याची मान लटलटू लागली. त्याच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हतं. किल्ल्याला प्रचंड खिंडार पडलं ! [१२] कारुण्य आणि दुःख एकदम फिरंगोजीच्या मुद्रेवर दाटलें. तो वेड्या-पिश्यासारखा तिकडे पहात राहिला. कमनशिबाऽऽ काय केलंस हे ! अस्मानांत उंच उडालेली मावळ्यांची प्रेतं छिन्न विच्छिन्न होऊन जमिनीवर आदळली. आठ दहा हत्तींच्या घेरा येवढा तो प्रचंड बुरूज सुरुंग लागून उडाला. [१३]

मोंगलांच्या छावणीतून एकदम प्रचंड पुकार उठला ! हजारो समशेरी अन् भाले उंच तळपले. फिरंगोजीची मान तिकडे वळली ! दुष्मन ! फिरंगोजीचं देहभान उडालं ! तो वेड्यासारखा मोठमोठ्यानें ओरडत त्या खिंडाराकडे धांवत सुटला. [१४] तो आपल्या मावळ्यांना हांका मारीत होता. त्याचा तो आवेश भयंकर होता. तो वेडा झाला. दांत करकचून खात तो धांवत होता. त्याच्या डोळ्यांत तांबडी भडक आग जळूं लागली होती. घामाचे थेंब दंवासारखे जमा झाले होते. मानेवरच्या शिरा फुगल्या होत्या. त्याच्या मागोमाग किल्लाभर भरकटलेले मावळे तरवारी उपसून धांवले.

मोंगली फौज ओरडत गर्जत खिंडाराकडे येत होती. फिरंगोजीनें आपल्या दोन्ही हातांत दोन धारदार पट्टे चढविले आणि खिंडारावर येऊन तो उभा राहिला. त्यानें आणि साऱ्या मावळ्यांनीं कडाडून गर्जना केली, " हर हर हर हर महादेऽऽव ! "

समोरून मोंगली फौज धांवत येत होती.

फिरंगोजी म्हणजे महा रौद्ररूप कालभैरव दिसूं लागला. त्याचे मावळेही

तसेंच. समोरून येणारा दुष्मन-लोंढा पाहून फिरंगोजी गरजला, " या या ! कुनाची माय यायली हाये त्ये बगतोच आतमधी पाय टाकायला ! "

फिरंगोजीनें आपले पल्लेदार पट्टे उंच लप लप करीत तळपविले आणि तो ओरडला, " बोला ऽ ! तुळजा भवानीचा ऽऽऽऽऽ ! "

" उदे ऽ उदे ऽऽऽ ! " मावळ्यांनीं समशेरी नाचवल्या.

शिंगांची ललकार उठली !

मोंगली फौज खिंडाराशीं आली. खिंडाराच्या तोंडावर त्यांचा काळ पट्टे परजीत उभा होता. फौजेचा लोंढा पुढें घुसला. फिरंगोजीचे पट्टे अन् मावळ्यांच्या समशेरी गिरगिरूं लागल्या. खचाखच मोंगलांची छाताडं चिरफाळूं लागली. भयंकर जंग सुरू झालं. खिंडीत प्रेतांचा खच पडूं लागला. मोंगलांचें पाऊल मागें मागेंच पडत होतें ! मावळे सर्व विसरले होते. ना भूक, ना तहान, ना श्रम !

एकेक हल्ला ओसरला कीं खान छावणीतून नवी ताज्या दमाची फौज सोडीत होता. फिरंगोजीला खूप जखमा झाल्या होत्या. त्याचे मावळेही बरेच पडले होते. मोंगलांचं पाऊल त्यांनीं आंत पडूं दिलं नाहीं.[१६]

खानाच्या नव्या नव्या टोळ्या चालून येत होत्या. पण किल्ल्यात मात्र तोच फिरंगोजी अन् तेच मावळे एकांगी लढत होते. सतत लढत होते.

सूर्य मावळतीला कलला. खान विस्मित झाला. येवढं मोठं खिंडार पाडून अन् येवढे मोठे हल्ले चढऊनही अजून किल्ला चिरेबंदच ना ? मातीचा कोट ढासळला तरी छातीचा कोट उभाच होता !

सूर्य मावळला. फिरंगोजीनें अन् मावळ्यांनीं मिळून आतांपर्यंत अनेक हल्ले पिटाळून लावले होते. शेंकडों हशम जखमी केले होते. सुमारें सहाशें हशम ठार केले होते ![१७]

दिवस मावळला. रात्र झाली. मोंगलांनीं हल्ले बंद केले ![१८] खिंडार पाडून अन् जिवापाड लढून--खानाचा निरुपायच !

ह्या उडालेल्या बुरुजांतच खानाच्या विलक्षण मनसुब्याचें रहस्य दडलेले होते. कांहींही करून जेव्हां किल्ला काबीज होईना तेव्हां त्याच्या डोक्यांत

विचार आला कीं आपल्या छावणीपासून किल्ल्याच्या बुरुजापर्यंत अगदीं गुप्तपणें भुयार खणीत जायचें व मग खाली बुरुजाला खूपच प्रचंड सुरुंग ठासून बुरुजच उडवून द्यायचा म्हणजे एवढे मोठे खिंडार पडेल कीं बुजविणेच अशक्य! मग किल्ला आपलाच!

अशा रीतीनें खानाने आपल्या सरदारांकडून माणसें लावून अहोरात्र खणती लावली. आणि अखेर भुयार तयार केले. सुरुंग ठांसला. ह्या गोष्टीचा फिरंगोजीला सुगावा लागणें शक्य तरी होतें काय? सुरुंग ठासून पुरा होतांच लांबच लांब वात जोडून तिला बत्ती देण्यांत आली!—— तो हा सारा प्रताप![१५]

शेवटचा हल्ला परतविल्यावर फिरंगोजीची पट्टेबाजी थांबली. त्यानें भोंवती पाहिलं. अंधार पसरत होता! केवढं मोठं खिंडार आ पसरून बसलं होतं. असंख्य मावळे मरून पडले होते. अनेक जखमी होऊन विव्हळत पडले होतें. फिरंगोजीचं काळीज करपलं ते पाहून. सबंध दिवसभर लढूनही तो दमला नव्हता. त्याला चिंता होती उद्यांची. उद्यां काय होणार? आज तग धरला, पण उद्या? आपली माणसं थोडी उरली. बायका-पोरासह सारा संसार उधळला गेला असता तरी फिरंगोजीला येवढं वाईट वाटलं नसतं, पण ते खिंडार अन् ते मावळे प्यारे साथीदार—! त्याला सहन होईना. पुढचं सारं दुर्दैव त्याला दिसत होतं. खानाची फौज किती तरी. उद्यां मरणच! पण तरीही शरण जाण्याची कल्पनाही त्याला अन् कोणालाच शिवत नव्हती. महाराजांची माणसं!

साऱ्या रात्रभर फिरंगोजी खिंडारावर उभा होता. खिंडार बुजवावं तर——किती बुजवायचं? कसं बुजवायचं? आभाळच फाटलं होतं! एकच आशा होती, अजूनही महाराजांकडून कुमक येईल! कुमक येईपर्यंत किल्ला सांभाळायचा!

काळी रात्र सरली. पहाटेपासूनच फिरंगोजी पट्टे चढवून खिंडारावर उभा ठाकला. त्याच्याबरोबर त्याचे मावळे. आतां निर्वाण!

उजाडलं. जोराची तयारी करून मोंगलांची तुफान सेना गर्जत गर्जत खिंडाराकडे भरधांव निघाली.[१६]

फिरंगोजीनें पट्टे उंचावून आपल्या मावळ्यांकडे पाहिले. त्या चिवट निष्ठावंतांनीं आरोळी दिली. 'हर हर महाऽदेऽव!' फिरंगोजीला कमालीची वीरश्री चढली हातांतले पट्टे परजवीत तो ओरडला, "जय भवानीऽ! येकबी सोडू नगा! समदी कापा!"

मोंगल आले! दिशा दणाणल्या. प्रचंड लोंढा खिंडारांत घुसला. फिरंगोजीची पाती सफेजंगीने फिरूं लागली. मोंगलांची मुंडकी खडाखड उडूं लागली. मोंगलांनी अगदीं निकरानं हल्ला चढविला. फौज अफाट. माराही अफाट. मोंगलांच्या लाटा खिंडारावर धडकू लागल्या. खासा शाहिस्ताखान हत्तीवर हौद्यांत बसून किल्ल्याच्या दरवाजाकडें निघाला.

मोंगल खिंडारातून आंत घुसले! फिरंगोजीचं काळीज फाटत होतं ते पाहून. ओरडून ओरडून तो आपल्या लोकांना प्रोत्साहन देत होता. अक्षरशः कुंभाराच्या चाकासारखा गर गर गर गर पट्टे फिरवीत मोंगलांच्या फौजेंत घुसत होता. फटा फट मोंगल त्याच्या पट्ट्याखाली मरत होते. त्याच्या भोंवतीं दुष्मनांचा वेढा पडला होता. मावळेही त्याच्याच सारखे.

मोंगल आंत घुसून किल्लाभर पांगले. कांहींनी दरवाजा आंतून उघडण्याकरितां धांव घेतली. दरवाजाला आंतून घातलेल्या कड्या व तुळवटांचे अडसर त्यांनीं काढले. कर् कर् कर् कर् आवाज करीत दरवाजा उघडला गेला! खासा शाहिस्ताखानचा हत्ती सोंड उंचावून किल्ल्यांत धांवत निघाला. [२०] खानाचें घोडदळ मागोमाग किल्ल्यांत घुसलें.

खानाचा हत्ती दरवाजांतून किल्ल्याच्या आवारांत शिरला. आणि खान चकीतच झाला! [२१] शेंकडों मोंगलांच्या गराड्यांत फिरंगोजीची पट्टेबाजी चालू होती. त्याला ठार करण्याकरितां सर्व बाजूंनीं त्याच्यावर सपासप घांव पडत होते, पण सारे वार उडवून लावून तो माणसें मारीत होता. भयंकर आरडा ओरडा सर्वत्र चालला होता. मावळे ठाई ठाई झुंजत होते. [२२]

फिरंगोजीची ती रुस्तुमी पाहून खान थरकला, दिपला, खूष झाला [२३]!! हे असलं शौर्य त्यानं कधी पूर्वी जन्मांत पाहिलंच नव्हतं! हें पहिल्यांदाच! खान हौद्याच्या कठड्यावर हात ठेवून हत्तीवर उभा राहिला. त्याने एक

हात उंच केला अन् तो ओरडला, " फिरंगोजी ऽ! ऐ किलेदार ! ऐ शमसीरबहाद्दर ! ठाय्रोऽ ! तुम ठाय्रो ऽ!! "

खानाचा पुकार ऐकून मोंगली गराडा मागें मागें हटत गेला. फिरंगोजीचे पट्टे थांबले ! त्याच्या धिप्पाड देहांतून रक्त आणि घाम थळथळत होता. श्वास घेण्यासाठीं नाकपुड्या अपुऱ्या पडत होत्या. नागाच्या फुत्काराप्रमाणें श्वास चालला होता. नाकपुड्या फुगत होत्या. छाती खालीवर होत होती. अंगावरच्या शिरा ताड ताड उडत होत्या. डोळे लाल लाल झाले होते. पट्ट्यांची पाती रक्तांत निथळत होती. फिरंगोजीनें रोखून खानाकडे पाहिले.

खान दिपला होता. मान डोलवीत हंसून तो फिरंगोजीस म्हणाला, " शाब्बाश बहाद्दर शाबाश ! सुब्हानल्ला ! बहादुरी इसीका नाम है ! फिरंगोजी तुम जैसा जवां मर्द हम अपनी जिंदगीमें पहली बार देख रहे हैं ! हम आज बहोत खूष हैं ! मांगो ! तुम क्या चाहते हो ? तुम हमारे साथ दिल्ली चलो ! तुम्हे शहेनशाहसे जागीर दिलवा देंगे ! " २३

" न्हाई ! माझ्या राजानं मला काय कमी केलं हाये ! त्येची भाकर खाल्ली, त्येच्याकरतांच मरन ! " फिरंगोजी उफाळून म्हणाला.

" तुम जैसा कोहे-नूर इस् दकनकी पत्थरोंमें सडता पडा रहे यह देख कर हमे सख्त अफसोस हो रहा है ! बोलो ! मूँह मागा इनाम मिलेगा तुम्हे ! "

" मला नग ! "

" हम तुमसे इल्तेजा करते हैं ! किलेदार तुम देख ही रहे हो के किला हमारी फौजोंसे पूरी तरह घिर चुका है ! अब लढना फुजूल है ! इस् तरह तुम अपनी बेशकीमत जान बेकार न गवाँओ ! कहो क्या तमन्ना है ? "

आतां कसली इच्छा ? आतां कशाची अपेक्षा ? आतां कोणती ईर्षा ? सारंच गेलं ! फिरंगोजीनें दुःखी नजरेनें थरथरती मान सभोवार फिरविली ! बघवत नव्हतं ! सबंध किल्ला शत्रूनें व्यापला होता !

" किलेदार ! तुम अपने राजाके पास बा–खुशी जा सकते हो ! जाओ !

हम तुम्हे इजाजत दे रहे हैं ! जाओ जाओ ! लेकिन यह याद रहे के हम तुम्हारे इस्तकबालके लिये हर वक्त—बल्के आधी रातमें भी तैय्यार हैं ! तुम जाओ ! मगर हम तुम्हारी हर दम राह देखा करेंगे ! " खानानें दिलदारी दाखविता दाखविता आमिषाचा शेवटचा गळ फेकला.

" न्हाई न्हाई !—असलं पाप ? मुंडकं उडवा त्येच्यापरीस ! "

" नहीं नहीं दोस्त ! हम तुम्हारा रास्ता खुला कर रहे हैं ! " [२४]

फिरंगोजी जड अंतःकरणानें निघाला. आपली उरलेली माणसं, जखमी माणसं अन् निशाण काढून घेऊन तो जड पावलानें बाहेर पडला.[२५] त्याचं अंतःकरण ढसढसा रडत होतं. अखेरच्या मायेनें त्यानें वळून आपल्या लाडक्या किल्ल्याकडे पाहिलें. शिंगांचा आवाज ललकारला अन् सरकन् मोंगली निशाण किल्ल्यावर चढलें ! फिरंगोजीला बघवेना ! त्याच्या हृदयांत जणूं बाणच घुसला !

फिरंगोजी राजगडाकडे निघाला.

आतां महाराज आपल्याला काय म्हणतील ? त्यांना तोंड कसं दाखवायचं ?

'फिरंगोजी राजगडावर आला. महाराज सदरेवर बसले होते. खाली मान घालून फिरंगोजी निघाला.

सदरेच्या दरवाज्यांत फिरंगोजी आला. महाराज समोर चौथऱ्यावर लोडाशी बसले होते. फिरंगोजीला वर बघवेना ! मूर्तिमंत कारुण्य त्याच्या मुद्रेवर गोळा झालं होतं. मोठ्या मुष्किलीनें त्यानें मान वर केली. एकच निमिष ! महाराजांच्या नजरेला त्याची नजर भिडली.

" महाराऽऽज ! " फिरंगोजी महाराजांकडे धांवला. त्यानें महाराजांचे पाय धरले.

" महाराज ! माझी सेवा कुचराईची झाली ! म्यां कमनशिब्यानं किल्ला गमाविला ! मी गुन्हेगार हाये ! द्याल ती शिक्षा भोगतो ! " [२६]

"छे छेः! फिरंगोजी! वा!–" महाराजांनीं त्याला चटकन् उठविलें. "तूं शर्थ केलीस! शाबास आहे तुझ्या बहाद्दुरीची! येवढा दम धरून कोट लढविलास हीच रुस्तुमी लाखा मोलाची केलीस! अरे हा खान चार दिवसाचा पाहुणा! चाकणचा कोट काय बरोबर घेऊन जाईल?" आणि फिरंगोजीच्या खांद्यावर दोन्ही हातांनीं थोपटीत महाराज हंसले.

"महाराज!" फिरंगोजीचा कंठ दाटून आला.

---

* आधार :--(१ व ९ ते १९) आलमगीरनामा, मुन्तखबुल्लुबाब, शिवचरित्र फार्सी वृत्त-संग्रह खंड ३ रा; (२):--शिवभारत, शि. का. प. सा. सं, (३ ते ८):--शिवभारत; (२० ते २७):-- निरनिराळ्या अनेक बखरींच्या आधारे. फिरंगोजी नरसाळ्याचा उल्लेख फक्त बखरींतच आला आहे.

शाहिस्ताखानानें चाकणला नांव दिले– किल्ले; इस्लामाबाद ![1] किल्ल्याची किल्लेदारी ऊझबेगखानास दिली.[2] सुरुंगानें उडालेला बुरूज बांधण्याचा हुकूम देऊन खान पुण्यास निघाला.

खान पुण्यांत दाखल झालां[3] व त्यानें विजयाच्या दिमाखांत लाल महालांत प्रवेश केला.

आतां अगदीं आसानीनें उरलेली मराठी दौलत खतम करूं, अशी खात्री खानाला वाटूं लागली. एवढा पावसाळा संपतांच पुन्हा जोरानें मोहीम करून उरलेसुरले सर्व किल्लेकोट घेण्याचा त्यानें विचार केला. तो आतां वाट पहात होता पावसाळा संपायची.

हा महिना श्रावणाचा होता. सरसरून श्रावण–सरी कोसळत होत्या. मावळमुलुखांत जंगल दाट. पळस, साग, पिंपरी, हिरडा, बेहडा, बाभूळ, जांभूळ अन् वेळूची करकरणारी बेटं फार दाट. गवत गळ्याला भिडतं. माणूस झाकून जातो. दिसत नाहीं पलीकडे वाघरूं दडलंय का रानडुक्कर पडलंय ते. एकदा पाऊस सुरू झाला कीं धों धों. उडत्या पांखराच्या पिसावर शेवाळं उगवावं. डोंगरावरून खळखळ पाणी सतत वहातं. भातखाचरं आंबेमोहरानं घमघमतात. सगळीकडे हिरवी हिरवी गार मखमल दिसते.

आमच्या मावळांतल्या नद्या अन् ओढे अति रंगेल. तांबूस पाण्यानं एकदा दुथडी भरून अंगाभवती भोंवरे घेत घेत वाहूं लागले कीं बिशाद काय कुणी आंत पाय घालील. कुणी हटवादीपणानं टाकलाच पाय, तर खेंचला गेलाच तो. पाण्याला अति अति ओढ. हत्ती नाहीं ठरायचा मग माणसाचं काय ! कातणीनं करंजी कातरावी तसे पाण्याच्या धारेनें खडक कातरले जातात. सह्याद्रीवरून खळाळणारं पाणी वळसे घेत, गिरक्या मारीत, उड्या टाकीत ओढ्यांना सामील होतं. हे मस्तवाल ओढे नद्यांना सामील होतात. नद्या त्यांची वाटच पहात असतात. मावळच्या नद्या रुंदीला लहान. इथून तितक्यां. पण भारी अवखळ. भोंडला खेळणाऱ्या परकऱ्या पोरीच जशा.

आई रागवायची नाहीं. वडील बोलायचे नाहींत. उलट म्हणतील, जाऊं दे, बागडूं दे ! सह्याद्रि आणि जमीन या नद्यांना अन् ओढ्यांना उतारावर सोडतात.

हे ओढे म्हणजे जणूं सह्याद्रीवरच्या तांबूस मातीत अंग घुसळीत इतस्ततः हुदडणारी मावळी इब्लीस पोरटींच. कधीं सरळ डोंगर उतरणार नाहींत. ठोकरा देत देत डोंगरावरचे मोठमोठे ओबडधोबड धोंडे आपल्यावरोबर खालीं आणतील अन् मग फरा फरा खेंचीत नद्यांकडे घेऊन जातील. त्या मोठ्या प्रवाहांत कोसावारी त्या धोंड्यांची फरफट चालते. ह्या धिंगामस्तींत त्या धोंड्यांचें सारे काने कोपरे तासून घासून निघून त्यांचं अंग कसं तुकतुकीत बनतं. गोल बनतं. गोटे !

आणि मग आश्विन उलटला कीं नद्यांचा अल्लडपणा कमी होतो. ओढ्यांच्या दांडगाईला वचक बसतो. साऱ्या नद्या संथ, मुग्ध अन् संयमी बनतात. लग्न झाल्यावर सासरी निघालेल्या माहेरवासिणीच जणूं.

पावसाळा संपतो. गुडघा गुडघा माजणारा चिखल वाळतो. एरवी भातखाचरांत पावलांचे खचकन् लचके तोडून तिरपे तिरपे नाचत नांग्या उभारणारे खेंकडे बिळांत पळतात. भातं हळदीसारखी पिकून काढायला येतात. वाटा रहदारीला त्यांतल्या त्यांत सोयीच्या बनतात. जनावरांना अन् माणसांना खायला-प्यायला मोप असतं.

हे सारं जसं मावळांत तसंच खाली कोंकणांत. कोंकणपट्टी व मावळपट्टी जिंकायला खान उत्सुक झाला होता. फक्त पावसाळा संपायचा अवकाश. निसर्गाच्या ह्या धिंगाण्यांत अन् भरपावसाळ्यांत शिरण्याची काय छाती होती खानाची ! मावळ-कोंकणच्या नदी-नाल्यांनीं, डोंगर दऱ्यांनीं, रानावनांनीं अन् चिखल-शेवाळ्यांनीं खानाला रडवलं असतं.

आणि महाराजही पावसाळा संपायचीच राजगडावर वाट पहात होते. पुण्यांत येऊन बसलेल्या ह्या शाहिस्ताखानाचं काय करावं या विचारांत महाराज होते. अनेक दावेदार महाराजांच्या मनांत सलत होते. जे जे उठले होते त्या सर्वांचा कांटा काढण्याचा बेत महाराजांच्या मनांत सतत घोळत होता. फक्त पाऊस थांबायची वाट.

दसरा झाला. दिवाळी गेली. पावसाळा पुरता निवळला. चिखल चाळला. डोंगरमाळ तापूं लागले.

खानाच्या फौजेवर नवी तुकतुकी चढली. पुण्यांत खानाच्या लष्करांत हशम ढालाइतांची नव्या मोहिमेसाठीं तयारी सुरूं झाली. लाल महालांत खल सुरू झाला. राजगड, तोरणा, सिंहगड, लोहगड हे डोंगरावरचें किल्ले घेण्याआधी कोंकणपट्टी जिंकून घ्यावी असं खानाला वाटलं.[४] त्याला वाटलं हेंच फार सोईचं ! कोंकण घेतलं कीं शिवाजीचं आरमार आपोआप खलास होईल–बस् बस् कोंकणच !

अगदीं एकान्तात लाल महालांत खान जाऊन बसला आणि त्यानें आपला प्रख्यात सरदार कारतबलखान ह्यास तश्रीफ फर्माविली.

कारतलबखानास हुजूर हाजीर होण्याचा हुकूम होताच ताबडतोब तो लाल महालांत खानाच्या एकांतीच्या खोलीत नमूद झाला. आपल्याला काय हुकूम होणार आहे हे जाणण्यास कारतलब फार उतावीळ झाला होता.

शाहिस्ताखानापुढें कारतलब कुर्निसात करून उभा रहातांच खानानें त्यास म्हटले, " कारतलबखान !— "

" परवरदिगार ! " मान लववून कारतलबखान उद्गारला.

" हम तुम्हारे कर्तब अच्छी तरह जानते है ! तुम्हारी शमशीर बे मिस्ल है ! और इसी लिये कोंकनपर कब्जा करनेकी जिम्मादारी हम तुम्हारे हाथ सोप रहे हैं। चौल, कल्यान, भिवंडी, पनवेल और नागोठना यह सारे शिवाजीके मशहूर मुकामातपर तुम काबीज हो जाओ ! हमें पूरा भरोसा है के तुम फतह पाकर बादशाहकी खुषनूदी हासील करोगे ! " शाहिस्ताखान म्हणाला.

" खुदाकी मेहरबानी और हुजूरकी दुआसे मैं जरूर इस मुहीममें कामियाब हो जाऊंगा ! " कारतलब म्हणाला.

" जीते रहो बहाद्दूर ! तुम्हारे कर्तबकी कद्र की जाएगी ! तुम्हारी इमदादके लिये बडे बडे सूरमा दीये जाएंगे ! " शाहिस्ताखान खूष होऊन म्हणाला.

कारतलबखानानें नम्रतादर्शक स्मित करीत मान लवविली.

शाहिस्ताखान पुढें म्हणाला, "अमरसिंह, चौहान, जसवंतराव वगैरह सरदार तो तुम्हारी मदद करेंगेही; लेकिन शेरनी से भि बढकर कलेजा रखनेवाली रायबागन भी तुम्हारे साथ आएगी!"

"यह हुजूरकी मेहेरबानी है! हुजूर यकीन कर लें के जल्द अज जल्द शाही झंडे कोंकनके हर किलेपर लहराते दिखाई देंगे! जमींपरहि क्या, समंदरपर भी मैं अपनी धाक बिठा कर छोडुंगा ऐसी मुझे उम्मीद है!" कारतलब हिरिरीनें म्हणाला.

शाहिस्ताखान ह्यामुळें तर बेहद्द खूष झाला. आपण कोंकण-मोहिमेसाठीं अगदीं अचूक सरदार निवडला असें त्याला वाटलें. तो कारतलबला म्हणाला, "बस्! हम तुम्हारी इस हिम्मतको देखकर बे इन्तहा खूष हुए! खुदा तुमपर रहमत की बारीश बरसाएगा! तय्यारी करो! जो जो चीज तुम्हे दरकार हो, फौरन भरपूर मिल जाएगी!"

"हुजूर इजाजत दे दें!" कुर्निसात करीत करीत कारतलबखान मागें मागें पावलं टाकीत पाठ न दाखवितां गेला.

आतां ह्या नव्या मोहिमेवर कारतलबखानाचें लक्ष खिळून गेले. ही मोहीम फत्ते केली कीं बादशाहाची मेहरबानी बरसेल अन् मग—? मनोराज्य!

कारतलबखानाच्या शौर्याबद्दल शंकाच नव्हती. त्यानें आजपर्यंत अनेक मोहिमांत भाग घेतला होता. सारी हयात शिपायीगिरींत घालविली होती. त्याचा बापही असाच शूर होता. खुद्द औरंगझेब स्वतः जेव्हां औरंगाबादेस सुभेदार होता तेव्हांपासून कारतलब दख्खनच्या मुलुखांत वावरत होता. अजूनपर्यंत त्यानें डोंगराळ मावळ अन् कोंकण मुलुखाचं मात्र तोंडसुद्धां पाहिलं नव्हतं. पण नसलं पाहिलं म्हणून काय झालं? डोंगर डोंगर तरी असा काय अवघड असतो? चढत राहिलं कीं आपोआप वर पोहोंचतोच माणूस!! कारतलब आतां ह्या मोहिमेच्या निमित्तानें प्रथमच डोंगराळ मुलुखांत शिरणार होता.

खानाचं घराणं अस्सल ऊझबेग रक्ताचं होतं. त्यानें मोंगल सल्तनतीचा एक प्रख्यात शत्रु गालीब याचा पराभव केला होता. तसेंच शाहिस्ता-

खानाबरोबर दख्खनमध्यें आल्याबरोबर त्यानें प्रचंडपूर काबीज केलें होतें. शाहिस्ताखानाची त्याच्यावर मोठी मेहेरनजर होती.

कारतलबखान मोहिमेच्या तयारीस लागला. शाहिस्ताखानानें अमरसिंह, चौहान वगैरे सरदारांसह रायबागिणीचीही योजना कारतलबच्या फौजेंत केली. ही नवी मोहीम ऐकून रायबागन कांहींच बोलली नाहीं ! ती मुकाट्यानें कारतलबबरोबर जाण्यास तयार झाली. सर्वच फौजफाटा, हत्ती, तोफा इत्यादींची तयारी झाली. खानाचा निरोप घेऊन कारतलब निघाला. फौज चिक्कार घेतली होती.

ही मोहीम कुठें जाणार, कशी कशी जाणार, मुक्काम कोठें कोठें पडणार वगैरे सर्व गोष्टी अगदीं गुप्त ठेवण्यांत आल्या होत्या. पण महाराजांचे हेर मोठे पायाळू होते. नाजूक पावलांनीं कुठं फिरतील याचा कांहीं नेम नव्हता. ही मोहीम निघणार हे त्यांना समजलं. कारतलबनें खूप गुप्तता ठेवायची कोशीस केली होती. तरीही ते मराठी हेरांना समजलं ! किती चोरून ठेवणार ? महाराजांचे हेर तिखट कानाचे फार. असे होते एकेक कीं मनांत आणतील तर खानाची बायको खानाशी काय बोलणार आहे हे सुद्धां आधींच टिपून आणतील !! ह्या हेर-खात्यावर महाराजांनीं एक महाबिलंदर बहुरुप्या नेमला होता. त्याचं नांव बहिर्जी नाईक !

कारतलबखान कुंभारवेशीतून फौजेसह बाहेर पडला. भांबुर्ड्यांत नदी ओलांडून आला अन् तळेगांवाकडे ( दाभाड्यांचं तळेगांव ) त्यानें आपला मोर्चा वळविला.

हेर राजगडाकडे उड्या टाकीत गेले. शाहिस्ताखानानं अगदीं एकांतांत कारतलबला सांगितलेला बेत महाराजांस खडान्‌खडा समजला ! नेताजी पालकर ह्या वेळीं राजगडावरच होता.

राजगडावर शिकारीची तयारी सुरुं झाली !

कारतलबच्या फौजा तळेगांवाहून वडगांवाकडे व वडगांवाहून मळवलीकडे चालूं लागल्या. लोहगडच्या पलीकडून दक्षिणोत्तर जाणाऱ्या मार्गानें तुंगारण्यांत उतरावयाचें व तेथून सबंध सह्याद्रि चढून उंबरखिंडीतून खाली कोंकणांत उतरावयाचें असा कारतलबचा बेत होता ! हा मार्ग अत्यंत

अडचणीचा, अतिशय दाट अरण्याचा, अतिशय अवघड, डोंगर कड्यांचा, अगदीं आडवळणी, अरुंद, निर्जन आणि महा भयाण होता ! ह्या वाटेनें कोंकणांत येवढी मोठी फौज, हत्ती, सामान-सुमान, तोफा अन् उंट घेऊन उतरण्याचा कारतलबला कोणत्या ( वेड्या ) पिरानं दृष्टांत दिला खुदा जाणे ! ही वाट म्हणजे मरायची वाट ! पण एकंदरींत कारतलबला ' हेच ' कमी !

ह्या उंबरखिंडीखाली तुफान अरण्य होतं. आणि खुद्द ह्या उंबरखिंडी-तून जाणारी वाट इतकी अवघड व अरुंद होती कीं एका वेळीं एकेकच माणूस पुढें जाऊं शकावा. कारतलबला ज्या अरण्यपंडितानं ही वाट सुचविली त्याची तारीफ काय अन् किती करावी ? परमेश्वरा ! किती रे कंजूष तूं ? ह्या मोंगलांना थोडीशी अक्कल दिली असतीस तर तुझं काय गेलं असतं ? का तूं देत होतास, पण ' जरूर नाहीं आम्हांला ! ' असं म्हणून हेच निघून गेले ? तूंच जाणे खरं काय ते !

कारतलबखान रात्रीचे मात्र मुक्काम करी. दिवसा पुढें कूच करी. त्यानें लोहगडापासून थोड्या दूर अंतरावर असलेल्या डोंगरातल्या वाटेनें तुंगार-ण्यात उतरण्याकरितां फौज वळविली.

रायबागनला हें दिसत होतं. अरण्याला सुरुवात झाली. अतिशय दुष्कर वाट सुरू झाली. तेथून रीघ निघतां निघतां हाल होऊं लागले. पहिली चुणुक कारतलबला दिसूं लागली. कधीं जन्मांत डोंगर न पाहिलेले हजारो हशम डोंगरांत शिरत होते.

मोठ्या यातायातीनें खान ऐनमध्यावर आला. अजून उंबरखिंडीकरितां सबंध पर्वत चढावयाचाच होता. रायबागनला हें कांहीं धड लक्षण दिसेना ! फौजेतले लोक हैराण झाले.

राजगडावर महाराजांनीं नेताजीस खुणावलें. बाकीचे सौंगडीही महारा-जांची मान हलतांच उठले. निघण्याची तयारी सुरू झाली. महाराज स्वतःही शिलेखान्यात गेले.

एक हजार मावळा राजसदरेपुढें तरवारी बांधून जय्यत तयार झाला. नव्या स्वारीची तयारी म्हणजे दसरा-दिवाळीसारखा आनंद.

महाराज निघाले. त्यांनीं देवास आणि आईसाहेबांस दंडवत घातलं. नेताजी वगैरे सौंगड्यांनींही दंडवत घातलं.

" औक्षाचे व्हा बाळांनो ! यश घेऊन या ! " आईसाहेबांनीं आशीर्वाद दिला.

सदरेखाली घोडे तयार होते.

महाराजांनीं अंगांत पोलादी चिलखत घातलं होतं व मस्तकावर पोलादी शिरस्त्राण घातलं होतं. शिरस्त्राणावर भाल्यासारखे टोंकदार पातें होतें. मानेवर जाळीदार झालर रुळत होती. मनगटावर, छातीवर, पाठीवर व कमरेवर पोलादाच्या अत्यंत सुबक नक्षीच्या पोलादी पट्ट्या चिलखतांतच गुंफिलेल्या होत्या. पायांतल्या पांढऱ्या सुरवारीवर ते किंचित् अंजिरी झांक असलेलं चिलखत अन् शिरस्त्राण महाराजांस फारच शोभून दिसत होतं. त्यांनीं कमरेवर पल्लेदार तरवार लटकाविली होती. पाठीवर विशाल ढाल बांधली होती. आणि हातांत हातभर फाळ असलेला भाला घेतला होता. कानांत मोत्यांचे चौकडे हलत होते. पायांतल्या कणखर चढावाच्या नांग्या कमानदार वळलेल्या होत्या. भव्य कपाळ, गरुडासारखं घवघवीत नाक, चढणीदार भिंवया, अत्यंत पाणीदार डोळे, काळीभोर अन् अतिशय खुलून दिसणारी दाढी आणि मुखावर किंचित् स्मित—!

महाराज पायऱ्या उतरून पटांगणांत आले. मोतद्दारानें घोडा जवळ आणला. घोडा असा होता कीं बस् ! महाराजांनीच बसावं. महाराजांनाच शोभावा. महाराजांनी रिकिबीत पाय घातला. खोगिराच्या पुढच्या दोन्हीही बाजूस तीक्ष्ण बाणांनी भरलेले भाते बांधलेले होते. महाराज घोड्यावर स्वार होतांच एकजणानें धनुष्य महाराजांच्या हातीं दिले. तें महाराजांनी खांद्यावर लटकाविले.

नेताजीही स्वार झाला. मावळ्यांच्या टांगा घोड्यावर पडल्या. महाराजांनीं टांच मारली. राजगडाचा दरवाजा उघडला गेला. खडाड खडाड टापा वाजवीत महाराजांचा घोडा दरवाजाबाहेर पडला. मागोमाग नेताजी पालकर वगैरे साथीदार अन् मावळे दौडत निघाले.

महाराज अन् महाराजांचा सरसेनापती बरोबर सव्वा वर्षानंतर पुन्हा एकदम स्वारीवर निघाले. रुस्तुमेजमानवर असेच गेले होते.[५]

कारतलबखान सह्याद्रीचा घाट चढून जाऊं लागला. त्याच्या मागोमाग सारी फौज धडपडत चढत होती. कारतलबच्या बरोबरचे सरदार व रायबागन हे उंबरखिंडीची वाट चढले. सामानाचे बैल अन् उंट डोंगर चढतांना पडूं लागले. अनेक माणसेंही कोलमडली. पण अखेर मोठ्या कष्टानें उंबरखिंडींतून पलीकडे कोंकणच्या अंगाला उतरूं लागली. चढत असतांना इतकी भीति वाटत नव्हती. उतारावरून उतरतांना मात्र कारत-लबच्यासकट प्रत्येकाला वाटत होतं कीं, आतां आपण एकदम तोल जाऊन गडगडत खाली जातो कीं काय ! माणसं तोल सांवरत, चटकन् एकाद्या झुडपाला पकडून जीव सांभाळून उतरत; पण जनावरांचें फार हाल होत होते. कारण चार पाय होते त्यांना !

सर्वजण अतिशय दमून घामाघूम झाले. तहानेनें घसे कोरडे पडले. उंबरखिंड उतरून सह्याद्रीच्या कोंकण-पायथ्याशी असलेल्या गहन अरण्यांत कारतलब फौजेसह पोहोंचला. झाडी अतिशयच दाट होती. पाण्याविना सर्वांचा जीव कासावीस होत होता. सबंध पावसाळा मुसळधार पडतो ह्या कोंकणांत अन् वर मावळांतही पण पावसाळा संपला कीं पाण्याचा खडखडाट ! डोळ्याला लावायला पाणी मिळायचं नाहीं नद्या नाल्यांत. इथं खानाची तर हजारांनीं फौज अन् जनावरं होती. पाणीच मिळेना. जिभा टाळ्याला चिकटल्या. लोक तडफडूं लागले.

कारतलबनें तशाही स्थितींत पुढें कूच करण्याचा हुकूम दिला. दुसरं काय करणार ? रायबागन एक अक्षरही न बोलतां निमूटपणें सारं पहात होती अन् पुढें चालत होती.

फौज कशीबशी चालत अरण्याच्या ऐन गाभ्यांत आली. अन् एकदम कर्कश्श शीळ वाजली ! लगेच शिंगे किंचाळली ! खानाची फौज अतिशय भयभीत होऊन इकडे तिकडे पहातेय न पहातेय तोंच झाडींत दडलेले, झाडावर दडलेले अन् सांदी सपाटीला दडलेले शेंकडों मावळे तरवारी उपसून खानाच्या फौजेवर धांवले ! एका अंगानें तर खुद्द नेताजी पालकर उड्या टाकीत येत होता.

कारतलबखानाची आतां मात्र जीभ कोरडी पडली. तो, रायबागन व आणखी कांहीं माणसं एका बाजूस होती. त्या अरण्यांत, अफजल वधाच्या वेळीं झालेल्या जावळी खोऱ्यांतल्या कत्तलीची दुसरी आवृत्ति होऊं लागली. लढाई पेटली. पण मोंगलांत जीवच उरला नव्हता लढायला. मावळे केव्हांपासून आधीच तेथें येऊन वाट पहात बसले होते. ते ताजे तवानें होते.

कारतलबचा अमरसिंह नांवाचा सरदार मराठ्यांशीं लढण्याची शिकस्त करीत होता. त्यानें फार धडपड चालविली. पण मराठी फौज फार जोरावर. त्यांनी मोंगली फौजेची इतकी भयंकर कत्तल मांडली कीं आरडाओरड्यानें त्या अरण्यांत दुसरं कांहीं ऐकूंच येईना. कारतलब अगदीं घाबरून गेला. रायबागन अजूनही निमूटच होती.

महाराज उंबरखिंडीच्या वाटेवर येऊन उभे राहिले. ते घोड्यावरच आरूढ होते. त्यांच्या भोंवतीं सुमारें पन्नास हत्यारबंद मावळे उभे होते. एका हातांत घोड्याचा लगाम अन् दुसऱ्या हाताची मूठ कमरेवर ठेवून महाराज भेदक नजरेनें तो अरण्यात चाललेला संग्राम पहात होते.

कारतलबच्या फौजेंत जसवंतराव कोकाटे, गाढे वगैरे मराठी सरदारही होते. ह्या सरदारांबरोबर मराठी सैन्यही होतेच. हे मराठे शिपायी मोठे डोकेबाज होते. महाराजांच्या लोकांनीं तुफान तांडव मांडलेलं पाहिल्यावर अन् आपली धडगत नाहीं असं दिसल्यावर हे मराठे शिपायी ओरडून मावळ्यांना सांगूं लागले कीं आम्ही तुमच्याच पैकीं आहोंत ! आम्ही महाराजांचेच शिपाई आहोंत ! !

पळून जायला वाटही नव्हती, वेळही नव्हता अन् त्राणही नव्हतें. ही लढाई एक कोसाच्या परिसरांत चालली होती.

कारतलबखानाकडे सारखे आघाडीकडून हशम धांवत दौडत येत होते आणि पुढें काय भयंकर प्रकार चालले आहेत ते केविलवाण्या अन् घाबरलेल्या मुद्रेनें सारखे येऊन सांगत होते. खानाची अवस्था विचित्र झाली होती. पुढेंही जातां येईना, मागेही फिरतां येईना. तेवढ्यांत नवी खबर घेऊन त्याचा एक हशम धांवत आला आणि त्यानें खबर दिली कीं खुद्द शिवाजी आपल्या पिछाडीस खिंडीच्या वाटेवर येऊन उभा राहिला.

आहे. खान एकदम चवताळून ओरडला. " लडते रहो ! शिवाजीकी बिसातही क्या है ! फतह हमें ही मिलनेवाली है ! जावो जावो लडते रहो ! "

खानाच्या शेजारीच रायबागन घोड्यावर स्वार होऊन उभी होती. आतांपर्यंत ती एक अक्षरानेंही बोलली नव्हती. मोंगली फौजेची भयंकर दाणादाण ती पहात होती. तिची खात्रीच झाली कीं येथून निभणं कठीण आहे. पण खानानें लढण्याचा हट्ट धरला आहे.

" बहादुरो ! लढते रहो, लडते रहो ! " खान ओरडत होता.

आतां मात्र रायबागनला गप्प बसवेना. ती एकदम खानाकडे वळून मोठ्यानें म्हणाली, " सिंहाच्या जबडयांत सांपडल्यावरही अजून घमेंड उतरली नाहीं कां ? प्रत्यक्ष शिवाजीच्या नालबंद चढावाखालीं सारी मोंगली फौज चिरडली जात आहे ! पहा ! मागें, पुढें, उजवीकडे, डावीकडे शिवाजीच्या सैन्यानें काय भडका उडविला आहे तो ! आणि तुम्ही अजूनही लढायचेच हुकूम सोडता ? " रायबागन म्हणाली.

" रायबागनसाहबा ! मेरी हिम्मत शिकनी न करो ! मैंने सारा कोंकण जीतनेकी कसम खा रख्खी है ! मुझे जंग करकेही फतह हासिल करनी है ! मुझे नाउमेद न करो ! " खान म्हणाला.

" तुम्हाला वाटतं लढाई म्हणजे गंजिफांचा खेळ ! तुमच्या शत्रूला ओळखलंच नाहींत तुम्ही ! शिवाजी म्हणजे काळ आहे तुमचा-आमचा ! येथें या काळाच्या दरींत येण्यापूर्वीं थोडी तरी या मुलुखाची माहिती, अडीअडचणींची चौकशी केली होतीत कां ? ह्या भयानक अरण्यांत आतां तुमची कत्तल उडते आहे ती पहा जरा डोळे उघडून ! थोडे तरी त्राण उरले आहेत का तुमच्या फौजेंत ? ते पहा ! तुमचे पटाईत तिरंदाज जिनगरी बाहुल्यासारखे गप्प उभे राहिले आहेत ! "

खरोखरच खानाच्या फोजेतले तिरंदाज चित्रासारखे उभे राहिले होते, ते दिङ्मूढ झाले होते. त्या दाट जंगलांत मराठ्यांची फौज नेमकी वेगळी अशी दिसतच नव्हती.

" रायबागनसाहबा ! मैं क्या कर सकता हूँ ? मुझे तो हुजूरने रवाना

फरमाया है ! अुनके हुक्मकी मैंने तामील की ! हम हुक्मके ताबेदार गुलाम हैं। ईमानदार नौकर ! " हताश होऊन खान म्हणाला.

" निष्ठावंत नोकरांनी अक्कल चालवायचीच नाहीं अशी वहिवाट आहे काय दिल्लीच्या दरबारची ? शाहिस्ताखान नवाबसाहेबांस काय अनुभव या मुलुखाचा ? तुम्हीं तर शिवाजीच्या दख्खनवर, शहेनशाह आलमगीर औरंगाबादला असल्यापासून आहांत ना ? "

" फिर मैं क्या करूँ ? कहो ! कहो मुझे ! " खानानें डोके गदगदा हलवीत म्हटलें.

" मुकाट्यानें शिवाजीला शरण जा ! " रायबागन स्पष्टपणें म्हणाली.

" क्या ? नहीं नहीं ! मेरी सारी जिन्दगी बरबाद हो जायेगी ! मुझे मुँह दिखानेको शर्म आयेगी ! मैं लडूँगा ! और जरूर लडूँगा ! अै जवानोंऽऽ ! " खानाचें डोकें भ्रमून गेलें.

" क्षणभर जरा डोकं शांत ठेवून विचार करा खानसाहेब ! सबंध जंगल शत्रूंनं वेढलं आहे ! जर असाच वेडा हट्ट चालू ठेवणार असाल तर खात्री ठेवा, गिरफदार होऊन शिवाजीपुढें हजर होण्याची वेळ येईल तुमच्या-आमच्यावर ! आणि तरीही आंधळ्यासारखे लढतच रहाणार ? "

" मर जाअूँगा ! मेरी बोटी बोटी कटवा जाय तो भी परवाह नहीं, लेकिन मैं हाथियार नहीं छोडूँगा ! यह सर नहीं झुकाउँगा ! लडता हुवा मर जाऊँगा ! "

" थोडी तरी फलप्राप्ति होणार असेल तरच पुरुषाच्या जातीनं उद्योग हातीं घ्यावा ! धाडस करावं ! तुम्हांला स्वतःला फुकट मरायचं होतं तर इथं ह्या साऱ्या फौजेला कशाला या आगींत आणलंत ? अर्थशून्य धाडसाची जग थट्टाच करीत असतं ! " रायबागनने खानाची चांगलीच कानउघाडणी चालविली होती.

" मैं अपनी बेइज्जती अपनीही आँखोंसे देखूँ ? "

" कैद होऊन शिवाजीपुढं जाऊन पडण्यापेक्षां बरं ! बिनशर्त शरण जाऊन शिवाजीकडे धर्मवाट मागा ! शिवाजी दिलदार आहे ! माझी खात्री आहे

कीं मोठ्या उदार मनानं शिवाजी आपल्याला धर्मवाट देईल ! आपण फौज बचावून निघून जाऊं ! " रायबागननें अगदीं स्पष्ट सल्ला खानाला दिला.

मोंगली फौजेची वाढती दाणादाण आणि मराठी फौजेचा वाढता धुमाकूळ खानाला दिसत होता. त्याला रायबागनचें म्हणणें निरुपायानें पटत होतें. पण शरणागतीचा अपमान मनाला झोंबत होता. अखेर साऱ्या इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, लाज, लज्जा, मुकाट्यानें झाकून ठेवून शरणागतीकरितां आपल्या व रायबागनच्या वतीनें एक शहाणा माणूस वकील म्हणून पाठविण्याचे खानानें मोठ्या दुःखानें ठरविलें. त्यानें आपल्या फौजेंतील एका प्रौढ कारकुनास बोलावून आणले. आणि मोठ्या विनवणीच्या शब्दांत आपले म्हणणे त्याला सांगून त्यानें व रायबागननें त्याची रवानगी महाराजांकडे केली. त्याच्याबरोबर आपले कांहीं हशम, प्यादे दिले.

खानाचा वकील महाराजांकडे येण्यास झाडाझुडुपांतून वाट काढीत निघाला. लांबूनच त्याला घोड्यावर बसलेली महाराजांची अतिभव्य, अतिसुंदर अन् अतितेजस्वी मर्दानी मूर्ति दिसली. वकिलाला वाटले हा शिवाजी नव्हेच गरुडावर बसलेला विष्णूच आहे. महाराजांच्या तेजस्वी उजव्या हातांत उंच भाला तळपत होता.

वकील त्या कांट्याकुट्यांतून डोंगराच्या अगदीं सन्निध गेला आणि त्यानें महाराजांच्या एका भालदारास सांगितलें कीं मी खानेआझम कारतलबखान व रायबागनसाहेबां याच्याकडून वकील म्हणून आलों आहें; तरी महाराजांनीं माझ्याकडे मेहेरनजर वळवावी.

लगेच त्या भालदारनें महाराजांच्या जवळ जाऊन मुजरा करून म्हटलें "महाराज ! मोंगलाकडून हेजीब आल्याती ! "

महाराजांची नजर वकिलाकडे गेली आणि त्यांनी वकिलास जवळ येण्यास खुणाविले. वकील मुजरा करीत करीत नजीक आला.

" हेजीब ? बोलवा त्यांना हिकडे ! " महाराजांनीं आज्ञा दिली.

महाराजांच्या भालदारानें खानाच्या वकिलापाशीं येऊन वकिलास म्हटलें, " तुम्हास्नी महाराज बोलावल्याती ! "

लगेच वकील भालदारामागोमाग निघाला. महाराजांची भव्य व शस्त्रधारी मूर्ती त्याला झाडा झुडपामागून डोंगर चढतांना दिसत होती. महाराजांचा धिप्पाड पण अत्यंत चपळ घोडा मधून मधून टापा आपटीत फुरफुरत होता. चिलखत, शिरस्त्राण, धनुष्य, तलवार, बाणांचे भाते, आणि पाठीवरील भव्य ढाल महाराजांच्या मूळच्याच तेज:पुंज अन् प्रभावी दर्शनांत भर घालीत होती.[२२]

वकील मुजरा करीत करीत महाराजांपुढें गेला.

" महाराजांनी मेहेरबानी केली पाहिजे ! महाराजांच्या मेहेरबानीची ख्वाहिश धरून कारतलबखानसाहेब व रायबागनसाहेबा यांनीं मला महाराजांच्या पायाशीं वकिलीस पाठविलें आहे ! "[२३] वकील अतिशय अदबीनें म्हणाला. तो हात जोडूनच बोलत होता.

" काय म्हणणं आहे आपल्या खानसाहेबांचं ? " महाराजांनीं विचारलं. महाराज घोड्यावरून बोलत होते.

" आम्ही बदतमीजीनें भलतीच हांव धरून महाराजांच्या मुलखांत हात घातला, याचं आम्हांला बहुत बहुत दुःख होतं आहे ! खानसाहेब सख्त दिलगीर आहेत. बिनतक्रार शरण आहेत ! महाराजांनीं नजरइनायत फर्मावून आम्हांस जिवंत जाऊ द्यावं अशी खानसाहेबांची महाराजांच्या कदमी बाआदब अर्जदास्त आहे ! " [२४]

" हं ? हे इतक्या उशीरा लक्षांत आलं खानसाहेबांच्या ? " महाराजांनीं भिवया उंचावीत खोचून विचारलें.

" महाराजांच्या अत्यंत बिकट मुलखाचा अंदाज खानसाहेबांस न आल्यामुळेंच हा गुन्हा घडला ! "[२५]

" म्हणजे मुलख बिकट नसता तर खानसाहेबांनी हा गुन्हा मोठ्या खुषीनें अन् बीनबोभाट पार पाडला असता ! "

" महाराज ! अविचारच हा आमचा ! नागाच्या मस्तकावरचा मणी आणि महाराजांच्या हुकुमतीखालील मुलूख दुर्लभ आहे ! अजिंक्य आहे ! तो दुसऱ्याच्या कबज्यांत जाणार नाहीं ! [२६] रायबागनसाहेबांनी आपणांस विनंती केली आहे कीं मला आपली बहीण समजून—! " [२७]

" होय ! त्या आमच्या भगिनीच आहेत ! जरी आमच्याशीं त्यांनी दुष्मनी मांडलीं असली तरीही त्या आमच्या भगिनीच आहेत ! पण तुमचे खानसाहेब आमचे कोण ? "

" खानसाहेब आपणांस भाऊ मानतात— ! "

" आमच्याशीं भाऊबंदकी करण्यासाठीं ! ! "

" नाहीं महाराज ! महाराजांच्या भाग्यशाली तीर्थरूपांचा—शहाजी-राजांचा आणि खानसाहेबांचा कदीम जानी जिव्हाळा आलमांत रोशन आहे ![२८] फार फार प्यार मोहोबत ! खानसाहेबांनीं मोठ्या आर्जवानं आपणांस या गोष्टीचं स्मरण देण्यास— "

" आमच्या तीर्थरूपांची खानसाहेबांस आत्तां आठवण झाली !—कीं तीर्थरूपांचाच सल्ला घेऊन आले होते ? "

" नाहीं महाराज ! चूक झाली ! शाहिस्ताखान नवाबसाहेबांच्या हुकुमामुळें हें कमनशीब आमच्या वांट्यास आलें ![२९] महाराज कृपा करा ! आम्हांला धर्मवाट द्या ! आमच्याकडून पुन्हा अशी नौदिगार सुरत दिसणार नाहीं. आमच्या जबानीचा इतबार जरूर धरावा ![३०] आम्ही ताबडतोब या अरण्यांतून निघून जातों.[३१] आम्हांला धर्मवाट द्या ! लक्ष उपकार होतील ! आमच्या नजरा पुन्हां महाराजांच्या मुलुखाकडे पापवासनेनें वळणार नाहींत ! "

" दुसऱ्याला खरं वाटेल इतपतच माणसानं खोटं बोलावं ! " महाराज किंचित् हंसून म्हणाले.

" नाहीं महाराज ! जीवदानाचं पुण्य पदरीं घ्या ! आमच्या शब्दांचा अनुभव खराब येणार नाहीं ! आपण अनुभव घ्या— ! "

" अनुभव ? प्रत्येक गोष्ट अनुभवानंच शिकायची म्हटलं तर मार्केडेया-चीही हयात पुरणार नाहीं ! आम्हांला फार फार अनुभव आहेत ह्या तुरुकांचे ! "

" केवळ दुसऱ्याच्या हुकुमामुळें आमचा पाय निखाऱ्यावर पडला ![३२] आपण सांगाल त्या पद्धतीनं आम्ही वागतों ! आमच्या गुन्हेगारीचं

प्रायश्चित्त आम्हांस पुरतें मिळालें आहे! आमची हिफाजत करा![३३] आम्ही सर्वस्वीं शरण आहोंत! निदान रायबागनसाहेबांकरितां तरी, बहिणीला म्हणून धर्मवाट द्या! महाराज! गेले दोन दिवस आम्हाला पाणीसुद्धां पुरेसें प्यायला मिळालें नाहीं हो!"[३४] वकील अजीजीनें बोलत होता.

महाराज क्षणभर थांबले. त्यांची गंभीर नजर समोरच्या अरण्यावर स्थिरावली. हलकल्लोळ ऐकूं येत होता. महाराजांनीं मनाशीं निर्णय घेतला आणि त्यांनी वकिलाकडे पाहिलें. आशाळभूत नजरेनें पहात वकील हात जोडून उभा होता.

"ठीक आहे! खानसाहेबांनी आणलेली सारी दौलत, हत्ती, साजसरंजाम इथल्या इथें टाकून तावडतोब फौजेसह आमच्या मुलुखांतून निघून गेलं पाहिजे!" महाराजांनी खिडीकडे बोट दाखवून म्हटलें.

"जरूर! महाराज, जरूर! महाराज दयावंत आहेत! महाराजांनीं आपल्या सैनिकांस कत्तल थांबविण्याचा कृपा करून हुकूम द्यावा!"

"ठीक!" महाराजांनी लगेच आपल्या भोंवतीं पसरलेल्या ढालाइतांस जंगलाच्या चहूं अंगास धांवत जाऊन ओरडून लढाई बंद करण्याचा हुकूम आपल्या सैन्यास कळाविण्यास सांगितले. तावडतोब ते पांच-पन्नास ढालाईत मुजरे करून ताड् ताड् उड्या मारीत जंगलांत उतरले.[३५]

ढालाइतांनीं जंगलांत विखुरलेल्या आपल्या सरदारांस व सैन्यास गनिमांशीं लढाई बंद करण्यास महाराजांचा हुकूम झाल्याचें ओरओरडून सांगितलें.[३६]

लढाई थांबली!!!

खानानें धाम टिपीत सुस्कारा सोडला.

खानाचा वकील खानाकडे आला. खानानें त्याच्याबरोबर मोठी थोरली खंडणी महाराजांकडे तावडतोब रवाना केली.[३७]

महाराजांची फौज खानाच्या परत जाण्याच्या वाटेवर दुतर्फा उभी राहिली. विजयाचा निगर्वी दिमाख झळकत होता. खानानें सर्व साहित्य,

खजिन्याचें पेटारे, चांदी-सोन्याची भांडी, हत्ती, उंट व मेलेल्या मोंगली सैन्याचे हजारो घोडे जिथल्या तिथे टाकून परत जाण्याकरितां कूच केले.[३८] जखमी सैनिक त्यानें बरोबर घेतले.

घोड्यांच्या टापा वाजत होत्या. गळ्यांतकीं घुंगरें खुळखुळत होती. खानाची हजारो फौज खालीं मान घालून मुकाट्यानें मराठ्यांच्या पुढून निघून जात होती. कारतलबखान, रायबागन, अमरसिंह, चौहान, जसवंत-राव वगैरे सर्वजण कब्रस्तानांतून परत फिरल्याप्रमाणें रडवी तोंडे करून चालले होते.

मोंगली फौज निघून गेली ![३९]

प्रचंड विजयी घोषणांनीं उंबरखिंडीचा अस्मानी पहाड आणि ते घनदाट अरण्य प्रतिध्वनि उठवीत उठवीत दणाणून गेलें. महाराज सस्मित नजरेनें आपल्या लोकांचें कौतुक करीत होते. लाखो रुपयांची संपत्ति महाराजांस हस्तगत झाली. नेताजी पालकराच्या बहादुरीची कमाल झाली या युद्धांत. या दिवशीं तारीख होती, २ फेब्रुवारी १६६१.[४०]

—महाराज परत निघाले.

" सरनौबत ! " महाराजांनीं नेताजी पालकरास फर्माविलें. नेताजी मुजरा करून उद्गारला, " जी हुकूम महाराज ! "

" तुम्ही याच ठिकाणीं थांबा ! मोंगल गेले म्हणजे ते पुन्हां फिरणारच नाहींत हा भरंवसा नाहीं ! दुष्मनाचा भरंवसा कधींच कुणी धरूं नये ! जीवदानाची भिक्षा मागितली म्हणूनच आम्ही त्यांना सोडलं ! तुम्ही ही सरहद्द सांभाळा ! आम्ही दाभोळवर जातों ! "[४१]

महाराज दाभोळवर दौडले.[४२]

---

* आधारः—( १ ते ३ ):—शिवचरित्र फार्सी साहित्य खंड ३ रा, ( ४ ते २६; २८ ते ३३; ३५ ते ४२ ):—शिवभारत; ( २७ व ३४ )

८२०३

# ७ . . .   . . . जंजिऱ्याचा सिद्दी

गुलामांचा देश ! कसली त्याला इभ्रत अन् कसली त्याला अब्रू ? गुलामांना मन नसतं. शरीर असतं फक्त. आणि तेही सत्ताधिशांच्या तहहयात मालकीचं. हे असंच गुलामीचं जिणं महाराष्ट्र तीनशें वर्षे जगत होता. येथल्या पुरुषांची गर्दन अन् बायकांचा पदर सत्ताधीश सुलतानांच्या हातांत करकचलेला होता. कत्तलखान्यांतील गुरेंसुद्धां फार फार सुखी. माणसं सुलतानांच्या जुलमाखालीं इथं मुकाट मरत होती, पण तीही एकदम नाहीं. कणाकणानें अन क्षणाक्षणानें ! कोणाला हांक मारायची ? देवाला हांक मारायला पुरुषांचे गळे मोकळे नव्हते. पसरायला बायकांचे पदर मोकळे नव्हते. आणि हांक ऐकायला देव तरी होता कुठें देवळांत ? गुलामांचा देवही गुलामच !

सोळा वर्षांपूर्वींची गोष्ट. महाराज तेव्हां फक्त चौदा पंधरा वर्षांचे होते. सगळीकडे दाट अंधार होता. स्वराज्याची समई अजून अंधारांतच होती. शिवबा आणि ताज्या टवटवीत कापसासारखी त्याच्याच वयाची त्याची चारसहा मित्रमंडळी लाल महालांतल्या देवघरांत आईसाहेबांच्या भोंवतीं कोंडाळं घालून बसली होती. आणि आईसाहेब कापसाच्या वातींना पीळ घालीत ती समई सजवीत होत्या. पंत दादोजी कोंडदेव त्या समईत झारीनें तेलाची धार धरीत होते. वाती भिजत होत्या. पण चकमक झडून समईची पहिली वात उजळायला थोडा अवकाश होता !

—त्या वेळची गोष्ट ही !

समुद्राच्या लाटा उंच उंच नाचत खडकावर आपटत होत्या. फुटत होत्या. फेंसाचे फुगे उडत होते. तो खडक खूपच औरस-चौरस बेटा-सारखा होता. त्याच्या सर्व बाजूंनी समुद्र नाचत होता. वर चिरेबंदी लांब रुंद तटबंदी होती. जागजागीं मोठमोठे बुरूज होते. एक भव्य दरवाजा होता. अंधारांत हा पाणकोट भयप्रद वाटत होता. ह्या तटावरून काळ्या काळ्या सांवल्या इकडून तिकडे अन् तिकडून इकडे मधून मधून कर्कश्

आरोळ्या देत हिंडत होत्या. आरोळी उठली कीं, केवढा मोठा प्रतिध्वनि ऐकूं येई. कीं मग पुन्हा खूप वेळ चिप्प शांतता. तटाच्या आंतून कित्येक नारळीची झाडं डोकी वर काढीत होती. त्यांची झांवळी अंधारांतही आभाळाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होती. त्यांची सळसळही ऐकूं येत होती. दरवाजा बंद होता. दरवाजाबाहेर अगदी लगतच समुद्राचं पाणी खडकावर डचमळत होतं. तेथेंच खडकांत ठोकलेल्या मेखांना दोरखंडांनी कांहीं होड्या बांधलेल्या होत्या. त्याही डगमग डोलत होत्या. दरवाजावर एक निशाण फडकत होतें. कोंकण-किनाऱ्यावरील हाच तो सिद्दीचा जंजिरा. अजिंक्य जंजिरा !

किल्ल्यांत शांतता होती. ठिकठिकाणी हबशी पहारे करीत उभे होते. खास सिद्दीच्या महालांतही शांतता होती.

एका नंतर एकेक अनेक महाल होते. प्रत्येक दालनांत धातूच्या चक-चकीत हंड्या टांगलेल्या होत्या. त्याला नक्षीदार जाळी होती. महालांतही नागव्या तरवारी घेतलेले हबशी दारा दारावर उभे होते.

आणि एका महालातून कण्हण्याचा आवाज ऐकूं येत होता. भुईवर रुजामे, गालिचे होते. उंच उंच कमानींवर पडदे झुळझुळत होते. एका बाजूस चिरागदानांत व शामदानांत मंद ज्योती तेवत होत्या. एका भव्य पलंगावर तख्तपोशीपासून सोडलेली अगदी तलम जाळीदार मच्छरदाणी हलत होती. चार दोन माणसें पलंगाशी उभी होती. मच्छरदाणीच्या आंत एक व्यक्ति पलंगावर तळमळत पडली होती, कण्हत होती. बाहेरून एक गुलाम वारा घालीत होता.

खुद्द जंजिऱ्याचा सिद्दीच आजारी होता. अतिशयच आजारी होता. बरेच दिवस आजारी होता. हकीम, वैद्य, फिरंगी औषधवाले सारे थकले होते, तरी उपचार चालूंच होते. त्यांच्या जोडीला तावीजवाले, गंडेवाले, फकीर, पीरजादे, पंचाक्षरी अंगारे धुपारे करीत होते, आणि त्यांनीं गंभीर चेहऱ्यांनीं निर्णय दिला होता कीं कोणी तरी दावेदार दुष्मनानें हुजूर सरकार सिद्दीसाहेबांवर जादू-टोणा केला आहे! करणी केली आहे !— सैतान, भूत, पिशाच्च घातलं आहे !

हा जुलुमी सिद्दी म्हणजे आधीच खवीस होता, अन् आतां त्यांतून पिशाच्च चिकटलं! सिद्दीचं डोकं भणाणून गेलं होतं. आधींच संतापी, त्यांतून दुखण्यानें वैतागलेला अन् त्यांतच हे चेटूक!

हें चेटूक कोणीं केलं? सिद्दीची तळमळ वाढूं लागली. कोणीं करणी केली? आत्तां छाटून टाकतों त्याला! पण कोणावर नांव घ्यायचं? कोणाला पकडायचं? तावीज गंडेवाले तरी कोणाचं नांव सांगणार एकदम?—पण अखेर तो चेटूकवाला सांपडला! सिद्दीच्या दरबारातल्या कांहीं दीर्घद्वेषी पाताळयंत्री पाजी, पाषाणांनी दरबारांतल्या निष्पाप, कर्तबगार, कर्तव्यदक्ष व सिद्दीशीं अगदीं इमानें इतबारें वागणाऱ्या एका कुटुंबवत्सल सज्जनाचा बळी सिद्दीच्या संशयपिशाच्चाला द्यायचा निश्चय केला. त्यांच्या डोळ्यांत खुपत असलेल्या एका काफराचा कांटा काढायला आयतीच संधी चालून आली.

ती रात्र उलटली. सूर्याचीं किरणें समिंदरावर पसरली. सोन्याच्या रसांत सागराचें रूपांतर झालें.

ही पाताळयंत्री दावेदार मंडळी सिद्दीच्या महालांत नम्रतेनें माना लववून आली. खिदमतीचे गुलाम पलंगाभोंवती होते. मच्छरदाणीची एक कनात बाजूस सरली. सिद्दी कण्हत होता. कुर्निसात करीत ही मंडळी पलंगासमीप आली.

“सरकार! हम तखलीफकी माफी चाहते हैं!” म्होरक्या म्हणाला.

“कहो! क्या है?” सिद्दी खोल आवाजांत म्हणाला.

“हुजूरके खिदमतमें कुछ कहना है!”

--लगेच सारे गुलाम पोटाशीं हात धरून व माना खाली घालून मागें मागें सरकत निघून गेले. “कहो!” सिद्दीनें फर्मावलें.

“हुजूरपर जो मुसीबत आ पडी है, इससे हमारा दिल बेकरार है! लेकिन हमें यकीन है के हुजूरपर खुदाकी रहमतका साया है! जो कुछ हुक्म होगा, हम वही इलाज करनेके लिये तय्यार हैं!”

“तुम्हारी खिदमत-गुजारीकी हम कद्र करते हैं!” सिद्दी म्हणाला.

“खुदा करे! हुजूरको शफा हो जाय!”

“मर्जीए-मौला! लेकिन--हमारी समझमें कुछ नहीं आता! हमारा दिमाग चकरा गया है! नीद आँखोंसे उड गई है! रात काटने

दौडती हैं ! क्या तुम जानते हो के हमे क्या हो गया है ? हमपर किसीने ज्ञादू-टोना किया है ? ज़ादू-टोना ! किसने किया ? कौन है वह हरामखोर मुद्दई ? कौन– " सिद्दीचं पिशाच्च जागं झालं.

"हुजूर यह बात हमें मालूम है ! और असलिये ही हम आये हैं ! मगर— !"

"क्या तुम जानते हो ? फिर आज तक क्यों चुप रहे ? कहो, कहो किसने जादू किया है ?" सिद्दीनें मूठ वळली.

"हुजूर माफ़ फर्माअे ! हम तो इससे पहले बतला देते, लेकिन हुजूरको हमपर एअतबार न आया होता, इसीलिये हमने आज तक यह भेद छुपा रख्खा ! और अब भी हुजूरको यकीन आयेगा या नही खुदा जाने !" ते सारेजण निखारा फुलवीत होते.

"बोलो ! कौन है वह हरामजादा ? अभी—इसी वक्त उसकी गर्दन मार दी जाएगी ! थैलेमें बंद करके समंदरमें डुबोता हूँ उसे ! बताओ कौन है वह जादूगर ?"

"और हाँ हुजूर, अगर सचमुच उसे थेलेमें बंद करके समंदरमें डुबो दिया जाय तो सैतान, जिन, भूत परेत खुश हो जाएंगे ! और हुजूरकी आयी बला सरसे टल जाएगी ! लेकिन हुजूरको वह नाम सच नहीं लगेगा !"

"बस कहो ऽऽ ! बस कहो ऽऽ !" सिद्दी खवळून ओरडला.

"हुजूरके दरबारके खास मुजुमदार—आवजी प्रभु चित्रे ! ! !"

"हाँ ऽऽऽ" सिद्दीनें आश्चर्यानें डोळे विस्फारले. सच है हुजूर ! मुजुमदार आवजी प्रभु चित्रे ! !"

सिद्दीचं मस्तक संतापानें गरगरूं लागलं. आतां निखारा पुरा फुलला. सिद्दीनें एकदम हुकूम सोडला, "इसी वक्त उसे जंजीरोंसे जकडकर हाजिर करो ! अभीके अभी ! अभीके अभी ! तामील हो ऽऽ ! ! हरामखोर दगाबाज !"

विचार नाहीं ! चौकशी नाहीं ! न्याय नाहीं !

जंजिऱ्याच्या किल्ल्यांतून पंधरा-वीस हबशी बाहेर पडले. मचव्यात बसून ऐलतीरास गांवांत निघाले. रस्त्यांत जो तो भीतीनें टकमका पहात होता.

साखळदंड हातांत घेऊन हबशी शिपाई आवजी प्रभु चित्र्यांच्या घराकडे झर झर पावलें टाकीत चालले.

--आवजी हरि चित्रे प्रभु. अगदीं साधा भोळा सज्जन जीव हा. कधीं कुणाच्या वाइटाची आवजींनी मनांत वा स्वप्नातही इच्छा केली नाहीं. कर्तबगारी मात्र दांडगी. बुद्धीची हुशारी अन् लेखणीची तरतरी अगदीं ताजी तल्लख. आवजींना सिद्दीनं मुजुमदारी बहाल केली होती. मोठ्या इमानदारीनें आजपर्यंत त्यानी आपला दरख अगदीं चोख संभाळला होता. पण ही मुजुमदारी म्हणजे सुळावरची पोळी होती.

आवजींना पत्नी लाभली होती समवयस्क तरुण, फार गोड स्वभावाची शांत, हंसतमुख अन् हुशार. तिचं नांव होतं गुलबाई ऊर्फ रखमाबाई. आणि आवजी प्रभूची अंगण-ओसरीहि कांहीं सुनी सुनी नव्हती. एका पाठोपाठची तीन बाळं रखमाबाईच्या पदराशीं खेळत आणि अंगणांतल्या तुळशीभोंवती नाचत बागडत मोठी होत होती. मोठ्या मुलाचं नांव होतं बाळाजी. बाळाचं वय होतं फार तर सहा वर्षांचं. त्याच्या पाठचा शामजी. चिमणी बाळं मोठी गोड होतीं गुलबक्षीसारखीं. आवजींचा हा असा आनंदमळा होता.

आवजींना थोडी सुद्धां कल्पना नव्हती--! रखमाबाई घरकामांत गुंतलेली होती. बाळं अंगणांत खेळत होतीं. आवजी ओसरीवर होते. एवढ्यांत धडाडकन् दरवाजा वाजला. आवजींची मान अन् नजर दरवाजाकडे वळली ! हातांत साखळदंड घेतलेला एक धिप्पाड हबशी आंत शिरला ! मागोमाग आणखी बरेच जण !

"मुजुमदा ऽऽऽ र !" क्रुद्ध नजर रोखून तो ओरडला. आवजी दचकलेच ! ते ओसरीवरून अंगणांत येत येत म्हणाले, "काय झालं बाबांनो ?"

बाळं बावचळलीं ! त्या हबशांच्या काळ्या सांवल्या त्यांच्यावर पसरल्या !

"तुमने हुजूरके साथ बेइमानी की है। हुजूरको इस बातका यकीन हो चुका है। और इसीलिये तुम्हें गिरफ्तार कर लानेका हमे हुक्म मिला है !"

आणि लगेच झप झप पुढें येऊन त्यांनी आवजींना पकडले. खळखळणाऱ्या सांखळदंडानी त्यांना भरभरा जखडले.

" अरे—मी—मी ? बेइमानी ? "

आवजींची मुद्रा केविलवाणी झाली.

बाळं रडूं लागलीं. आईला हांका मारूं लागली.

हबशांनी लगेच खेंचून आवजींना नेण्यास सुरुवात केली. आवजींचा जीव मागें ओढ घेत होता. ते ओरडत होते, अग ए, ए ऽ ऽ ऽ ! बाळा ऽ-- ! चिमणा ऽ— ! " अखेरची आर्त हांक आवजींनी मारली.

आंत घरांत, परसांत गुंतलेली रखमाबाई घाबऱ्या घाबऱ्या बाहेर आली. दरवाजाबाहेर फर फर ओढीत नेत असलेल्या आवजींची एकच निमिष धडपडती आकृति तिला दिसली !

" आई ऽ ऽ ऽ ऽ ! देवा ऽ ऽ ऽ धांव रे धांव ! " हंबरडा फोडीत रखमाबाई दरवाजाकडे धांवली.

मुलं मोठ्यांदा रडत होतीं. रखमाबाईवर कुऱ्हाडच कोसळली !

रखमाबाई दरवाजांत येते न येते तोंच आणखी तीस चाळीस सिद्दीचे हशम दरवाजांतून आंत शिरले ! रखमाबाईनें किंकाळी फोडली ! तिचे ओठ भीतीनें थरथरूं लागले. तिचे वक्षःस्थळ धडधडत होतें. कोवळी केळ वादळांत सांपडली. ती भयंकर घाबरली होती. असहाय्य होऊन एक एक पाऊल मागें मागें सरकत होती.

" आई ऽ ! " पोरं घाबरून ओरडत रडत एकदम तिच्या पायाला घट्ट बिलगली ! रखमाबाईनें हंबरडा फोडून तें तीन चिमणे जीव एकदम कवटाळले, " देवा ऽ ! काय केला आम्ही गुन्हा ऽ ? "

ते हशम तिच्या पुढं आले. त्यानीं तिला गराडलं. " मुजुमदारने हुजूरसे दगाबाजी की, इसीलिये उन्हे हुजुरके हुक्मके मुताबिक गिरफ्तार करके ले जाया गया है ! बस्स् हम भी सिर्फ हुक्मपर अमल करना जानते हैं ! " त्या हशमांचा म्होरक्या म्हणाला.

" नाहीं हो नाहीं ! ते असं कध्धी कध्धी करणार नाहींत ! पाया पडतें मी तुमच्या ! " रखमाबाईच्या काळजांत गिरमीट घुसलं होतं जणूं.

शब्दांच्या रूपानं त्या काळजाचा कीस उडत होता. तिच्या गालावरून अश्रू घळघळत होते. हात-पाय लटलट कांपत होते.

"––और तुमकोभी बालबच्चोंके साथ कैद करके लानेका हुक्म हुजूरकी जानिबसे हमे मिल चुका है!"

"आई ऽ ऽ ग ऽ! काय करूं मी आतां!" आपल्या बाळांना कवळून ती ढसाढसां रडूं लागली.

"––और तुम्हारा घरबार व सारी धन दौलत, माल असबाब सबकुछ सरकारी खजानेमें जमा करनेकाभी हुक्म मिला है!" आणि लगेच त्यानें आपल्या बरोबरच्या हशमांस घराकडे बोट करून फर्मावलें, "जाओ घरमे! और हर एक चीज लूट करके आवो!"

भराभर ते हशम घरांत घुसले. घरांतील सर्व सामानसुमान, धनदौलत, कपडेलत्ते भराभर बाहेर काढण्यास त्यांनी सुरुवात केली. रखमाबाईच्या संसारास सुरुंग लावला. देव–देवघरहि अंगणांत भिरकावले गेले. रखमाबाईनें आणि त्या अजाण मुलांनीं आकान्त मांडला. ते हशम सांपडेल ते सामान धडाधड अंगणांत आणून टाकीत होते.

खळ्ळ्ळ्ळ्! खण्ण्ण्––गड गड गड गड!

आरसा फुटला! कुंकवाचा करंडा सांडला!! आणि गडगडत पालथा होऊन पडला!!!

रखमाबाईनें किंकाळी फोडली! "माझं कुंकू ऽ!"

––आवजींना बांधून जखडून जंजिऱ्यांत आणण्यांत आलं. सिद्दीच्या महालांत सिद्दी पलंगावर वेदनांनीं तळमळत अन् संतापानें जळफळत पडला होता. साखळदंडांचा, पावलांचा अन् बोलण्याचा आवाज मोठा मोठा होत होत गेला. हबशांनीं आवजींना आंत आणलं. आवजींनी एकदम भुईवर गुडघे टेकले. डोकं टेकलं आणि कळवळून रुद्ध आवाजांत ते म्हणाले,

"हुजूऽऽऽर! मी काय गुन्हा केला? स्वप्नांतसुद्धां कधीं दगाबाजी–!"

"बस्स्! खामोश जियादा बक् बक् न करो! हरामखोर दगाबाज! अभीके अभी इसे थैलेमें बंद करके समंदरमें डुबो दो! लाओ थैला! रस्सिया लाओ! जल्दी करो!" सिद्दी ओरडला.

" हुजुऽऽऽर ! दया कराऽ ! माझा गुन्हा तरी काय– ? "

" हरामखोर ! कुसूर पूछता है ! जादूगर ! जहन्नममें जा, वहीं तुझे तेरा गुनाह मालूम हो जायगा ! "

" हुजु ऽ ऽ ऽ र ! माझी बायका - मु —! " एकदम एका हशमानं आवजीच्या तोंडांत जबरदस्तीनं फडक्याचा बोळा कोंबला ! आवजींच्या डोळ्यांत विश्वांतलं सारं कारुण्य अन् दुःख कोंदलं गेलं. अतिशय करुणेनें ते सगळीकडे मदतीकरितां भिरभीर पहात होते. हात पाय जखडलेले, अन् तोंडांत बोळा ! आतां ते मुकं अन् जखडलेलं दुःख कसं वर्णावं ?

एका हशमानं दोऱ्या अन् पोतं आणलं !

" डाल दो, डाल दो उसे थैलेमें ! " सिद्दीनें फर्मावलें.

सारे भाव आवजींच्या मुद्रेवर उमटले होते, कळवळून ते मान हालवीत अन् डोळ्यांनीं विनवून सांगण्याची धडपड करीत होते कीं, " नाहीं हो नाहीं ! मी कसलाही गुन्हा केलेला नाहीं ! नका माझा विनाकारण जीव घेऊं ! माझी बायकामुलं उघडीं पडतील — ! मला वांचवा ऽ ! मला वांचवा ऽ ऽ ऽ ! वांचवा ऽ ! "

पण कोण वांचवणार ? सिद्दी क्रुद्ध नजरेनें पहात होता.

पोत्याचं तोंड उघडं झालं ! मृत्यूचा जबडा तो ! हशमांनीं आवजींना पोत्यांत कोंबायला सुरुवात केली ! तोंडानं एक सुस्काराही उमटणं शक्य नव्हतं आवजींच्या ! हातपाय धडपडीकरितां हलवताही येत नव्हते ! उपयोगही नव्हता ! जीव बचावण्याकरितां अखेरची नजरेची धडपड— अगदीं केवीलवाणी धडपड आवजी करीत होते ! व्यर्थ ! अन्यायाच्या बळींनीं असंच मरायचं असतं ! गुलामी ! गुलामी ! !

" एका हशमानं आवजींचं डोकं आंत पोत्यांत दाबण्याकरितां वरून दाबलं ! येवढयांत—

" बाबा ऽ ! बाबा ऽ ! बाबा ऽ ! "

" दे वा ऽ ऽ ऽ ! आई ऽ आई ऽ — ! "

त्या तीन बाळांसह रखमाबाईला हशमांनीं तेथें आणलं ! ते भयानक दृश्य पाहतांच त्या बाळांनीं अन् तिनं आर्त आरोळी फोडली.

" बाबा ऽ बा ऽ बा ऽ ऽ ! "

आवजींच्या दाबल्या जाणाऱ्या मस्तकानें उसळी मारली ! त्यांच्या डोळ्यांनींच तळतळून शेवटची ओ दिली ! उत्तरही जणूं दिलं कीं, " बाळांनो !—तुमचा वाली परमेश्वर— ! "

रखमाबाईची स्थिति तर कोणत्या शब्दांत सांगावी ? तिच्या देखत तिच्या नवऱ्याची पोत्यांत—! ती आक्रोश करीत, टाहो फोडून तिकडे धांवूं लागतांच तिला व पोरांना हशमांनीं खेंचलं अन् त्यांच्या तोंडावर हातानें हट्ट दाबून धरलं ! त्यांच्या उगाच केंकाटण्याची सिद्दीसाहेबांच्या तबियतीस तखलीफ होऊं देणं योग्य नव्हतं !

कोंडमारा ! कोंडमारा ! कोंडमारा ! कोंडमारा !

पोतं बंद झालं ! करकचून दोरी आवळून गांठ मारण्यांत आली ! रखमाबाई धडपड धडपड करीत होती !

" ले जाओ और फेंक दो समंदरमे ! अब तो सबको समझ जायगा के हमसे दगाबाजी करके हमारा नाश करनेकी कोशिश करनेवालोको क्या सजा मिलती है ! " सिद्दी म्हणाला.

हशमांनीं लगेच आवजींची गठडी उचलली. रखमा कमालीची धडपड करीत होती. पण आडदांड हशमांपुढें तिची ताकद किती ?

" और इसकी औरत और बालबच्चोकोंभी ले जाओ ! गुलामोंके ब्योपारीको फौरन बुला लाओ ! इस् औरत और उसकी हरामखोर औलादको गुलाम बनाकर बेचनेका हम हुक्म दे देंगे ! "

ताबडतोब हशमांनीं त्या पोरांना अन् तिला महालांतून फरफरा ओढीत नेलं. गुलमांचा व्यापार करणाऱ्या एका व्यापाऱ्यास बोलावण्यांत आलं.

—जंजिऱ्याबाहेर समुद्र नाचत होता. घुसळत फेंसाळत त्याच्या लाटा खडकावर आपटत होत्या. नारळीची झोंवळी झळझळत होती.

भि र्र र्र र्र ! जंजिऱ्याच्या बुरुजावरून चार हशमांनीं पोतं समुद्रांत भिरकावून दिलं ! ! ! फिदी फिदी हास्याच्या लकेरी बुरुजावर उठल्या.

" जाव ! जाव जहन्नममें ! "—ही सदीच्छा !

एक क्षणही लागला नाहीं ! पोतं समुद्रांत बुडालं ! ! मुक्यानें मृत्यु !

एक एक बुडबुडा वर येत होता ! जणूं तीं एक एक मुक्यानं मारलेली आवर्जीची हांक होती, " बाळा ऽ ! चिमणा ऽ ! शामा ऽ ! रुक्मिणी ऽ ! रुक्मिणी ऽ बाळांना सांभाळ आ--प—ल्या ! "

एकसुद्धां पुन्हा बुडबुडा उठला नाहीं ! एक रत्न रसातळाला गेलं !

रखमाबाईचे डोळे रडून रडून सुजले. त्या मुलांना तर ही काय सगळी तऱ्हा चालली आहे हें कांहींच समजत नव्हतं. त्यांच्याबरोबर आपल्यालाही कां नाहीं बुडविलं ? एकदम सुटलों असतों असं तिला वाटूं लागलं. पण कसं जगायचं अन् कसं मरायचं हे ठरविण्याचा अधिकार गुलामांना नसतो !--आतां ती आपल्या तिन्ही मुलांसकट गुलाम होती ! त्या मुलांसह तिला दूर दूर नेऊन विकून टाकण्याचा सिद्दीचा हुकूम होणार होता ! आपलं पुढं काय होणार आहे हें तिला समजेना. खूप खोल खोल गर्तेत, अंधारांत, दुर्गंधीत, कोंडमाऱ्यांत आपण जाऊन पडणार आहोंत ! तिथं आपलं कुण्णी नाहीं ! आपली मुलंही वाटेल त्याला वेगवेगळी विकली जाणार ! ताटातूट ! कुणाच्या घरीं आपण जाऊन पडणार ? आपली अब्रू ? आपलीं बाळं ?

तिच्या काळजाचा एकदम टवका उडे अन् ती तळमळून रडे.

गुलामांचा व्यापारी मोठा खूष होऊन जंजिऱ्यांत आला. विकण्याकरितां गुलाम मिळणार होते त्याला. अन् त्यांत एक सुंदर तरुण स्त्री ! वा ! खूप किंमत येणार ! बेशकीमत मालीयत !

व्यापारी सिद्दीपुढें गेला. कुर्निसात करून तो नमून उभा राहिला.

" तुम उस औरत और उसके बच्चोंको गुलाम बनाकर मस्कत ले जाओ और वहीं बेच डालो ! मस्कतमेंही बेचना चाहिये ! " सिद्दीनें हुकूम सोडला.

" हुजूरके हुक्मके मुताबिक हर बातपर अमल किया जायगा ! मैं उन्हे मस्कत ले जाकरही बेंच डालूंगा ! "

व्यापारी अत्यंत अदबीनें म्हणाला.

" आजहि जहाजका लंगर उठा दो ! "

मस्कत ? इतक्या लांब ? केवळ चार गुलाम विकण्याकरितां मस्कतला त्याला जाणें भाग पडणार होते. सरकारी हुकूम !

" हुजूरका हुक्म सर आँखोंपर ! " कुर्निसात करीत गुलामांचा व्यापारी म्हणाला.

व्यापाऱ्यांच्या स्वाधीन रखमाबाईस व मुलांस देण्यांत आलें. ती रडत होती. मुलंही रडत होतीं. व्यापाऱ्याच्या मागोमाग ती चौघेही निघाली. शामाला तिनें कडेवर घेतलं. बाळा अन् चिमणा तिचा पदर धरून चालले. अनवाणीं, उन्हांतून अन् भुकेली !

" आई ! कुठं ज्यायच्यं ? बाबांच्याकले ? "

आतां त्या आईनं काय उत्तर द्यावं ? ती फक्त घट्ट हृदयाशी बाळाला धरून हुंदके देत पावलें टाकीत होती.

मुरुडच्या बंदरांत जहाज उभं होतं. दोघांनाही व्यापाऱ्यानें तिकडे नेलं. जहाज पाण्यावर हालत होतं.

रखमाबाई मुलांना घेऊन जहाजावर चढली !

हुकूम त्या कर्दनकाळ सिद्दीचा होता. ' ताबडतोब--ताबडतोब ह्यांना मस्कतला नेऊन विका ! ' व्यापाऱ्याला तांतडीनें निघण्याची तयारी करणं भागच होतं. जहाजावर एका खोलींत त्या तिघांनाही त्यानें आणून ठेवलं. त्यांच्यावर सख्त पहारा ठेवला. निघण्याच्या तयारीस व्यापारी लागला. रखमाबाईला दिलेली खोली--खोली कसली ? खुराडेंच ! कोंदट, कुबट अन् खुजट. फक्त झरोका होता.

शक्य तेवढा माल, इतर कांहीं गुलाम, खाण्यापिण्याचे पदार्थ वगैरे गोष्टी घाई घाईनें व्यापाऱ्यानें जहाजावर चढविल्या. खलाशांचा तांडा, नोकर चाकर व थोडेसे प्रवासी जहाजावर चढले. व्यापारीही दाखल झाला. एवढं होईतों तिन्हीसांजा टळत आल्या होत्या. रखमाबाईला ज्या खोलीत ठेवलं होतं, तिच्या झरोक्यातून सूर्याची मावळती प्रभा लुप्त होत गेली होती.

अंधार पडत चालला. वारा सुटला होता. शिडें उभारण्याचा हुकूम व्यापाऱ्यानें दिला. सर सर सर दोऱ्या खेंचल्या जाऊं लागल्या. शिडें-

उलगडून फुगूं लागलीं. जहाज डोलूं लागलें. जहाजावर दिवे लागले. किनाऱ्यावरच्या घराघरांत दिवे दिसूं लागले.

व्यापाऱ्यानें हुकूम दिला, “ लंगर उठा दो ! ”

सुकाणूं फिरलें. अगदीं संथ वळसा घेत जहाज पश्चिमेकडे वळलें. खोलीच्या झरोक्यातून दिसत होतं रखमाबाईला. जमीन दूर दूर चालली ! आपलं घर——आपली माणसं—आपली भाषा—आपला देव—आपला धर्म——आपला देश——तुटत चालला ! झपाट्यानें, वेगानें, भरधांव ! आतां पुन्हा कध्धी कध्धी दिसणार नाहीं ! रखमाबाई ढसढसां रडूं लागली.

तीनही मुलं रडून रडून एका रकट्यावर अखेर झोंपी गेलीं होती. रखमाबाईला वाटलं डोकं आपटून जीव द्यावा. पण ती बाळं——? त्या बाळांचं काय ? तीही ताटातूट होणारच होती—पण उघड्या डोळ्यांनी बाळांना सोडवत नव्हतं.

जहाज झपाट्यानं किनाऱ्यापासून दूर चाललं होतं. बाहेरच्या पाण्याचा आवाज ऐकूं येत होता. वारा थोडा जोरानें वहात होता. आकाशांतल्या चांदण्या चमचमत होत्या.

रखमाबाईचं मस्तक सुन्न झालं. बाहेरचा वारा झरोक्यातून फुंकर घालीत होता. फुर्रर्र फुर्रर्र ! जहाज हळूहळू जास्तच झोंके घेत होतं. रखमाबाईच्या हृदयांत वणवा पेटला होता. ती शून्य नजरेनें झरोक्याकडे पहात होती. किनारा दिसेनासा झाला होता.

किनाऱ्यापासून सुमारे एक कोसभर जहाज आलं होतं. प्रत्येक निमिषा-बरोबर आपण कुठं तरी खोल खोल जात आहोत असं रखमाबाईला वाटत होतं. वारा सारखा वाढत होता. समुद्राच्या लाटा थडाथड जहाजावर आपटत होत्या.

वारा जास्त जास्तच फोंफावूं लागला. जहाज प्रचंड झोके खाऊं लागलें. लाटांचं तांडव तुफान वाढलं. गर्जना करीत करीत त्या जहाजावर आपटूं लागल्या. डोळे विस्फारून रखमाबाई बाहेर पहात होती. ह्याच सागरानं आवजींना पोटांत घेतलं होतं.

शिडें तटतटून फुगली होती. जहाजावर ठिकठिकाणीं टांगलेले टांगते कंदील हेलकावे खाऊं लागले.

समुद्र जास्त जास्तच खवळूं लागला. जहाज हेलकावे खाऊं लागलें. सुकाणूवाल्याची छाती धडधडूं लागली. वारा इतका भयंकर फोंफावला कीं जहाज कलूं लागलें. व्यापाऱ्याच्या डोक्यांतही वादळ उठलें.

" तूफान ! तूफान ! आगे बढना मुष्किल है ! " जहाजाचा मुख्य तांडेल ओरडून म्हणाला.

गुलामांचा व्यापारी चिंताक्रांत होऊन गेला होता. तो तांडेलापाशी आला. त्यानें विचारलें, " फिर अब क्या किया जाय ? "

" हमें वापस लौट जाना चाहिये ! अभी किनारा बहोत दूर नहीं है ! हमे अभीसे अभी लौट जाना चाहिये ! " तांडेल म्हणाला.

" लेकिन हुजूरका हुक्म ? "

" हम कल रवाना हो जायेंगे ! और जंजिरा न जाते हुए राजापूरके बंदरपर जहाज ले जायेंगे ! " तांडेल म्हणाला.

व्यापाऱ्याला ते पटले. दुसरा उपायच नव्हता. जंजिऱ्याला न जाता राजापुरास जाण्याचें ठरले. लगेच तांडेलानें खलाशास हुकूम सोडले.

सुकाणूं फिरलें ! जहाज झपाट्यानें पुन्हा किनाऱ्याकडे निघालें !

वर आकाश दिसत होतें. खाली समुद्र नाचत होता. बस्. रखमाबाईला दिशाही उमजत नव्हत्या. जहाज पुन्हा माघारी फिरलें, हे तिला समजलंही नाहीं. जहाज भर वेगानें किनाऱ्याकडे चालले होते. किनारा फारसा दूर नव्हता. फक्त तीन सवा तीन कोस. जहाज राजापूरच्या रोखानें धांवत होतें.

तिळा तिळानं अन् पळा पळानं घटका गेल्या, अन् लांब क्षितिजावर दिवे दिसूं लागले. रखमाबाईच्या काळजांत धस्स झालं ! आलं मस्कत ? हा किनारा मस्कतचा ? तिच्या काळजांत धडधडूं लागलं.

जहाज जवळ जवळ चाललं. मध्यरात्रीची वेळ होती. जहाज खाडीत शिरलं. दिवे स्पष्ट मोठे दिसूं लागले. अंधुक अंधुक घरं दिसूं लागलीं. अगदीं संथ वेगानं जहाज बंदराला लागलं. खलाशांनी नांगर टाकला.

रखमाबाई पोरांना बिलगून मुसमुसत पडली. आपल्या चिमण्या राजांना कुशीत घेण्याची ही अखेरची रात्र! उद्यां— ? ताटातूट! कायमची ताटातूट!

उजाडलं! संथ पाण्यावर प्रकाश पसरला.

रखमाबाई झरोक्याशी गेली. दचकलीच! झरोक्यातून किनाऱ्यावरची घरं, बायका, पुरुष–सारं कांहीं दिसत होतं. आणि ते तर सारं ओळखीचं! हें तर कोंकण! तिला उमगेचना हा काय प्रकार आहे तो. आपण परत कोंकण-किनाऱ्यावर कसें आलों! ती झरोक्यातून माना वळवून वळवून पहात होती.

" यह राजापूर है!"

रखमाबाईच्या कानावर मागच्या बाजूनें एकदम शब्द आले. तिनें दचकून मागें पाहिले. तों गुलामांचा व्यापारी खोलीच्या दारांत उभा! रखमाबाईची छाती धडधडूं लागली.

" कल समंदरमे गजबका तूफान उठा था! जहाज आगे ले जाना नामुमकिन हो गया! समंदर बहुतही खवला हुवा था! इस लिये आखिर कार हमे लौटकर किनारेपर आना पडा! लेकिन जंजिरा न जाते हुए राजापूर चले आये! यह राजापूर है!"

त्याचं ते सौम्य अन् सरळ बोलणं ऐकून ती चकीतच झाली. तिला थोडा धीर आला.

" किती त्रास पडतोय तुम्हांला हा!" रखमाबाई धीर करून म्हणाली.

" हां! आज तूफान थम गया है! और दो घंटे बाद लंगर उठा कर हमे मस्कतके रास्तेपर चल पडना है! मस्कत बहूतही दूर है, कोसों दूर!"

" किती वाईट वाटतं! केवळ सरकारचा हुकूम म्हणून फक्त आम्हां चौघांकरितां तुम्हाला इतक्या लांबवर नेऊन आम्हाला विकावं लागणार! किती त्रास तुम्हांला!"—रखमाबाई त्या गुलामांच्या व्यापाऱ्याला सहानभूति दाखवीत होती!!

" मजबूरी है! सरकारका हुक्म जो ठैरा!"

" मग तुम्ही असं कराल कां?—

" कैसे ? "

" इथं राजापुरातच आम्हांला विकायचं ! " हे बोलतांना रखमाबाईच्या मुद्रेवर व्याकुळ कारुण्याचे तरंग उठत होते. त्यांत विनवणी होती. आर्तता होती.

" क्या ? राजापूरमें ? नहीं नहीं नहीं ! नामुमकिन, कतई नामुमकिन ! " हात आणि मान नकारार्थी हलवीत व्यापारी म्हणाला.

तिच्या मुद्रेवर लगेच कारुण्याच्या लाटा उठल्या. ती पुन्हा म्हणाली, " कुठं तरी विकायचंच ना ? निदान ओळखीच्या मुलुखांत— ! "

" ना ना ! तुम्हे यही बेचा गया, यह अगर हुजूरको मालूम हो जाय तो—तो—तुम्हे मालुमही है इसका क्या नतीजा होगा ! "

रखमाबाईचे डोळे पाणावले. पण लगेच तो व्यापारी म्हणाला,

" — तुम आला खानदानकी हो ! मैं मुजूमदारको अच्छी तरह जानता हूँ ! तुमपर हुजूर खफा हो गये हैं, यह देखकर मुझे सख्त — ! लेकिन क्या करूं ? हुक्मकी तामील करना जरूरी है ! "

" तुम्हांला मुलगी आहे कां हो ? " रखमाबाईनें किती तळमळीनें अन् अगदीं किती सहज आणि चटकन् विचारलें.

त्या व्यापाऱ्यानें एकदम तिच्याकडे पाहिलें ! त्याला काय वाटलें कोण जाणें ! तो क्षणभर पहातच राहिला ! तिच्या डोळ्यांत कारुण्य तरंगत होतें. तो तिला एकदम म्हणाला, " हां ! लेकिन—लेकिन--एक एक बात करोगी ? "

" कोणती ? " तिनें उत्सुकतेनें विचारलें, आशेची ऊर्मि लहरत आली.

" तुम अपने नाम, पते बदल डालो ! मैं तुम्हे यहाँके दलालके हवाले कर दूँगा ! वह तुम्हे यही बेच डालेगा ! लेकिन याद रहे के तुम्हारा नाम पता किसीको मालूम न होने पाये ! मैं इतनी जुरअत कर सकता हूँ ! इससे जियादा मैं कुछ नहीं कर सकता ! मैं राजापूरके बाजारमे भी नही आ सकता ! तुम्हे यहाँके खास मुकामी दलालके हाथही बेचना पडेगा ! " व्यापारी अगदीं हलक्या आवाजांत म्हणाला.

" अगदीं जरूर ! मी एवढी काळजी अगदीं दक्षतेनें घेईन ! कुणाला-ही आमचीं नांवं कळूं देणार नाहीं ! जन्मभर जपेन ! "

" अच्छा ! "--व्यापारी निघून गेला.

एक तासाभरानें व्यापाऱ्यानें तिला अन् तिच्या तीन मुलांना दलालास बोलावून सौदा करून त्याच्या ताब्यांत दिलं. तिच्या मुद्रेवर खूपशी कृतज्ञता त्यांतच काळजी, आशा, दुःख, पुन्हा निराशा उमटली. रखमाबाईच्या डोक्यांत हजार तऱ्हेचे विचार उलटसुलट गतीनें फिरत होते. निदान राजापुरांत विकले जात आहोंत ! पण कोण विकत घेतोय कोणास ठाऊक ? जर एखाद्या राजापूरच्याच कायम रहिवाशानं आपल्याला विकत घेतलं तर— ? अन् तो जर सज्जन, दयाळू अन् उदार मनाचा असेल तर— तर मग पुढें आपण— ? रखमाबाईच्या मुखावर त्या दुःखद स्थितींतही आशेचें सतेज स्मित क्षणभर झळकून गेलें.

—पण ? जर एकाद्या अरबानं किंवा पठाणानं विकत घेतलं तर— ? तर मग—कल्पनाच नको ती ! माती माती आयुष्याची, अब्रूची !— परमेश्वरा— !

तो दलाल म्हणजे निर्ढावलेला शुद्ध खाटीक होता. त्याच्या त्या राकट मुद्रेवर मानवी भावनांना एक क्षणभरही मुक्काम करायला जागा नव्हती. त्याची तशी परवानगीही नव्हती ! माणसं विकणारा !

बाळाजी अन् चिमणाजी तिच्या मागून अन् ती शामला घेऊन दलाला-मागून चालली होती. काय हें धिंडवडे ! मुलं तिला विचारत होती, " आई ! कुठं जायचं आपल्याला ? घरीं ? "

" होय हं ! आतां रडायचं नाहीं, बोलायचं नाहीं हं ! "—अन् तिचाच गळा भरून येत होता.

राजापूर ! केवढी मोठी बाजारपेठ. आदिलशाही सल्तनतींतील एक वैभवशाली शहर होतं तें. वस्ती दाट. मोठमोठ्या इमारती. मोठे मोठे बाजार. अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान, मस्कत, दमास्कस, तुर्कस्तान, दिल्ली, खंबायत वगैरे खूप लांब लांबचे व्यापारी अनंत तऱ्हेच्या मालमत्तेची देवाण-घेवाण ह्या शहरांत करीत असत. हिऱ्यामोत्यांची, कापडाचोपडाची,

चांदीसोन्याचीं, गालिचे-रुजाम्यांची, हत्यारांची, मसाल्याच्या पदार्थांचीं मोठमोठीं दुकानें अन् वखारी राजापुरांत होत्या. रोज जहाजांची ये जा चाले. शेंकडों मजूर आरडाओरडा करीत माल वहातूक करीत. एकादी वस्तु इथं मिळायची नाहीं असं कधीं होतच नसे. इथं बाजारांत सर्व कांहीं मिळे. गोमांससुद्धां! माणसंसुद्धां! पण माणुसकी मात्र दुर्मीळ होती.

इथं विजापूरच्या सुभेदाराचं ठाणं होतं. दगडी बांधणीचा भुईकोट वाडा होता. त्यांत सुभेदार रहात असे. स्वार, सांडणी, प्यादे, तोफा त्याच्या हाताशीं होत्या.

आशिया खंडांतीलच फक्त व्यापारी राजापुरांत होते असं नाहीं. पश्चिमे-कडचे गोरे टोपीवाले व्यापारीही राजापुरांत वखार थाटून बसले होते. इंग्रज! इंग्रजांची मोठी थोरली वखार राजापुरांत होती. ते व्यापार करीत अन् सवडीत सवड काढून राजकीय उचापतीही करीत! बोलायला गोड अन् काळजांत खोड! महा डांबरट!

जंजिऱ्यापासून साठ बासष्ट कोस दूर असलेल्या राजापुरांत दलाला मागोमाग रखमाबाई तीन मुलांसह दाखल झाली. दलालाचं सारखं तिच्या-वर लक्ष होतं.

दलाल एका खूप गजबजलेल्या इमारतींत शिरला. मागोमाग रखमाबाई. त्या इमारतींत मोठ-मोठ्या खोल्या होत्या. गजाच्या जाळ्या आणि भक्कम दरवाजे होते. माणसांचा गलबला ऐकूं येत होता. निरनिराळे बायका-पुरुष कोंडलेले होते! गुलाम होते ते! अन् ही वखार होती! माणसांची वखार! काय त्यांच्या अब्रूचा बाजार हा! माणुसकीची इभ्रत कोंडून पडली होती! गुलामांचा देश! कसली त्याला अब्रू अन् कसली त्याला इभ्रत!

रखमाबाईच्या अंगावर शहारे आले. अन् ती बाळं? अजाण, अगदीं अजाण! कांहीं समजत नव्हतं!

बाहेरच्या चौकांत दौंडी वाजली! गुलामांचा बाजार सुरू झाला! एक वार—दोन वार—तीन वार!

"चलो!" दलाल रखमाबाईस म्हणाला.

रखमाबाईस भडभडून आलं. तिनं आपल्या बाळांना घट्ट कवटाळलं. मुलंही कावरींबावरीं झालीं, "आई--!"

" चलो ऽऽ ! " दलालाची दरडावणी उठली.

रखमाबाई मुलांना घेऊन निघाली. डोक्यावरून पदर पुढें सरकविला. मुलंही तिचा पदर धरून चालूं लागली.

" माझं ऐकता का ? " तिनं कळवळून म्हटलं.

" क्या ? " त्यानें वळून डोळे वटारीत विचारलं.

" मला अन् माझ्या मुलांना एकाच ठिकाणीं राहूं द्याल कां ? एकालाच विका आम्हांला ! उपकार होतील — ! "

" हां ! देखूँगा ! लेकिन अगर खरीदनेवालोंने बच्चोंको लेनेसे इन्कार कर दिया तो मुझे बच्चोंको अलहिदा बेचना पडेगा ! "

दलाला बरोबर रखमाबाई बाजारांत आली !! एक उंच चबुतरा होता. शेंकडों लोक समोर जमले होतें. पलीकडे रस्ता होता. रस्त्यावरून रहदारी निर्विकारपणें चालू होती. राजापूरच्या जनतेची नजर निर्ढावली होती. त्यांना त्याचं कांहींही वाटत नव्हतं. अशा कित्येक कुलीन कुमारिका, विधवा अन् सुवासिनी त्यांच्या देखत त्या चबुतऱ्यावर आजपर्यन्त खेंचल्या गेल्या होत्या. त्यांना त्याचं कांहींच सुख-दुःख होत नव्हतं.

हें असं कां आणि कुठवर चालणार ह्याचा विचारही कोणाच्या डोक्यांत शिरत नव्हता ! सारेच गुलाम ! गुलामांना मन नसतं, बुद्धीही नसते !

" चलो ! " दलालानें चबुतऱ्यावर चढण्याची रखमाबाईस खूण केली !

तिचं काळीज फाटत होतं. हात पाय थरथरत होते. छातीत धाड धाड घाव पडत होते. देवा ऽ ! काय मांडलयस हें ? रामराया ! शिवशंकरा ! तुळजे अंबे ! म्हाळसाकांता ! गजानना ! श्रीकृष्णा ! कुठं आहांत रे तुम्ही सारे ? तिचें हृदय धारदार पात्याच्या रवीनं घुसळून निघत होतं. मुलांसह ती चबुतऱ्यावर चढली ! मुलं वेड्यासारखी टकमका पहात होती. तीं तिला बिलगून उभीं राहिलीं. त्यांना हे कांहीं समजतच नव्हतं. हे काल-पासून काय चाललंय तरी काय ? आई अशी सारखी रडते कां ? हें कोण लोक ? आणि आपण असे इथं कशाला आलों ?

रखमाबाई आपल्या तिन्ही बाळांना दोन हातांनीं सारखी कुरवाळीत होती. तिनं मान खाली घातली होती. मुलं आलटूनपालटून तिच्याकडं, लोकांकडं, दलालाकडं अन् एकमेकांकडं पहात होती. लोकांची गजबज चालूं होती.

" बोलो ऽ ! चालीस रुपिये ऽ ! चालीस रुपिये ऽ ! " जमलेल्या समुदायापुढें दोन्ही दोन्ही हात फिरवीत दलाल मोठमोठ्यानें लिलावांच्या किंमती पुकारूं लागला.

" चालीस रुपिये ऽ ! एक वार ! बोलो ऽ ! बोलो ऽ "

" पन्नास रुपये ऽऽ ! " जमावांतून एक आवाज. किंमत चढली !

रखमाच्या हृदयांत धडधड वाढत होती. तिचं भवितव्य क्षणाक्षणाला हेलकावें खात होतं. कोणाच्या घरीं जाऊन पडणार आपण ? तिची मुद्रा कमालीची केविलवाणी झाली होती. नवी किंमत पुकारली गेली कीं ती मोठ्या कष्टानें वर मान करून त्याच्याकडे बघण्याचा प्रयत्न करी.

" पन्नास रुपिये ऽऽ ! एक वार ! एक वार ! "

" पंचावन्न रुपये ऽऽ ! " किंमत चढली !

" पच्चपन रुपिये ऽऽ ! बोलो बोलो ! "

—आणि वर किंमत चढेना !

" पच्चपन रुपये ! एक बा ऽ र ! दो बा ऽऽ र ! "

" साठ रुपये ऽ ऽ " पुढें असलेल्या जमावांतून एका हबशानें किंमत चढविली ! आणि तो गर्दींतून पुढें पुढें सरकूं लागला !

दलालाच्या चेहऱ्यावर ह्या वरचढ किंमतीमुळें खुशी चढली.

रखमाबाईनें किंचित् मान वर करून पाहिलें—! हबशी ! झटकन् तिनें मान खालीं घातली. बोटांनीं ती मुलांच्या पाठीवर कुरवाळूं लागली. तिच्या काळजाचें पाणी पाणी झालें. आतां दुसरा कोण किंमत चढवून विकत घेणार ? मुलांना तिनें घट्ट धरलें. मोठ्या कष्टानें हुंदका आवरीत होती ती.

" साठ रुपिये ऽ ऽ ! बोलो ऽ बोलो ऽ ! "

तिच्या हृदयांतील धडधड वाढूं लागली. गर्दींतून वाट काढीत येणारा तो काळाकुट्ट हबशी पुढें आला. 'तीन व्रार' नक्कीच होणार ही त्याला खात्री होती. साठ रुपयांपेक्षां कोण जास्त बोलतो? मराठ्यांच्या लेकीसुनांची किंमत--" साठ रुपिये ऽ ऽ!"

आतां जन्मभर त्या हबशाच्या घरांत! तिनें डोळ्याला पदर लावला.

" साठ रुपिये ऽ ऽ! दो ऽ बा ऽ ऽर! दो ऽ बा ऽ ऽ र!"

अजून दलालाचा लोभ आशा धरून होता. पण कोणीच साठाचे एकसष्ट करीना! हबशाचे लालबुंद डोळे आत्तांपासूनच तिच्यावर मालकी हक्क गाजवूं लागले होते. तिच्या हृदयांत तुफान वादळ उठलें होतें. डोकें जड झालें होतें. भोंवळ यायची पाळी आली होती.

आतां साठापेक्षां वरचढ किंमत येत नाहीं याची खात्री पटून दलालानें अखेरचा आशाळभूत सवाल फेंकला—" साठ रुपिये ऽ! दो ऽ बा ऽ ऽ र!"

" शंभर रुपये ऽ ऽ!" एकदम आरोळी उठली!

गर्दीच्या अगदीं मागच्या बाजूनें एकदम आरोळी उठली! सर्वांची नजर तिकडे गेली! सारा जमाव मागें माना वळवून पाहूं लागला. दलाल निहायत खूष झाला. रखमाबाईनें नव्या आशेनें चटकन् मान वर केली—! आणि—!!! तिनें पदर कपाळावर जास्तच ओढून मान खालीं घातली!!!

आतां ह्यापेक्षां किंमत वर चढणें शक्यच नव्हतें. दलालानें मोठ्या खुषींत अखेरचा पुकार केला, " एक बा ऽ ऽ ऽ र! दो बा ऽ ऽ र! तीन बा ऽ ऽ ऽ र!"

किंमत पुकारणारा माणूस चबुतऱ्याकडे झपाट्यानें येऊं लागला. गर्दी बाजूला होत होती. त्याच्याकडे सारेजणच पहात होते. दलाल आनंदानें, हबशी तिरस्कारानें आणि बाकीचें आश्चर्यानें.

त्यानें पैसे दिले. रखमाबाई आपल्या मुलांसह चबुतऱ्यावरून खालीं उतरली. तो निघाला. त्याच्या मागोमाग ती मुलांसह निघाली. मुलें मघांपासून कांहीं तरी बोलण्याकरितां सारखीं चूळबूळ करीत होती. पण ती त्यांना सारखी दाबीत होती. रस्त्यानें कोणीही कोणाशी बोलत नव्हते.

रस्ते अन् चौक ओलांडीत ओलांडीत ते सारे चालले होते. त्या गृहस्थाचें घर आलें. घराच्या दरवाजांतून तो आंत अंगणांत शिरला. मागोमाग रखमाबाई आंत शिरली. अन् त्यानें वळून तिच्याकडे पाहिलें--

" दादा ऽ ऽ ! " रखमाबाईनें एकदम हंबरडा फोडून त्या गृहस्थाच्या गळ्याला मिठी मारली !

" ताई ऽ ऽ ! काय हें झालं ? " तोही ढसढसून रडूं लागला.

आई रडते आणि मामाहि रडतो हे पाहून मुलेंही रडूं लागली.

तो गृहस्थ तिचा सख्खा भाऊ होता ! ! त्याचं नांव विसाजी शंकर तुंगारे. द्रौपदीच्या हांकेला श्रीकृष्णच धांवला.

" ताई ? आधी चल, कुंकू लाव ! तुझं कुंकू पुसलं गेलं आहे !--"

" दादा ऽ ! " तिच्या दुःखाचें धरण फुटलें.

" ताई ऽ ? "

" सिद्दीनं यांना समुद्रांत बुडवून मारलं रे ! आणि आम्हांला-- ! " तिला बोलणंही अशक्य झालं.

" का ऽ य ? " विसाजीचं हृदय विदारलं. दुःखानं अन् संतापानं त्याचं मस्तक भणाणून गेलं.

जंजिऱ्याचा सिद्दी !

* आधारः—पुढच्या प्रकरणाचे अखेरीस पहा.

विसाजीच्या पंखाखाली माय-लेकरें विसावली. आपल्या तीन बालकांसह रखमाबाईचा अज्ञातवास सुरू झाला. विसाजीनं तिची अन् मुलांची अगदीं फुलांसारखी जपणूक चालविली.

बाळाजी, चिमणाजी आणि शामजी मामाच्या मांडीवर लहानाचे मोठे होऊं लागले. बाळाजी श्री ग णे शा गिरवूं लागला.

रखमाबाई आपल्या ह्या मुलांकडे पाहून सर्व दुःख गिळीत होती. ही मुलं म्हणजे तिच्या काळजाचे तीन तुकडेच होते.

दिवस, आठवडे आणि महिने उलटत होते. मामाच्या मायेखालीं मुलांचं लिहणं-वाचणं सुरू झालं. शाम मात्र अजून लहान होता.

वर्षामागून वर्षे उलटत होतीं. बाळाजीचें हस्ताक्षर मोत्याचा आकार धरीत होते. हिशेब, पाठ-पाठांतर अगदीं खडखडीत तयार झालें होतें. मामाला, आईला अन् घरांत सर्वांनाच मोठं कौतुक वाटे.

आणखीही अशीच कांहीं वर्षं लोटली. बाळाजीचं तारुण्य सळसळूं लागलें. तो सोळा वर्षांचा झाला. आणि बाळाजीला वाटूं लागलं कीं आपण आतां कांहीं तरी करावं ! कांहीं तरी ? म्हणजे काय ? थोडं तरी मिळवतं व्हायला नको का आतां ? मामांनीं किती भार सोसायचा ? आपली कांहीं मदत नको का ? त्याच्या डोक्यांत सारखे तेच विचार सुरू झाले. त्याला वाटत होतं— ! पण ते जमणं शक्य नव्हतं.

तो लिहिण्याच्या व मोठमोठ्या गुंतागुंतीच्या हिशेबी कामांतही फार तरबेज झाला होता. अक्षर तर फारच अप्रतिम घटलं होतं. त्याला वाटलं आपण आतां कुठं तरी नोकरी करावी.

पण अजून अज्ञातवास कायम होता. परंतु बाळाजीच्यानें स्वस्थ बसवेना. त्यानें राजापुरच्या सुभेदाराकडे नोकरी धरण्याचें ठरविलें. पण आई आणि मामा ‘ हो ’ म्हणतील कीं नाहीं याची शंकाच होती.

एक दिवस मोठ्या खुबीनें बाळाजीनें दोघांनाही पटवून दिलें कीं मी

अगदीं बिनबोभाट नोकरी करीन. कुठें पत्ता लागूं देणार नाहीं ! दोघेंही मग ' हो ' म्हणालीं.

आणि बाळाजीची लेखणी राजापूरच्या किल्ल्यांत सुभेदाराच्या फडावर चुरूचरूं लागली.

अज्ञातवासांतली नोकरी अन् तीही परक्यांची.

मुलगा घराबाहेर पडला कीं रखमाबाईला असं व्हायचं कीं बाळ घरीं कधीं परत येईल. चिमणाजी आणि अन् शामजीही हळूहळू शहाणे होत होते.

असेच दिवस उलटत होते. आणि कोंकणपट्टीवर देशाकडून सह्याद्रि ओलांडून ' उलटं वारं ' येत होतं ! ह्या वाऱ्यानं कित्येक, उकडून हैराण झालेल्या जीवांना आनंद होत होता. तर कित्येकांच्या कानाला ते झोंबत होतं ! लोकांत खळबळ अन् चुळबुळ उडत होती. देशावर पुण्याच्या बाजूला शहाजी राजे भोंसल्यांचा शिवाजी शिवाजी म्हणून एक मुलगा आपल्या आईसह रहातो. त्यानें बादशहाच्या राज्याविरुद्ध मोठंच बंड मांडलंय ! स्वराज्य करायचं म्हणतो ! मावळांतील पोरंसोरं जमवून मोठीच धूम मांडलीय त्यानं ! अशा बातम्या येतां येतां कांहीं वर्षे लोटलीं होतीं अन् आतां बातमी येऊन थडकली होती कीं शिवाजी राजानं अफजलखान नांवाचा सरदार मारला ! त्याच्या फौजा आतां कोल्हापुराकडं दौडल्यांत !

ह्या वेळीं नुकतांच बाळाजी सुभेदाराकडं कारकुनीवर चिकटला होता. वय सुमारें सतरा-अठरा वर्षांचं होतं त्याचं. तो रोज खाली मान घालून लिहीत होता; पण सुभेदारवाड्यांत शिवाजीराजाच्या गडबडीनं उडणारी तारांबळ पाहात होता. ऐकत होता. हा शिवाजी आहे तरी कसा ? देव, धर्म, गोरगरीब, माय बहिणी, गायी, तीर्थक्षेत्रें यांच्याच कल्याणाकरितां अन् अन्यायी व जुलमी सत्ता उलथून तेथें सुख-शांतिचं स्वराज्य निर्माण करण्या-करितां हा तरुण केवढाली धाडसं करतोय ! खरोखर देवमाणूसच असला पाहिजे. बाळाजीचं लक्ष शिवाजीराजाकडे गेलं. पुढें बातम्या येत गेल्या. आणि त्याचं चित्त शिवाजीराजानं पुरतंच चोरलं. त्याला वाटूं लागलं आपणही जावं शिवाजीराजाकडं. पण—आईची दुःखी मूर्ति समोर उभी राहिली

कीं त्याला वाटे, नको ! आजच त्या पुण्यकार्यांत भाग घेण्याचं भाग्य आपल्याला नाहीं. आई काळजीनं अन् दुःखानं प्राण सोडील.

एक दिवस बातमी आली कीं शिवाजीराजे पन्हाळगडच्या वेढ्यांतून पसार झाले.

--आणि राजापुरच्या सुभेदाराची फारच घाबरगुंडी उडाली. राजापुराकडे आतां आज ना उद्यां शिवाजीची टाप वळणार ही त्याला भीति वाटूं लागली. राजापूर हे विजापूरचा प्रख्यात सरदार रुस्तुमेजमान या सरदाराच्या जहागिरीचें शहर होतें. आणि ह्या रुस्तुमेजमाननें पूर्वी शिवाजी-वर स्वारी केली होतीच अन् शिवाय पन्हाळगडच्या वेढ्यांत तो सिद्दीजौहर व फाजलखानाबरोबर शिवाजीवर चालून आला होता. आतां तर शिवाजी सुटलाय !

शिवाय राजापूरच्या वखारवाल्या इंग्रज टोपीकरांनीही शिवाजीराजांशी दगाबाजी पन्हाळा वेढ्याचे वेळी केली होती ! ते इंग्रज शिवाजीराजांच्या नव्या नव्या बातम्या ऐकून तर इतके घाबरून गेले होते कीं दोन हातांनी कान झाकून घेऊं कीं डोळे, नाक, तोंड, डोकें दाबून धरूं असं त्यांना झालं होतं. आतां काय करावं हेंच त्यांना समजेना.

एक दिवस बाळाजी फडावर कामांत गर्क होता. इतक्यांत हशमानं वर्दी दिली, “ कलमदान लेकर आपको हुजुरने बुलाया है ! ”

बाळाजी कलमदान व कागद घेऊन लगेच सुभेदारांच्या सदरेस गेला. मुजरा करून त्याच्या डाव्या बाजूस उभा राहिला. सुभेदारानें हातानेंच त्याला बसावयाची खूण केली व सांगतो तो मजकूर लिहिण्यास सांगितलें. सुभेदार मजकूर सांगत होता. बाळाजी लिहून घेत होता. मोत्यांचे सरामागून सर पांढऱ्या शुभ्र कागदावर ओघळत होते. मजकूर अर्जवाचा, गोडी गुलाबीचा होता. अन् ते पत्र खुद्द शिवाजी महाराजांसच लिहिले जात होते !

पत्र लिहून पुरें झालें. सुभेदारानें थैली राजगडाकडे रवाना केली.

बाळाजी एका निराळ्याच गुंगींत तेथून परतला. आपलं—आपलं स्वतःचं नाहीं, तरी आपल्या हस्ताक्षरातील पत्र त्या देव माणसाकडे

जाणार ! त्याला गोड संवेदना होत होत्या. आपण जर अशा राजाच्या पदरी पडलो तर ?

—थैली बंद करताना आपलंही एक विनंतीपत्र आपण धाडलं असतं तर ?—छेः छेः ! काय भलतंच धाडस ! मग काय अशी अज्ञातवासातील भिकारडी परक्याची खर्डेघाशीच करायची जन्मभर ?

--नाहीं ! नाहीं ! मग ?

बाळाजीचं डोकं फिरलं ! बाळाजीला भूत लागलं ! शिवाजी महाराज ! शिवाजी महाराज !

—बाळाजी आपल्या जागेवर येऊन बसला. अगदीं न कळत धुंद मनःस्थितीत त्यानें एक कोरा कागद घेतला आणि लिहावयास सुरुवात केली ! महाराजांस पत्र ! त्याने लिहून पुरें केलें, " महाराज ! गरीब सेवकाचा स्वीकार केला पाहिजे ! " हा पत्राचा सारांश होता. पत्राचा मायना घालून महाराजांस, ' दोन्ही कर जोडून चरणकमलीं शिरसाष्टांग नमस्कार ' घालताना त्यानें स्वतःचें ' बाळाजी आवजी ' हें खरें नांव बेधडक लिहिले. पत्राची घडी त्यानें कमरेला खोंचली. आपण आज कांहीं तरी विलक्षण कृत्य करीत आहोंत ह्या जाणिवेनं त्याचं चित्त कशातच लागेना..

तो दिवस गेला. घरीं त्यानें कोणालाही कांहीं सांगितलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं तो कामावर आला. तों त्याच्या जागेवर एक इसम उभा ! त्यानें त्याला निरोप सांगितला कीं सुभेदारानं बोलावलंय ! चला लौकर ! बाळाजीच्या छातींत धस्स झालं. त्यानें कमरेला चांचपलं. काल लिहिलेलं पत्र जसच्या तसं होतं. त्याची धास्ती किंचित् कमी झाली. तो गेला.

" खत लिखना है ! " सुभेदारानें फर्मावलें. हुजऱ्यानें कागद, कलमदान व थैली आणून दिली. बाळाजी लिहूं लागला. त्याच्या डोक्यांत दुसरंच बंड उठलं होतं. हेंही पत्र राजगडावर महाराजांकडे जाणार होतं.

पत्र लिहून पुरं होतांच तें थैलींत घालून थैली जासुदाजवळ देण्यास सुभेदारानें फर्मावलें. बाळाजीनें थरथरल्या हातानें चमकदार रेती पत्रावर टाकली. तो चोरट्या नजरेनें सुभेदाराकडे अन् इकडे तिकडे पहात होता. रेती त्यानें फुंकली अन् पत्राची गुंडाळी थैलीत घातली. त्याची छातीं

घडधडत होती. त्यानें चटकन् आपल्या कमरेचें पत्र काढून त्या थैलीत घातलें अन् थैलीचा गोफ आवळला. एक निमिषभर त्याचे डोळे घट्ट मिटले गेले. त्यानें आवंढा गिळला. हात थरथरत होता. थैली त्यानें जासुदास बोलावून त्याच्या स्वाधीन केली !—आतां भरंवसा ईश्वरावर !

आपण काय करीत होतों, काय केलं आहे याचं त्याला भानच नव्हतं. मंत्रानें भारावलेल्या माणसासारखी त्याची हालचाल होत होती.

जर का हे पत्र बादशाही अमलदारांनीं वाटेतच पकडलें तर--? मरणच ! पोत्यांत घालून समुद्रांत--! आई ऽ ऽ ! आईचं कसं होईल ?

आतां भरंवसा तुझाच श्रीशंकरा !

थैली रवाना झाली.

महाराज राजगडावर होते. गडाची पद्मावती माची गजबजली होती. शाहिस्ताखानाच्या पुणें प्रांतातल्या धिंगाण्यामुळें महाराज बेचैन होते. शिवाय त्यांच्या डोक्यांत सारखे तोफांचे आवाज घुमत होते ! इंग्रजांच्या तोफांचे आवाज हे. पन्हाळ्याला जौहरचा वेढा पडला होता तेव्हां राजापूरच्या इंग्रज टोपीकरांनीं, महाराजांस पूर्वी दिलेलें वचन मोडून आपले गोलंदाज व तोफेसह दारूगोळा पन्हाळ्याकडे जौहर-फाजलखानच्या मदतीस रवाना केला ! इतकंच नव्हे तर इंग्रजी झेंडा ( युनियन जॅक ) फडकावीत किल्ल्यावर तोफा धडकावल्या. महाराजांनीं ते प्रत्यक्ष स्वतः गडावरून पाहिलं होतं. महाराजांच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली होती. ते तेव्हां ओरडले, “ हरामखोर बेवकूफ ! आमच्याशीं दगलबाजी ? ”

--त्या तोफांचे आवाज महाराजांच्या डोक्यांत घुमत होते ! त्याचा सूड घेतल्याशिवाय महाराजाचं मन शांत होणं शक्य नव्हतं ! महाराज चिडल्यानंतर त्यांना शांत करण्याचं सामर्थ्य कोणातही नव्हतं ! क्रुद्ध शिव शैलेश्वर ! संतापाचा वह्नी भडकला कीं हिमालय घळघळा विरघळावा !

राजापूरची दुसरी थैली राजगडावर आली. महाराज सदरेवर होते. महाराजांनी थैलीतलं पत्र काढलं. वाचलं. किंचित् हंसले. पत्र सुभेदाराचं होतं.

“ पंत ! ” मोरोपंतापुढं पत्र टाकीत महाराज म्हणाले. “ अक्षर असावं तर असं ! ”

आणि महाराजांनीं दुसरं पत्र उघडलं ! तेंच हस्ताक्षर, पण पहिल्या पेक्षांही सरस. वाचलं ! फक्त त्यांनी स्मित केलं आणि पत्र थैलीत ठेवलं !

महाराज जातीनं स्वारीवर निघणार ही गोड कुणकुण गडभर पसरली. पण कोठें अन् केंव्हां ? हे मात्र कुणालाच माहीत नव्हतं. जो तो उत्सुक होता, आपल्याला जायला मिळावं म्हणून.

एक दिवस अचानक हुकूम सुटला. स्वार तयार झाले. महाराज देवदर्शन करून अन् आईसाहेबांच्या पावलांना स्पर्श-वंदन करून निघाले. कोंकणच्या दिशेला महाराज दौडले.

—मध्यरात्रीची वेळ होती. सगळीकडे शांतता पसरली होती. उन्हाळ्याचे दिवस होते. राजापूर शांत झोपलं होतं. राजापूरच्या कोटावर पहारेकऱ्यांचा जागता पहारा होता. इंग्रजांच्या वखारीवरही त्यांचे गार्ड्स् बंदुकी खांद्यावर टाकून पहारा करीत होते. गांवांतल्या रस्त्यांवरही सामसूम होती. क्वचित् एखाद्या घरांतून तान्ह्या मुलाचा रडण्याचा आवाज येत होता.

——आणि एकदम वळवाचा पाऊस यावा अन् सड् सड् सड् गारा पडाव्या तशी महाराजांची फौज खाड खाड टापा उडवीत राजापुरांत घुसली. महाराज आघाडीवर होते, त्यांची तलवार उपसलेली होती. एकेक मशाली पेटूं लागल्या. त्या तांबड्या उजेडांत महाराजांचा आवेश फारच उग्र दिसत होता. भराभर स्वार इंग्रजांच्या वखारीकडे अन् सुभेदाराच्या ठाण्याकडे दौडले. त्यांना कांहीं कल्पनाच नव्हती. सुभेदाराला वाटलं होतं पत्रांनीं काम भागेल ! पहारेकऱ्यांस सपासप कापून महाराजांची माणसें तटावर चढली. दरवाजा उघडला गेला. महाराज स्वतः आंत घुसले. लढाई सुरू झाली. खडाखड गोळ्या उडूं लागल्या.

इंग्रजांची तर तिरपीटच उडाली. साऱ्या पहारेकरी गार्ड्यांना कापून मराठे वखारीत घुसले ! मोठमोठे इंग्रज साहेब इकडे तिकडे धांवपळ करीत होते. बंदुका उडत होत्या. मशालवाले मराठे सबंध वखारभर कापा काप करीत थैमान घालीत होते.

सारा गांव ह्या भयंकर दंगलीनें जागा झाला होता. मोठमोठे अरब हबशी, इराणी, काबुली, मस्कती व्यापारी मुठीत जीवन धरून आप-

आपल्या हवेल्यांत आंतून दरवाजे बंद करून रडवे चेहरे करून बसले होते. हात-पाय लटलटत होते त्यांचे. बाहेर रस्त्यांवर घोडदौड आरडाओरडा मशालींचे उजेड, किंकाळ्या, चाबकांचे आवाज ऐकूं येत होते, दिसत होते.

महाराजांनीं सुभेदारास गिरफदार करून कोटाचा कबजा घेतला. एका मोठ्या थोरल्या सोप्यांत महाराजांच्या माणसांनीं गादी लोड आणून मांडलें. महाराज गादीवर बसले. भोंवती पेटलेल्या मशाली घेऊन मंडळीं उभी राहिली. कैदी एका बाजूस उभे केले होते. महाराजांनीं राजापुरांत गबर बनलेल्या व्यापाऱ्यांस इंग्रजांस लुटण्याचे हुकूम आधीच देऊन ठेवले होते. जे व्यापारी विरोध करतील, जे आपण होऊन रकमा देणार नाहींत, त्या साऱ्यांचें सर्वस्व लुटून त्यांचे वाडे जाळून टाका असा हुकूम त्यांनी दिला होता. पण त्याच वेळीं त्यांनीं हेही सक्त बजावलें होतें कीं जे कोणी ठरलेली रक्कम आपण होऊन मुकाट्यानें देतील त्यांना थोडाही उपद्रव होता कामा नये! तसेच स्त्रियांच्या, वृद्धांच्या, मुलांच्या, फकीर मुल्लांच्या व कोणत्याही गोरगरिबांच्या अंगाला व घरांना धक्काही लागता कामा नये! मशिदी, कुराणांचे ग्रंथ व तसलीच परक्यांची धार्मिक स्थळें व वस्तू यांचा थोडासुद्धां अवमान होता कामा नये.

——आणि इंग्रजांच्या बाबतींत?

“साफ कापून काढा हरामखोरांना! त्यांच्या अमलदारांना जेरबंद करून मुसक्या बांधून आणा! त्यांची वखार लुटून फस्त करून कुदळींनी खणून काढा! सुतळीचा तोडासुद्धां शिल्लक राहतां कामा नये! हरामखोर! बेवकूफ! दगलबाज!” महाराजांच्या डोळ्यांत अंगार उसळला होता.

महाराजांच्या पुढें लुटीचे ढीग जमूं लागले. हिरे, मोती, मोहरा, लाऱ्या, किंमतवान कापड-चोपड, चांदी-सोन्याच्या वस्तू, हत्यारे वगैरे वगैरे! कोटांत मराठ्यांची सारखी धांवपळ चालूं होती. नवी नवी लूट ते महाराजां-पुढें आणून ओतीत होते.

इंग्रजांच्या सर्व अंमलदारांस मराठ्यांनी गिरफदार केलं. सारी वखार साफ लुटली! खणून काढली! गिरफदार केलेल्या इंग्रजांना बांधून आवळून मराठ्यांनी महाराजांकडे चालविलें.

शहरांत कल्लोळ उडाला. मोठ मोठ्या वाड्यांना आगी लागल्या. ज्वाळांचे डोंब उंच उसळले. खाडीतील पाण्यात त्याचें प्रतिबिंब नाचत होते. रस्त्यावरून लोक ओरडत आरडत पळत होते. सगळ्या गांवभर तांबडा-निळा उजेड पडला होता.

इंग्रजांना पुढें घालून मराठे शिपाई दरवाजांतून आंत शिरले. इंग्रज साहेबबहादुरांची तोंडं पहाण्यासारखी झाली ! गीफर्ड, वेलची, मिंगहॅम वगैरे लोक त्यांत होते. अन् अगदीं आघाडीवर होता तो राजापूरच्या वखारीचा सर्वांत बडा ऑफिसर ! —हेन्री रीव्हिंग्टन ! हेच चिरंजीव मोठे उपद्व्यापी होते ! ह्यांनींच सिद्दी जौहरकडे तोफखान्याचा सरंजाम पाठविला होता. ह्यांनीच मोठ्या मिजाशीत इंग्रजी निशाण लावून तोफा पन्हाळ्यावर उडविल्या होत्या. हा स्वतः बाकीच्या इंग्रजांस घेऊन पन्हाळ्याखालीं गेला होता ! योग्य बक्षिशी मिळत होती हरामखोरीबद्दल. दुसऱ्याच्या देशांत येऊन हे उद्योग ह्या बदमाशांचे !

त्या सर्वांस सोप्यांत महाराजांपुढें आणण्यांत आलें. एकेकाचे चेहरे काळेनिळे पडले होते. ओठ अन् जीभ कोरडी पडली होती.

" हेच ! हेच ते अंग्रेज टोपीवाले ! विश्वासाचे तहनामे करून दगाबाजी करणारे !-- " महाराज रागानें पहात म्हणाले.

" Your Majesty--! " मोठ्या नम्रतेचा आव आणून हेन्री रीव्हिंग्टन कांहीं बोलणार तोंच--

" बंद करा ही वटवट ! तुमची हरामखोरी आमच्या मर्जीस बिलकूल मंजूर नाहीं ! पंत ! उजाडतांच ह्या साऱ्यांची रायगडच्या कैदखान्यांत रवानगी करा ! " महाराजांनी मोरोपंतांस फर्मावलें.

इंग्रजांस बाजूस नेण्यात आले. ते रडव्या चेहऱ्यांनी एकमेकांकडे बघत होते.

शहरभर मराठ्यांनी धुमाकूळ मांडला होता. पण महाराजांनीं दिलेल्या हुकुमांचं थोडंही उल्लंघन होत नव्हतं. लोक मात्र भयभीत होऊन घरांघरांत बसले होते.

घोड्यांच्या टापा, बंदुकांचे बार, लोकांच्या किंकाळ्या आणि भयंकर आरडाओरडा एकदम सुरू होतांच बाळाजी अन् बाळाजीच्या घरची

सर्वच मंडळी खडबडून जागी झाली. वाड्याचा दरवाजा आंतून बंद होता. बाहेर भीषण दंगल चालली होती. हा काय प्रकार आहे हे कोणास समजेचना. विसाजीपंतमामा ओटीवर अन् अंगणांत येरझारा घालीत होते. बाहेरचा धुमाकूळ वाढत होता.

रखमाबाई शामजीला घेऊन ओटीवर बसली होती. ती फार घाबरली होती. आणि मामाही पण भयग्रस्त झाले होते. येवढ्यांत येवढेंच त्यांना समजून आले कीं कोणती तरी फौज शहरांत घुसली असून तिनें लुटालूट अन् कत्तल चालविली आहे !

बाळाजी ओटीवर बेचैन होऊन उभा होता. बाहेर बार अन् किंकाळ्या येऊं आल्या कीं एकदम छातींत धस्स होई अन् त्या दिशेला नजर जाई. रखमाबाईला तर ह्या अरिष्टानं रडूं कोसळलं. आतां आपल्या घराकडे ही धाड वळणार कीं काय ? आणि दुर्दैवानें वळली तर—? नको रे देवा ! माझी बाळं—माझा दादा—माझी वहिनी !

बाहेर आगीचे प्रचंड डोंब उसळले ! त्यांचे झगझगीत लोळ उंच आकाशांत चढलेले रखमाबाईला ओटीवरूनही दिसूं लागले. दरवाजा उघडून बाहेर काय चाललंय तरी काय हें पहाण्याची बाळाजीला फार ओढ लागली होती; पण आई सारखी सांगत होती, " बाळा ! पुढें नको रे जाऊस ! नसतं अरिष्ट ओढवेल ! "

वाड्यांत बाळाजीला अन् सर्वांनाच फक्त भयंकर आवाज ऐकूं येत होते अन् आगीचे लोळ वाढत्या प्रमाणांत दिसत होते. एकदम खाड खाड टापा वाजत घोडेस्वार दौडत गेल्याचं समजे. मध्येंच बंदुकांचे बार उडत; कोणाला तरी मुसक्या बांधून असुडाचे तडाखे उडवीत नेत असल्याचे किंकाळ्यांवरून, असुडांच्या आवाजांवरून अन् दरडावण्यावरून समजे. हे सारं अंगणाच्या भिंतीपलीकडे चाललं होतं. रस्त्यावरून अन् शहरांत प्रत्येक क्षणाला रखमाबाईला, मामांना अन् सर्वांनाच भीतीनें धसका बसे कीं आपल्या घराकडे ही धाड वळणार कीं काय ?

अशाच भीतीदायक धाकधुकीत, चिंताक्रांत स्थितींत एक एक क्षण जात होता. दोन घटका गेल्या. दंगल वाढतच होती.

आणि येवढ्यांत ! ठक् ठक् ठक् ठक् ठक् ! विसाजीपंतांच्या दरवाजावर खूप जोरानें तरवारीच्या मुठी अन् दरवाजाची कडी वाजूं लागली ! हांका ऐकूं लागल्या ! ! आली धाड ! ! ! सर्वांच्या काळजाचं पाणी पाणी झालं ! धडधडत्या छातीनं मामा दरवाजाशीं गेले. त्यांच्या मागें ओटीवरून उडी टाकून बाळाजी निघाला. रखमाबाई एकदम ओरडली, " बाळा ऽऽ ! " घरांतली सर्वचजण भयंकर घाबरली. बाळाजी मामापाशीं गेलाच.

दरवाजा जोरजोरानें वाजत होता. मामा दरवाजाशीं आले. त्यांचे हात थरथरत होते.

" कोण आहे ? कोण पाहिजे ? " मामांनीं मोठ्यानें विचारलें.

" दरवाजा उघडा आधीं ! उघडा ! उघडा !! " बाहेर दरवाजा वाजत वाजत दरडावणी उठली.

रखमाबाईनं शामाला कवटाळलं. ती रडूं लागली.

" वहिनी ! आतां काय होणार ग ऽ ! "

दरवाजा उघडणं भाग होतं. मामांनी अन् बाळाजीनें आडसर लोटला अन् कड्या काढल्या धडाड्कन् धडक बसून दरवाजा उघडला गेला ! मामा अन् बाळाजी दचकून मागे हटले. एकदम चार पांच ढालाईत अन् एक साधा इसम आंत घुसले !

" आई अंबाबाई ऽऽ ! " रखमाबाईनें कळवळून आरोळी मारली.

ढालाइतांबरोबरच्या त्या इसमानें एकदम बाळाजीकडे बोट केले. बाळाजी अन् मामा दचकले.

" चला आमच्या संग ! तुमास्नी घेऊन यायाचा हुकूम झाला हाये ! चला ! " ढालाईत म्हणाले.

बाळाजीला घेऊन लगेच ढालाईत दरवाजाबाहेर पडले.

रखमाबाईचें काळीज फाटलें ! ती आक्रोश करूं लागली. मामाही गोंधळून गेले.

किल्ल्यांत बाळाजीला घेऊन ढालाईत शिरले. महाराज एका विस्तीर्ण सोप्यांत चाफेखणांत उंच गादीवर लोडाशी बसले होते. त्यांच्या पुढें निरानिराळ्या मौल्यवान धन-दौलतीचे ढीग पडले होते. सोप्याच्या पुढच्या अंगणांतही मोठमोठे ढीग व पेटारे पडलें होतें. मराठी शिपायांची सारखी ये-जा चालली होती. महाराजांच्या आंवतीभंवती कांहीं कारकून, मावळे, हुजरे वगैरे उभे होते.

लुटीच्या ढिगांत नव्या नव्या थैल्या आणून शिपाई ओतीत होते. खाली अंगणांत गोरे टोपीवाले इंग्रज चोरासारखे उभे होतें. त्यांच्यावर पहारा होता. सबंध कोटांत गजबज, धांवपळ, धांदल! हुकुमांच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या. मशालींच्या उजेडांत हा सारा कारभार चालला होता. महाराज आपल्या लोकांना हुकूम देत होते.

येवढ्यांत बाळाजी ढालाइतांबरोबर सोप्याच्या पायऱ्या चढून वर आला. ढालाईत मुजरा करीत करीत महाराजांपुढें गेले अन् बाजूला झालें. बाळाजीनें हात जोडले. महाराजांनीं रोखून बाळाजीकडे पाहिलं अन् किंचित् हंसून त्यानीं विचारलं, " आपलं नांव ? "

" बाळाजी आवजी चित्रे प्रभु ! "

" हं ? " कमरेच्या शेल्यांतून एक पत्र काढून महाराजांनीं विचारलें, " हें पत्र आपलंच ? "

हुजऱ्याच्या हातीं महाराजांनीं पत्र दिलें. हुजऱ्यानें ते बाळाजीस दिलें.

" होय महाराज ! "

——आणि आतां महाराज पुढें कांहीं बोलणार इतक्यांत——

" महाराऽऽज ! दया——दया करा ! "

महाराजांच्या कानावर आर्त विनवणीचे कातरत कातरत उमटलेले शब्द आले. महाराजांची नजर अंगणाकडे वळली. पदर पसरून रडत रडत रखमाबाई येत होती. ती पायऱ्या चढून वर आली. मागोमाग मामाही आले. ते जोत्याखालीं अंगणातच उभे राहिले. काळजीनें ग्रस्त झाले होते.

" महाराज ! भिक्षा मागते ! येवढा माझा जीव मला परत द्या हो !

सात जन्म रीण विसरणार नाहीं ! बहीण आहे मी तुमची ! " रखमाबाईनें महाराजांचे पाय घट्ट धरले. ढसढसा रडत होती ती.

" महाराज ! मी वनवासी आहे हो ! "

" होय ! आणि तो वनवास आतां संपला आहे ! बाई ! तुम्ही निश्चिंत असा ! तुमचा मुलगा आम्ही कांहीं मारण्यासाठीं आणला नाहीं ! " महाराज म्हणाले. त्यांच्या मुखावर प्रशांत स्मित झळकत होते. " आम्ही तुमचे भाऊच आहोंत ! "

भाऊ ? आश्चर्याचा एकदम गोड धक्का बसून ती चित्रासारखी पहातच राहिली ! अमृत ! अमृत ! रखमाबाईला वाटलें अमृतच बरसतंय आपल्या अंगावर. मुलगा जिवंत परत मिळणार ! केवढा आनंद ! हंसणं न् रडणं एकदमच ! आश्चर्य, आनंद, कारुण्य, वात्सल्य, कृतज्ञता सारं सारं एकदम तिच्या मुखावर दाटी दाटी करूं लागलं ! आईच ती ! तिनें भुईवर मस्तक टेकविलें.

" पंत ! " महाराजांनी मान वळवून पंतांना खूण केली, लगेच एका ताटांत लुगडें, चोळी अन् शंभर मोहरा घालून कारकुनानें पंतांजवळ ताट दिलें. महाराजांनी आपला उजवा हात ताटास लावला.

आनंदातिशयानं उपरण्यानें डोळे टिपीत मामा अंगणांत उभे होते.

बाळाजी आपला आनंद गालाआड दडविण्याचा प्रयत्न करीत होता.

" बाई ! आपल्या मुलाची काळजी थोडीसुद्धां करूं नका ! " महाराज गोड मृदु शब्दांत म्हणाले.

पंतांनी ताट तिच्यापुढें नेलें.

" ही आमची भेट ! " महाराज म्हणाले.

' देव ' ' देव ' म्हणतात तो हाच का ? हे राक्षस आपला मुलगा नेणार म्हणून ती हंबरडा फोडीत आली होती; पण प्रत्यक्ष पहाते तों—कल्पवृक्ष !

पंतांनी तिच्या पदरांत लुगडें, खण व मोहरा ओतल्या. पदर भारावला अन् त्याहीपेक्षां हृदय भारावलं. आनंद उतू जात होता.

" बाळाजी ! तुम्ही आमच्याजवळ रहाणार ना ? " बाळाजीच्या उत्तराची वाटही न पहातां महाराज लगेच पंतांस म्हणाले, " पंत ! आमच्या खास दिमतीस यांची योजना करा ! बाई ! आमच्या बाळाजींना आम्ही नेणार ! तुम्हीही आलं पाहिजे ! " महाराज हंसून म्हणाले.

" महाराज-- ! " गहिंवरानं तिच्या तोंडून शब्दच उमटेनांत. तिच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते.

बायकांच्या असीम आनंदाचीही पूर्तता रडल्याशिवाय होतच नाहीं !

* आधारः—चिटणिसांचा वाका, कायस्थ प्रभूंच्या इतिहासाची साधनें शिव-भारत अध्याय ३०; पत्रसार-संग्रह ले. ८५२ इत्यादि; राजापूर-स्वारीः-मार्च १६६१.

* **आधारः**—( ' संगमेश्वर ' ह्या प्रकरणाचे ) ( १ ) शिवभारत अध्याय ३० व ३१. शृंगापूर जिंकलें:—२९ एप्रिल १६६१. बडी बेगम मक्केच्या यात्रेस निघाली:—मार्च १६६१.

* **आधारः**—( ' झडप ' ह्या प्रकरणाचे ) ( १, २, ५ व ६ ):—शककर्ता शिवाजी, शिवचरित्र निबंधावली; ( ३ ) शिव का. प. सा. संग्रह ले. ९३०; ( ४, ८ ते ११ ):-सभासद; ( ७ ):-जेधे शकावली; शिवाय नुष्क-ई-दिल्काश, आलमगीरनामा, फार्सी साहित्यखंड ३ रा, एक्याण्णव कलमी. कात्रजच्या घाटांत बैलांच्या शिंगांना पलिते लावले हा प्रकार फक्त बखरींत दिलेला सांपडतो. खानावर झडप व बोटें तोडलीं इत्यादि प्रकार:—५ एप्रिल १६६३, मध्यरात्रीनंतर.

राजापूर महाराजांनीं लुटलं व काबीज केलं हे विजापुरास बड्या बेगमेस समजले. महाराजांचा नायनाट करण्याचा तिनें अटोकाट प्रयत्न अफझल-खानापासून किती तरी केला. पण हाय ! सांपडेचना हा डोंगरचा उंदीर ! बिचारी हताश झाली. तितें मक्केच्या हाजच्या यात्रेस जाण्याचे ठरविले ! सर्व तयारी करून ती मक्केस निघाली. बिल्ली चली हाज ! बिल्ली चली हाज ! उंदीर सांपडेना म्हणून !

महाराज दाभोळास दाखल झाले. महाराजांबरोबर तान्हाजी मालुसरे, पिलाजी निळकंठराव सरनाईक, त्र्यंबक भास्कर वगैरे मंडळी होती. दाभोळास येतांच त्यांनीं बंदरांतच सैन्य घुसवून गांवाचा ताबा घेतला. दाभोळ हें पूर्वींही एकदां ( इ. स. १६५९ ) महाराजांच्या लोकांनीं घेतलं होतं; पण ते गेल्या वर्षांतल्या भयंकर गडबडीत विजापूरकरांनीं परत घेतलं होतं. आतां ते परत स्वराज्यांत सामील झालं.[१]

दाभोळास दाल्भ्येश्वराचें फार प्राचीन शिवमंदिर होतं. महाराज दाल्भ्येश्वराच्या दर्शनास गेले. सहस्र धारांखालीं स्नात होत असलेल्या त्या शंभुशंकराचें मोठ्या भक्तिभावानें त्यांनीं दर्शन घेतलें.[२] मंदिरांत घणघणलेल्या घटांनीं असाच निनाद केला कीं, हे प्रजाजनांनो, हा प्रदेश आतां शत्रूच्या भयापासून कायमचा मुक्त झाला आहे ! हे सर्व प्राणिमात्रांनो, आतां तुम्ही सुखी असा ! निर्धास्त असा !

महाराजांनीं दाभोळच्या ठाण्यांत दोन हजार फौज व तिच्यावर एक शूर अधिकारी नेमून ठेवून चिपळूणकडे आपली ढाल त्यांनी वळविली. हा सारा प्रदेश जिंकीत जिंकीत ते चालले होते. महाराजांस फारसा प्रखर विरोध होतच नव्हता. कारण विरोध करायला विजापूरचा बडा सरदार असा तिथें कोणी नव्हताच. होता तो एकच. तो म्हणजे शृंगार-पूरचा सूर्याजीराव. हे सूर्याजीराव मोठे शूर होते. दुसरे एक बहाद्दूर होते. ते म्हणजे पालीचे जसवंतराव. पण महाराज दाभोळास दाखल झाले

आहेत असे समजतांच हे जसवंतराव इतके घाबरले कीं, आसरा घेण्यासाठी त्यांनी श्रृंगारपूर गांठले. महाराजास अडविण्याचं धारिष्ट सूर्याजीरावास होतच नव्हतं.

महाराज दाभोळाहून चिपळुणास आले. चिपळूणचाही कब्जा त्यांनी आसानीनें घेतला. चिपळूणचा प्रदेश मोठा रम्य होता. शर्मिष्ठेचें पात्र, परशुरामाचें क्षेत्र आणि वृक्षराजीचें छत्र यांमुळें मन प्रसन्न होई. महाराज श्रीपरशराम-दर्शनास फार आतुर झाले होते. महाराजांनी आपल्याबरोबर

सर्व परिवार घेतला व ते श्रीच्या दर्शनास निघाले. श्रीपरशुरामाचें मंदिर नजीकच एका डोंगरावर होतें. तेथें निर्झर संतत वहात होते. वृक्षलतांची दाट राजी होती.

महाराजांनी क्षेत्रस्थ सर्व ब्रह्मवृंदांस निमंत्रण पाठविले. ती ब्राह्मण मंडळी मंदिरांत गोळा झाली. पूर्वी म्हणजे आतांपर्यंत जंजिऱ्याचा सिद्दी त्यांना लुटायला, मारायला, बाटवायला येत असे. ते सदैव व चिंताक्रांत असत. आज महाराजांनी आशीर्वाद देण्यासाठीं त्यांना निमंत्रिलें.

वाद्यांच्या व वेदांच्या घोषांत महाराजांनी श्रीपरशुरामाची मोठ्या मनोभावानें शोडषोपचारपूर्वक पूजा केली.[३] श्रीपरशुराम व त्याच्या डाव्या उजव्या बाजूस काल आणि काम यांच्या मूर्ती समयांच्या प्रकाशांत फारच मोहक दिसत होत्या.[४] पूर्वी दंडकारण्यांत आलेला असतांना अयोध्येच्या राजा रामचंद्रानें परशुरामाची पूजा केली होती. आज त्याच रामचंद्राच्या वंशांतल्या शिवरायानं त्याची तितक्यांत भक्तिप्रेमानं पूजा केली.

पूजेनंतर महाराजांनी जमलेल्या सर्व वेदोनारायणांस ओंजळी ओंजळीनें दक्षिणा दिली.[५] वस्त्रें दिली. पूजेचा सोहाळा संपवून महाराज परतले.

सारी सृष्टि डोलत होती. कोंकणचा हा रम्य प्रदेश स्वराज्यांत दाखल झाला. पूर्वेला उंच उंच डोंगर. पश्चिमेला आकाशाच्या कुशींत धुसलेला समुद्र. सारी भूमि झाडामाडांनी डवरलेली. उंडी, बकुळी, नागवेली, नारळी, पोफळी, आंबा, फणस, काजू यांची दाटी.[६] मंदिरें, देव देवता, तीर्थक्षेत्रें अन् वनोपवनें खूप. ह्या भागांत प्रामाणिक, कष्टाळू अन् निष्ठावंत मराठी मनं आणि मनगटं उमाप विखुरलेलीं. पण आजपर्यंत सत्ताधिशांच्या

मुकाट लाथा खात, शेतीभाती लुटली तुडविली गेली कीं कपाळाला हात लावीत अन् काटक्याकुटक्या व शेण्या वेंचीत जगत होते बिचारे. आतां स्वराज्य आलं. सोनं, मोतीं, हिरें, माणकं मिळाल्यावर महाराजांस फारसा आनंद होत नसे. पण अशी माणसं मिळाली कीं मग राजाचं मन कमळासारखं उमलायचं. अन् चांदी-सोनं आणि हिरे-मोती कशाला मिळवायचे ? अशा निष्ठेच्या कर्तबगार स्वराज्य-सेवकांच्या अंगाखांद्यावर कंठे, गोफ अन् कडी-तोडे घालण्याकरितांच ना ?

या कोंकणांत ब्राह्मणांची वस्तीही खूपच होती. वर्णानें गोरे गोरे, डोळ्यांनी घारे घारे, बुद्धीनें चलाख अन् स्वभावानें लाख. पण अतिशय व्यवहारी. बोलण्यांत फार गोड. बोलायला लागलें कीं अनुस्वार न् अनुस्वार मोजून घ्यावा !

—नंतर महाराज संगमेश्वरावर चालून गेले.[८] तेही स्थळ त्यांनी कबजांत आणलें. हें स्थळ फारच महत्त्वाचें होतें. करवीर प्रांताकडे जावयाच्या घाटवाटा संगमेश्वरास अगदीं नजीक होत्या. शिवाय सूर्याजीराव श्रृंगारपूर-कराच्या गस्तीवर रहाणं जरूर म्हणून हें ठाणं महत्त्वाचं होतं. महाराजांनी तान्हाजी मालुसऱ्यास व पिलाजी नीळकंठराव सरनाइकास संगमेश्वरास फौजेसह रहाण्यास सांगितलें.[९]

महाराजांनी चिपळूण-दाभोळाप्रमाणेंच शेठवली, सौंदळ, हरचेरी, नेवरें, नाधवडें, कोतवडें, केळवली, कशेळीं, पांवस, धामणसें, बेलवडें, खारेपाटण वगैरे गांवेंही जिंकलीं.[१०] राजापूर तर घेतलेच होते.[११]

महाराजांनी तान्हाजीस व पिलाजी सरनाइकास संगमेश्वरास फौजेसह ठेवून देवरुखाकडे स्वतः कूच केले.

हा पिलाजी सरनाईक म्हणजे पुरंधर गडाजवळच्या चांबळी गांवचा रहाणारा. पुरंदऱ्यांचं सासवड, बडध्यांचं अन् अत्र्यांचं कोढीत, पंताजी गोपीनाथ बोकिलांचं हिवरं आणि सरनाईकांची चांबळी अगदी खेटून खेटूनच आहेत. पुरंधरची किल्लेदारी ह्या सरनाईक घराण्यांत पिढ्यान् पिढ्या होती. फत्तेखानाच्या मोहिमेच्या वेळी ( इ. १६४९ ) महाराजांना पुरंधर गडावर ज्यांनी खूप मदत केली ते महादाजी नीळकंठराव सरनाईक हे ह्या

पिलाजीचे वडील. नीळकंठराव हा किताब होता सरनाइकांना. पुरंधर स्वराज्यांत दाखल झाल्यापासून पिलाजी महाराजांच्या निसबतीत होता. मोठा चांगला माणूस. जातीनं ब्राह्मण. देशस्थ ऋग्वेदी. तेव्हां रंगरूपाचं वर्णन कांहीं करायला नकोच !–आणि त्याच्या जोडीला तान्हाजी मालुसरे होता. तान्हाजी म्हणजे तान्हाजी ! दुसरं कसलं वर्णन सांगायचं त्याचं ? अगदी लालमहालापासून महाराजांचा खेळगडी. दोघांनाही मिशा उगवायच्या होत्या त्याच्या आधीपासूनचे मैतर. आणि आतां तर तान्हाजीच्या मिशा त्याच्या ओठांवर मावत नव्हत्या ! महाराजांच्या काळजांत तान्हाजी मावत नव्हता अन् तान्हाजीच्या काळजांत महाराज मावत नव्हते.

महाराजांनी कोंकणांत मांडलेली शरारत विजापुरास बादशाहास समजली. नेहमीच्या संवयीप्रमाणें तो खूप खवळला. ज्यानें शृंगारपूरकर सूर्याजीरावास मोठें खरमरीत पत्र पाठविलें. आणि जाब विचारला कीं, येवढं मोठं राजापुरासारखं बादशाही शहर शिवाजीनं लुटलं अन् घेतलं तेव्हां तुम्ही करीत काय होता ? येवढा मोठा मुलुख शिवाजीनें घेतलाच कसा ? गाफील आहांत ! अजूनही तावडतोब जाऊन शिवाजीस कोंडा ![१२] त्याला जेरीस आणा ! त्याचा चुराडा करा !

—अहा ! चुराडा ! आदिलशाहाला रिकामटेकडी फर्मानं पाठवायला काय होतं ? इथं शिवाजीपुढं कसा हुरडा भाजून निघतो ते सूर्याजीरावास चांगलं माहीत होतं ? पन्हाळ्याला तो सिद्दी जौहरच्या मदतीस गेला होता तेव्हां खुद्द बाजी प्रभूशी विशाळगडाच्या वाटेवर खिंडीत झुंजायच्या प्रसंगी मसूदबरोबर तो होतांच. सहज लोडाला टेकल्या टेकल्या हलक्या हातानं अलगद बोटावर चुना घेऊन डाव्या तळहातावरच्या तंबाखूचा चुराडा करणं अन् शिवाजीचा चुराडा करणं यांत फार फरक आहे हें तो ओळखून होता. इथं तळहाताच्या पिछाडीलाच चुना लागण्याची शक्यता मोठी !

पण आतां विजापूरचं फर्मानं आलं.[१३] कांहीं तरी केलंच पाहिजे. नाहीं तर बादशहा कोपेल म्हणून सूर्याजीराव डोकं खाजवूं लागला.

तान्हाजीस व पिलाजीस महाराजांनी संगमेश्वरास एक कामगिरी करावयास सांगितली होती. संगमेश्वराच्या आसमंत भागांत असलेले रस्ते,

खाचा खळगे, झाडी, टेंगळे वगैरेनें अत्यंत त्रासदायक झालेले होते. वाहतुकीस व प्रवाशांस फारच यातना होत. हे रस्ते दुरुस्त करण्याची कामगिरी महाराजांनी सांगितली होती.[१४] त्या कामास सुरुवातही तान्हाजीनें थोडीशी केली होती.

संगमेश्वरांत मराठी फौजेचा तळ होता. आणि एका काळ्या मध्यरात्री अकस्मात् मराठी फौजेवर सूर्याजीरावानें फौजेसह येऊन झडप घातली ![१५] मराठी लष्करांत गडबड उडाली. पण सारे सावध होते. एकदम सारे हत्यारें घेऊन उठले. तान्हाजीनें ढाल-तलवार घेऊन आपली तुकडी सूर्याजीरावाच्या ऐन तोंडावर आणली. पिलाजीही फौज बाहेर काढून शत्रूंशी झुंजू लागला. जबरदस्त लढाई पेटली. रात्रीची वेळ. सूर्याजीराव भलताच लढाऊ होता. तान्हाजीच पुढें होता म्हणून त्याच्यापुढें सूर्याजी-रावाचं कांहीं चालेना. तान्हाजीने सूर्याजीरावाचा हल्ला मागें मागें हटवीत नेला.

दुसऱ्या बाजूस पिलाजी लढत होता. त्यानेंही खूप जोराचा प्रतिकार चालविला होता. पण त्याच्यावर शत्रूचा जोर वाढत होता. सैन्यही खूप होतें. अंधारांतून बाण अन् गोळ्या येत होत्या. त्यामुळें पिलाजी बुजला. शत्रू पुढें पुढें अंगावर येऊं लागला.

तान्हाजीनें आपली आघाडी मात्र पक्की रोखली होती. त्यानें अनेकांना लोळविलं. पिलाजीची तारांबळ उडूं लागली. शत्रू ओरडा करून पुढं येऊं लागला. आपल्याला हा मारा सहन होत नाहीं असं पिलाजीला दिसूं लागलं. त्याची स्थिती फारच विचित्र झाली. आतां आपल्याला मारून शत्रू गांवांत घुसणार असें त्याला वाटलें. तो फारच घाबरला. तान्हाजीला याचा अजून-पर्यंत सुगावा नव्हता. येवढ्यांत त्याला शत्रूचा गलका ऐकूं आला. त्यानें आपल्या फौजेला सतत लढत राहण्यास व एक तीळभरही जागा न सोडण्यास दरडाविले. आपल्या हाताखालच्या शिलेदारांस आघाडीवर लढत राहण्यास फर्माविले व तो स्वतः पिलाजीच्या बाजूस धांवला. त्याच्या-बरोबर त्याचेही थोडे मराठे शिपायी होते.

तान्हाजी पिलाजीच्या बाजूस येऊन पहातो तो काय ! पिलाजी पळत

सुटला होता.[१६] शत्रू पाठलाग करीत होता ! तान्हाजीनें ते पाहिलं. त्याचं मस्तक खवळलं. त्यानें आपल्याबरोबरच्या मराठ्यांस फर्माविलें कीं शत्रूवर जा चालून अन् घालवा माघारी. लगेच ते मराठे शत्रूच्या बेफाम बनलेल्या हशमांवर धांवले. तरवारी सुरू झाल्या.

तान्हाजी स्वतः धांवत पिलाजीच्या मागं लागला.[१७] पिलाजीनें ढाल तलवार टाकून दिली होती अन् तो पळत होता.[१८] तो फारच भ्याला होता. त्याला अंधारांत कल्पनाही नव्हती कीं आपल्यामागें तान्हाजी धांवत येतोय ! तान्हाजी फारच रागावला होता. नामर्दपणाचा तान्हाजीला भारी राग यायचा.

तान्हाजीनें पिलाजीला गांठलें. आणि एकदम त्याची मागून मानगूट पकडली. पिलाजी घाबरून ओरडला. त्याला घाम सुटला होता. त्याचें सगळे अंग कांपत होतें. धाप लागली होती.[१९]

" नामर्दा ! " तान्हाजी त्याच्या मानेला हिसका देऊन ओरडला. पिलाजीनें ओळखिले कीं हा तान्हाजी आहे.

" सुभेदा ऽ र ! " पिलाजी कांपऱ्या आवाजांत ओरडला.

" पळून जातोस ? आरं तुझी औलाद कुनाची ? महादजीबाबानी सर्गातून पगितलं तर काय म्हनतील तुला ? " तान्हाजी म्हणाला.

" नाही नाही, सुभेदार ! माझा धीर सुटला ! "

" धीर सुटला ? काय तुझं बोलणं ! आरं आवघड वख्ताला बायकाबी धीर धरत्यांत ! महाराजानी तुला आन् मला इथं ठिवलं ते पळून जायला ?[२०] " आणि तान्हाजीनें त्याला मानगुटीला धरून एकदम लढाईच्या तोंडावर आणलं.

मशालीचा उजेड नाचत होता, तान्हाजीचे अन् पिलाजीचेही मराठे शिपायी सूर्याजीरावाच्या लोकांशीं कडाक्यानें लढत होते.

" बग बग जरा ही मर्दाची औलाद कशी लढतीय ! तुझ्या काल-पावतर निस्त्या गमजाच चालल्या व्हत्या ![२१] " आणि तान्हाजीनें जवळच पडलेला एक मोठा थोरला कासरा उचलला.

" काय करताय सुभेदार तुम्ही ? " पिलाजीनं घाबरून विचारलें.

" दावतो तुला ! लढाई बघायला शिकीवतो ! बग–" आणि तान्हाजीनें पिलाजीला कासऱ्यानें बांधले ! तो गयावया करीत होता,

" नगं नगं कसं ? थांब वाईच ! "—आणि तान्हाजीनें जवळ असलेल्या एका मोठ्या थोरल्या उभट दगडाजवळ त्याला बकोटीला धरून नेलें व त्या दगडाला त्याला चक्क बांधून टाकलें [२२] !

" सुभेदार–! —" पिलाजी हिसके देत होता. पण तो सुटतोय होय? तान्हाजीनें आवळेला दोरखंड होता तो.

" लढाईत गलिमाम्होरं ह्ये आसं पक्कं उभं राह्याचं असतं ! बांधून टाकल्यागत ! येक पाऊलबी न्हाई मागं व्यायाचं ! " अन् तान्हाजी आडदांडासारखा हंसला, " आतां पळ कुटं पळतुइस त्यो ! धोंडा पाटुंगळी घे आन् पळ ! ! "

आणि लगेच तान्हाजी समशेर उमसून अन् ढाल घेऊन सूर्याजीरावाच्या लढत्या लष्करावर उड्या टाकीत धावून गेला. मराठे शत्रूशी लढतच होते. सूर्याजीरावाला वाटलं होतं कीं डाव जिंकला ! पण मराठ्यांनीं आडसर घातला.[२३]

तान्हाजी ओरडत, हर हर महादेव करीत आणि इतर आपल्या लोकांना चेतवीत शत्रूवर तुटून पडला. भयंकर लढाई त्या रात्रीच्या घन तिमिरांत उसळली. तान्हाजीनें शृंगारपुरी सैन्याची पार त्रेधा उडविली. पार दाणादाण उडविली. सूर्याजीरावाची फौज फार मारली गेली. तान्हाजी अन् तान्हाजीचे लोक फार भयंकर आवाजांत जयघोषाच्या आरोळ्या ठोकीत होते.[२४]

तान्हाजीनें उडविलेल्या हल्लकल्लोळांत सारखा ओरडा होत होता. मधून मधून शब्द ऐकूं येत होते. कुणी ओरडत होते. " अरे हुश्शार हो ! " कुणी ओरडत होतं, " अरे हाण ! " कुणी म्हणत, होतं " दे ! " " थांब ! ", " फेंक ! " " पोहोंचव ! ", " वांचव ! " " टाक ! " " सोड ! ", " पळ ! ", " ने ! ", " परतव ! ", " पह्य ! " " फोड ! " " तोड ! " " घे ! " " पाड ! " " मार ! ".[२५]

सगळीकडे मुंडकी, तुटके हात, पाय, पागोटी, ढाली, तरवारी इतस्ततः विखुरल्या होत्या.[२६]

सूर्याजीरावाची दाणादाण उडविली तान्हाजीनें. सूर्याजीरावाचा धीर सुटला आणि जी पळापळ सुरू झाली ती वाऱ्यावर उडणाऱ्या पाचोळ्या-सारखी. पार पळत सुटले ! सूर्याजीराव आघाडीला ! एक माणूस उरला नाहीं ! तान्हाजीचे लोक गर्जत होते. तान्हाजीही त्यांना साथ देत हंसत होता. नगारा वाजूं लागला होता.[२७]

आणि मग हंसत हंसत तान्हाजीनें पिलाजीचा दोर सोडून त्याला मोकळे केलें. लई थट्टा केली. पण तेवढीच, पुन्हा नाहीं.

महाराजास हा लढाईचा प्रकार समजला. ते संगमेश्वरास येण्यास निघाले.[२८] महाराज संगमेश्वरानजीक आल्याचे समजतांच तान्हाजी व पिलाजी मोठ्या उत्साहानें महाराजांस सामोरे निघाले.[२९] त्यांनीं आपल्याबरोबर आपली पराक्रमी फौजही घेतली.

" पिलाजीराव ! तुम्ही आसं करा-वाईच चार पावलं म्होरं व्हऊन शिवबाला सामूरं व्हा ! समदी पायदळाची मानसं घेऊन मी चालत येतो ! तुम्ही जावा म्होरं ! चला जावा बिगी बिगी ! " तान्हाजी पिलाजीला म्हणाला.

लगेच घोड्यावर स्वार होऊन स्वारांसह पिलाजी दौडला.

महाराज आपल्या सैन्यासह समोरून येत होते. पिलाजी सामोरा गेला.[३०] घोड्यावरून उतरून मुजरा करीत करीत पुढं गेला. महाराजांचा घोडा थांबला.

" अन् तान्हाजी कुठंय ? " महाराजांनी एकदम विचारलं.

" सुभेदार निघालेतच ! मला त्यांनीं पुढें पाठविलं ! "

मग लगेच महाराज पुढें निघाले. पिलाजीही निघाला. तान्हाजी निघालेलाच होता. वाटेतच गांठ पडली. तान्हाजी दोन्ही दोन्ही हातांनीं मुजरा करीत पुढं झाला. महाराजांनी झटकन् घोड्यावरून उडी टाकली. महाराजांना फार आनंद झाला होता.

" फत्ते केलीस ! शाब्बास शाब्बास ! " महाराजांनी कौतुक मांडलं.[३१] " मोठीच तारीफ ! तुझ्या समशेरीला पदवी नाही तान्हा ! " महाराजांनीं तान्हाजीची पाठ थोपटीत म्हटलं.

"समदं बळ आईसाहेबांच्या पावलांचं ! तिचं पुन्य मोठं म्हणून तिच्या वानीला येश येतय ! माझ्या माथी तिचा हात !"

नंतर महाराजांनी तान्हाजीसह संगमेश्वरांत प्रवेश केला. तान्हाजीनें सूर्याजीरावाची सगळी लढाई महाराजांना सांगितली. महाराजांनीं तान्हाजीचा अन् सर्वांचाच मोठा मान केला.[३२]

—पुढें महाराजांनीं पंधरा हजार पायदळ जमा केलं आणि शृंगारपुरावर ते जातीनें चालून निघाले.[३३]

महाराज चालून येत आहेत हे समजल्यावर सूर्याजीराव घाबरून गेला. सूर्याजीरावाचा बींमोड करायचा महाराजांनीं मनांत पण धरला. सूर्याजीराव फिकिरींत पडला. आतां शरण गेलों तरी शिवाजी आपल्याला आश्रय देणार नाहीं. आपली जात दगलबाजाची. राजा आपल्याला जिवं मारील हे भ्या धरून सूर्याजीराव चिंतेत बुडाला.

महाराज शृंगारपूरच्या जंगलांत शिरले. झाडींत रानटी पशु-पक्ष्यांचीच गर्दी होती. झाडांच्या डोल्यांत घुबडं घुमत होती. कित्येक ठिकाणीं नागांच्या काती चकाकत पडल्या होत्या. महाराज पायदळासह चालले होते.[३४]

महाराज शृंगारपुरापाशीं आले. सूर्याजीरावाची अजिबात चाहूल लागेना. त्याच्या पुढें गेलेल्या प्याद्यांनीं खबर आणली कीं सूर्याजीराव भय खाऊन पळून गेला![३५] गांव ओस आहे! महाराजांना वाईट वाटलें. कारण सूर्याजीरावाला शासन करावयाचं ठरवून ते आले होते. त्यांच्या डोक्यांत क्रोध धुमसत होता. मग महाराज पालखींत बसून सैन्यासह शृंगारपुरांत आले. सूर्याजीरावाचा मोठा वाडा होता. वाडा सताड उघडा पडला होता. महाराज वाड्यांत गेले. मोठी मोठी दालनं, मोठ्या मोठ्या सदरा, चाफेखण, चोपाळे अन् ओट्या ओसऱ्यां होत्या. एका मोठ्या सदरेवर मसनद अन् लोड होते. सूर्याजीरावाची ती गादी होती. महाराज रागा रागानें त्या गादीपाशी गेले. महाराजांच्या पायांत चढाव होते. महाराजांनी क्रोधाविष्ट नजरेनें त्या गादीकडे पाहिलें आणि थाडकन लाथ मारून ती गादी त्यांनीं ठोकरीनें उडवून दिली![३६]

( आधार पान ८४ वर पहा )

कोंकणची स्वारी फत्ते करून महाराज राजगडास परत आले.

कोंकणांत पाऊल पडतांच मिळालेली सणसणीत थप्पड कारतलबखानास झोंबत होती. तो अतिशय शरमून गेला होता. सर्वस्व व हजारों हशम गमावून मोठ्या मेटाकुटीनें तो पुण्याकडे येत होता. रायबागन जितक्या अबोलक्या औदासिन्यानें गेली होती तितक्याच अबोलक्या औदासीन्यानें ती पुण्यास परतत होती. शाहिस्ताखानास तोंड कसं दाखवायचं हा प्रश्न कारतलबपुढें होता.

शाहिस्ताखानास उंबरखिंडींतल्या भयानक पराभवाची हकीकत आधीच समजली होती. तो फार जळफळत होता. लाचार अन् दुःखी मनानें तो शाहिस्ताखानापुढें गेला. खान तरी काय बोलणार ? खानाची मर्जी मात्र पार नाराज झाली.

महाराजांनीं राजगडावर आल्यावर नेताजीस हुकूम पाठविला कीं घाटावर येऊन बेधडक मोंगलांच्या मुलुखांत घुसून लूटमार करून मोंगलांस हैराण करावें. हा हुकूम होतांच नेताजी घाट चढून देशावर आला व त्यानें मोंगलांच्या नाशिक प्रांतांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली.[१]

महाराज राजगडावर विचार करीत होते कीं ह्या शाहिस्ताखानाला स्वराज्यातून बाहेर कसा हुसकावा. जर ह्या वेळीं त्याला हुसकला नाहीं तर हा आणखी असाच छळत राहील. एखाद्या कारतलबखानाला अन् त्याच्या एक एकट्या सरदारांना मोडत बसलों तर हे मोंगल कधींच संपायचे नाहीत. एकदम शाहिस्ताखानावरच झडप घालून त्याचं मुंडकं पळविलं पाहिजे !—तरच जरब राहील. नाही तर हें गुऱ्हाळ संपायचं नाही.

महाराजांच्या भोंवतीं सर्व मित्रांचं कोंडाळं होतं. तान्हाजी, येसाजी कंक, बाजी जेधे, बापूजी नऱ्हेकर, त्याचाच भाऊ चिमणाजी नऱ्हेकर, बहिर्जी नाईक, मोरोपंत, बाळाजी आवजी वगैरे मंडळी त्यांत होती. शिवाय सोनोपंत डबीर, राघो बल्लाळ, निळो सोनदेव वगैरे पांढऱ्या केसांची मुत्सद्दी मंडळी आणि प्रत्यक्ष आईसाहेब होत्या. रोज खलबतं चालली होतीं.

पौषाची थंडी शेकोटीची ऊब अन् हुरड्याची चव घेत घेत गेली. माघाची शिवरात्र आईसाहेबांच्या पूजे-अर्चेत अन् लघुरुद्रांच्या मंत्रस्वरांत पार पडली. फाल्गुन आला. गांवोगांव दांडगा उत्साह फुलला. होळी पौर्णिमा पुरणाच्या पोळीसारखा घवघवीत वाटोळा अन् गालांवर किंचित् काळसरलेला चंद्र कडेवर घेऊन आकाशांत आली. गांवोगांवची पोरंसोरं टिमक्या बडवूं लागली. होळ्या पेटल्या. अग्निनारायण हंसतमुखानं ओंजळ करून उभा राहिला. घरघरची साजुक तुपाच्या धारेखालची पुरणाची पोळी अन् पिवळ्या धमक वरणानं नटलेली भाताची मूद अग्नि-नारायणाच्या ओंजळींत पडूं लागली. अग्निनारायण प्रसन्न झाला. होळीची रात, पिठासारखं चांदणं, फाल्गुनी वारा भिरभिरतोय, पुनवेचा चांद नभीं लखलखतोय, चांदणीचं लावण्य मुसमुसतंय, होळीचा जाळ फुर-फुरतोय, तांबडा–पिवळा प्रकाश झमझमगतोय, सगळ्या गांवाची पुरणा-वरणाचीं जेवणं झालीत, ज्वानीतल्या पोरांची थट्टामस्करी उताला आलीय, होळीच्या भंवती त्यांची दाटी झालीय, तुणतुण्याची तार मदनाच्या धनुष्या-गत तटतटून ताणली जातीय, ढोलकीचा आवाज वर वर चढतोय, झांजेची झिणझिण अंगावर कांटा फुलवतीय, होळीच्या उजेडांत अंजिरी शालू झगमग करतोय, चांदणीच्या गालाला खळी पडतीय; नाजूक कमरेवर कंबरपट्टा, कोंवळ्या दंडावर चंदेरी चोळी, गोऱ्या भाळावर चंद्राची कोर, गुलाबी गळःभर पुतळ्याची माळ, कानांच्या शिंपल्यांत मोत्यांची भोकरं, दंडांत वाकी, हातांत चुडा, अंगठीत खडा, सैलसा अंबाडा, बस्स!— जवानीचा घडा उरी डचमळतोय!! पायांतलीं पैंजण छुमछुमताहेत आणि तिच्या केसांतला गजरा घमगमतोय, अशी नवनवतीची नाजूक चंद्रावळ डावं कोपर उजव्या तळहातावर टेकवून अन् डाव्या हाताची करंगळी गाला-वरच्या खळींत रोवून उभी आहे. डफावर कडाडून थाप पडतीय, झांजा, तुणतुणं, खंजिरी, ढोलकी, कडी अन् तास एकदमच झणकार उठविताहेत, पैंजणांचे पाय थुई थुई, छुई छुई रिमझीमताहेत, नाजूक मेंदीनं लालावलेल्या बोटांची झालर झुळझुळतीय. गालावर हंसू फुटतंय अन् मग महाराष्ट्राच्या मराठ्यांची लाडकी लावणी नाचत, मुरकत, लाजत, रुसत, हंसत, फुगत, रसरंग उधळीत उधळीत अवतरतीय! काय सांगावं आमच्या लावणीचं

लावण्य ? आभाळीचा चंद्र झुरतो तो तिच्याचसाठी ! शिळा वाजविल्या-बिगर, शेमले उडविल्याबिगर अन् ओरडल्या आरडल्याबिगर लावणी रंगायचीच नाहीं. सोंगाड्या–साजिंद्याबिगर तिला मथुरेच्या बाजाराचा रस्ता उमगायाचाच नाहीं. अन् बादशाही रंगमहालांत ती कधी नांदायचीच नाहीं. मन मानेतो मजा मारायला मराठी मुलुखाचा मोकाट माळच तिला हवा. तिला हौस पाटलाच्या चावडीपुढं, भैरोबाच्या देवळामागं, होळीच्या माळावर नाहीं तर जत्रेच्या फडावर नाचा–नांदायची. दुसरीकडं कुठं तिची हौस भागायचीच नाहीं.

असा शिमग्याचा सण पार पाडला. फाल्गुनाची वद्य पंचमी रंगांत रंगली. राजगडावरही सण साजरे झाले. पण महाराजांचं लक्ष सगळं पुण्याच्या लाल महालावर खिळलं होतं. ह्या शाहिस्ताखानाला हाणल्या-शिवाय त्यांच्या मनाला स्वस्थता वाटेना.

राजगडावर रोज खल चालला होता. राजकारण खलता खलता फाल्गुनाची आवस आली. महाराजांनी आपल्या मनांत डाव पक्का केला. मोरोपंत, बाजी जेधे, बाजीचा भाऊ चांदजी जेधे, बाबाजी बापूजी खेडकर आणि चिमणाजी बापूजी खेडकर वगैरेसह व वडीलधाऱ्या मंडळीसह ते एकान्तांत बसले. महाराजांनी डाव सांगितला. एकदम रात्रीच्या मध्याला लाल महालांत शिरायचं अन् खानालाच उडवायचं हा तो बेत होता ! केवढं धाडस हें ! खानाच्या दाढेतच जाणं होतं ! लाल महालाच्या परि-सरांत लाख पाऊण लाख फौज पसरलेली होती. जसवंतसिंह आणि सुमारें इतर साठ सरदार त्यांत होते. पुण्याच्या हद्दीवर खानानें इतका कडक पहारा ठेवला होता कीं एकही मराठा माणूस विचारपूस केल्याविना तो सोडत नव्हता. आतां इतक्या भयंकर कडेकोटांतून खानाच्या स्वप्नांत जाणं सुद्धां कठीण होतें. अन् धाडस करून घुसलंच आंत तर जिवंत परत यायची आशाच नव्हती. खानाच्या हाती सांपडल्यावर खान जिवंत जाळील, तेलांत तळील कीं मुंडकी छाटून दिल्लीला धाडील हे सांगणंच कठीण !

पण महाराजांच्या शब्दांतून बेत निघाला. बस्स् मग काय वाटेल ते होवो, तो पार पाडलाच पाहिजे हा प्रत्येकाचा निर्धार. प्रत्येकजण तयार

झाला. केवढा भयंकर बेत हा ! खान ज्या वाड्यांत राहिला होता तो लाल महाल केवढा दणकट वाडा. आंत शिरायला मोठ्या दरवाजाशिवाय दुसरी वाट नाहीं. एक वेळ पुण्यांत शिरता येईल. तेही मुष्कीलच. पण लालवाड्यांत शिरणं अगदी अशक्य ! अगदी अशक्य ! वेड का काय ! नकळत अगदी खूप चोरून छपून शिरायचं म्हटलं तरी कधी कुणाच्या नाकांत शिरता येईल का ? वळवळेल ना तिथं ! लाल महालांत नाकांतल्या केसांसारखा सख्त पहारा होता सर्वत्र. फटाफट शिंका याव्या तशा फटाफट बंदुकांच्या फैरी झडतील कीं ! छे ! निव्वळ वेडेपणा हा ! पण महाराजांची हौसच न्यारी. अन् महाराजांनी सांगतांच सगळीं आडदांड खोंडं लागलीं खूष होऊन शेंपट्या उभारीत मनांतल्या मनांत नाचायला ! काय करावं ह्या पोरपणाला ? सगळ्यांच्याच कानांत वारं शिरलं. जो तो खुलला. महाराजांचं म्हणणं खरं झालंच पाहिजे. अन् ते मीच खरं करणार ह्या हिरिरीनं सगळींच माकडं रावणाची दाढी जाळायला उतावळी झाली. आईसाहेबांना काळजीच लागली. वृद्ध कारभारी मात्र दांत नसलेल्या गालांत कौतुकानं हंसले. आजवरच्या अनुभवानं त्यांची खात्रीच झाली होती कीं हीं मुलं सांगून ऐकणारी नाहींत. मग घाला धिंगाणा !

—आणि महाराजांनी ठरवलं कीं स्वतः जातीनं जायचं ! स्वतः लाल महालांत घुसायचं ! स्वतः खानावर झडप घालायची ! महाराज येणार म्हटल्यावर बाकीच्यांना जास्तच सुरसुरी आली.

पण केवढा जिवावरचा खेळ हा ! तोफांच्या गराड्यांत एक लाख फौज, एक लाख फौजेत गुरफटलेला वाडा, वाड्यात दालनं शें-पन्नास, अन् त्यांतल्या कुठल्या तरी एका दालनांत शाहिस्ताखान असणार. आतां हे आधी पुण्यांत जाणार कसे ? गेलेच तर लाल महालांत शिरणार कसे ? शिरले तर खानापर्यंत पोहोंचणार कसे ? पोहोचलेच तर—? पण मग कांहीं कठीण नव्हतं ! एक घाव दोन तुकडे ! पण येवढं जमावं कसं ? मोंगलांनी ओळखलं, गराडलं, सांपडले म्हणजे मग-?

पण एकदा ठरलं म्हणजे ठरलं. सगळा बेत अगदीं गुप्त होता. डाव्या

कानानं ऐकलेलं उजव्या कानापर्यंत पोहोचत नव्हतं. राजगडावर रोज रात्रंदिवस बेत बनत होता. काय काय करायचं, कसं कसं करायचं, कुणाचं काम काय याचा अगदी लग्नांतल्या मानापानासारखा बेत चालला होता. अंधारांत समया लाऊन महाराजांभोंवती अन् आईसाहेबांभोंवती बसून खानसाहेबांच्या पाठवणीसाठी तयारी चालली होती.

त्यांत एका माणसाची उणीव होती म्हणूनच कीं काय नेताजी पालकर मोंगलाई हद्दींतून खूप लूट घेऊन राजगडावर दाखल झाला[२] ! नेताजीनें अमाप लूट गोळा करून आणली होती.

चैत्राची प्रतिपदा उजाडली. सनई–चौघड्याच्या निनादांत, शिंगांच्या ललकाऱ्यांत अन् तोफांच्या सरबत्तीत गांठींची पदकें लेवून भगवा झेंडा आकाशांत चढला. भरजरी शेल्यांच्या गुढ्या उभारल्या गेल्या.

महाराजांनी दिवस ठरविला. अगदीं गुप्तपणें सारी तयारी सुरू झाली. सर्वांची तहान, भूक अन् झोंप उडाली. पुण्यांत लाल महालावर छापा आणि शाहिस्ताखानावर झडप घालायची कशी याची अगदी तपशीलवार कुंडली तयार झाली. कोणत्या ग्रहानं कोणत्या जागेंत दडायचं कोणत्या नक्षत्रानं कुठं कसं एकदम उगवायचं. कोणी किती गतीनं पुढं सरकायचं सगळं ठरवलं महाराजांनी.

चैत्राची अष्टमी उजाडली. जो तो आपल्या कामांत चूर होता. लोखंडी सळयांना चिंध्या बांधून दोन तीनशें पलिते तयार करण्यांत आले. तेलाचे बुधले गच्च भरून पलित्यांच्या शेजारी आले. सकाळीच शें दीडशें बैलांचा तांडा राजगडाच्या पायथ्याशीं हजर झाला होता. कासराभर दिवस वर आला. राजगडावरून दहा बारा तरणी पोरं उड्या मारीत गड उतरलीं. आणि त्यांनीं तो बैलांचा तांडा हाकलत वळत नसरापुराकडे चालविला. ती पोरं म्हणजे शुद्ध बावळट शेतकऱ्याच्या थाटांत चालली होती. खांद्यावर घोंगड्या हातांत कांठ्या. बैलांचीं घुंगरं वाजत होतीं. पोरं गुमान गोष्टी करीत चालली होती.

दुपारला नसरापूर आलं. अन् बैलांचा तांडा तसाच डावीकडं पुण्याच्या वाटेवर कात्रजच्या घाटाकडं वळला !

दिवस मावळला. मोरोपंतांना आणि नेताजीला महाराजांनी खूण केली. लगेच निघायची तयारी सुरू झाली. सारं कांहीं आधीं ठरलं होतं. त्याप्रमाणें अगदी निवडक चारशें[३] मराठी तरणी चपळ मंडळी गडाच्या पद्मावती माचीवर जमली. अष्टमीचा चंद्र आभाळांत आला होता. वारा गार सुटला होता.

महाराजांनी डोक्याला नेहमीचं शिरोभूषण न घालता आज साधं मराठी पागोटं घातलं. बाकीचा वेष साध्या शिपायी गड्याचा केला. बाबाजी आणि चिमणाजी, बाजी, चांदजी, नेताजी, मोरोपंत वगैरे सारे सज्ज होऊन महाराजांभोंवती उभे होते. महाराजांनी ढाल तरवार बांधली. अस्तन्या वर सरकवीत त्यांनी नेताजीला पुसलं, " झाली तयारी ? "

" जी ! आतां गडच उतरायचा ! "

आईसाहेब आणि म्हातारी म्हातारी कारभारी मंडळीं तिथंच उभी होती. महाराजांना ती सर्वजण आपल्या मनाला सुचतील त्या काळजीच्या गोष्टी सांगत होती. महाराज हो हो म्हणत तयारी करीत होते.

" शिवबा ! जपून ! " आईसाहेब शिवबाला सांगत होत्या. "–आणि पंत, तुम्ही ह्या साऱ्यांना सांभाळा ! भारी द्वाड आहेत मुलं ! "

" आतां आम्ही सारे मोठे नाही कां झालो ? " महाराज हंसून म्हणाले.

" अरे जगाला ! मला तुम्ही सारे लहानच ! " आईसाहेब म्हणाल्या अन् त्यांनी महाराजांच्या तोंडावरून हात फिरवून स्वतःच्या कानशिलावर बोटें मोडलीं. महाराजांनी त्यांच्या पावलांना हात लाऊन नमस्कार केला. पायाची धूळ भाळीं लावली.

सर्वांनी पायीं मस्तक ठेवून आईसाहेबांना मुजरे केले.

" मोठी गुणाची पोरं माझी ! यशाचे व्हा ! " आईसाहेबांनी आशीर्वाद दिला.

महाराज जगदंबेचं दर्शन घेऊन निघाले.

आईसाहेबांना फार काळजी वाटत होती. स्वतः त्या जरा थकल्या होत्या. डोक्यावरचे बरेच केस आतां पांढरे झाले होते. शिवबा केवढ्या जिवावरच्या प्रसंगांत स्वतः उडी घेतोय हे त्यांना दिसत होतं. पण यमुनेच्या

डोहांत कालिया शिरला. त्याला नको मारायला ? तसाच राहूं देऊन कसं चालेल ? गोकुळची गाईवांसरं मरताहेत. गोऱ्या गोजिऱ्या गोपींना ते हिरवं वीष बाधतंय. यमुना हालांत जगतीय. आतां नको का कोणी उडी घ्यायला ? यशोदेच्या बाळानंच घालायची उडी.

महाराज निघाले. मागोमाग सारे निघाले. तयार करून ठेवलेले पलिते अन् तेलाचे बुधले एकेका स्वारानें घेतले. एकही पलिता पेटविलेला नव्हता. पेटवायचाही नव्हता. गडाच्या पायथ्याशीं पोहोंचतांच घोड्यांना टांचा बसल्या. तडाड तडाड चौखूर चालीवर घोडे निघाले. चंद्र खूप वर आला होता.

मार्गासनी, करंजावणं, आंबवणं आणि नसरापूर ओलांडून महाराज चेलाडीवर आले. रात्र बरीच झाली होती. दाट झाडीतून गळणाऱ्या चांदणी लाह्या–बत्ताशाखालून घोडे चालले होते. कुण्णी बोलत नव्हतं. रातकिडे एकच सूर धरून किरकिरत होते. रनपांखरें चाहूल लागून फडफड करीत उडत होती. वारा बेतानं वहात होता. घोड्यांच्या टापाखाली पाचोळा सळसळत होता. महाराज, पंत, नेताजी अन् चिमणाजी अगदीं पुढें होते.

वरवं, कांजळं, शिवरं, खेड, शिवापूर अन् शिंदेवाडी मागें पडली. वेळूचं शिवार लागलं. गोगलवाडीतले दिवे अंधुक काजव्यासारखे लुकलुकूं लागले. आणि कात्रजच्या घाटाचा आडवा दांड काळा निळा पसरलेला दिसूं लागला.

घाटाची चढण लागली. खडकाळ वाटेवर घोड्यांच्या नालबंद टापा चकमक झाडीत खडखड वाजूं लागल्या. घोडीं संथ वेगानं घाट चढूं लागलीं. महाराज इकडे तिकडे सारखे पहात होते.

घाटाचा माथा आला. आणि एकदम अस्वलासारख्या दहा बारा सांवल्या एका खबदडीतून उठल्या ! महाराजांची नजर एकदम तिकडे गेली ! त्या सांवल्या तुरु तुरु धांवत जवळ जवळ येऊं लागल्या. त्यांच्या जवळ कांठ्याही दिसूं लागल्या. आणि जवळ आल्यावर स्पष्टसं दिसलं. ते राजगडावरून निघालेले महाराजांचेच बैलवाले मावळे होते ! घोंगड्या पांघरून महाराजांची वाट पहात होते ते. त्यांनीं जवळ येऊन महाराजांस मुजरा केला.

(203 १०२

" बैल कुठं आहेत ? "

" हथंच हैती ! कुऱ्याच्या एका भुकेवर ! बसल्यात ! "

मग महाराजांनी लगेच आपल्या ठरलेल्या लोकांना खूण केली. ते लोक पळिते, बुधले अन् काथ्या घेऊन पुढं आले.

" आटपा लौकर ! " महाराजांनी चुटकी वाजवीत म्हटलें.

लगेच ते पंधरा वीस जणं बैलांच्या दिशेला दिसेनासे झाले. महाराज पुण्याच्या दिशेला उतरूं लागले. कात्रजच्या डोंगर माथ्यावरून लांब पांच सहा कोसावर पुणं दिसत होतं. लहान-लहान, लहान-लहान दिव्यांचे ठिपके लुकलुकत होते

महाराज घाट उतरून खाली आले. पुढची वाट सुरू झाली. गुजरवाडी गेली. कात्रज गांव मागं पडलं. धनकवडीचा फाटा गेला. आंबील ओढा ओलांडला. बिबेवाडीचं काळं शार शिवार लागलं. आतां पुणं अगदी थोडं राहिलं. झगड्याची वाडी ओलांडली कीं काळं वावर अन् मग पुणंच. काळ्या वावराकडंच तोंड करून पुण्याची पडकी मावळ वेस उभी होती.

आणि पुण्यांत रमजानचा महिना गाजत होता. उपवास सोडून मोंगली फौज चिक्कार खाऊन पिऊन सुस्त झाली होती. रात्रीचा मध्यान्हीचा प्रहर उलटला होता. लाल महालाच्या नजीकच्या पुढच्या बाजूला लष्करी वाद्यें वाजत होतीं. ह्याला म्हणायचं लष्करचा बाजा[४] ! ह्या बाज्याच्या तालावर कांहीं खेळ, नाच, गाणीं चालली होतीं. मोंगली फौज त्यांतच रंगली होती.

खुद्द लाल महालांत माडीवर शाहिस्ताखान एका भव्य दिवाणखान्यांत झोपला होता.[५] इतर दालनांत कुठें कुठें खानाच्या जनानखान्यांतील बायका जाग्या होत्या. कुणी ढोलकीवर खडा वाजवीत गाणीं म्हणत होत्या, तर कुणी ऐकत होत्या. कुणी लोडावर पहुडल्या होत्या. उन्हाळ्याचे दिवस होते. शरबताच्या सुरया तबकांत उभ्या होत्या. अगदीं तलम झिरझिरीत पडदे वाऱ्याच्या झुळकीवर झुळझुळत होते. वाड्याच्या पश्चिमेच्या बाजूकडचा प्रचंड दरवाजा बंद होता. फक्त दिंडी उघडी होती. आंत देवड्या होत्या. आंतल्या बाजूला सख्त जागता पहारा होता. अंगणही मोठं होतं. तिकाटण्यावर टेकवून जळत्या मशाली ठेवलेल्या होत्या. शें-सव्वाशें हशम

पहाऱ्यावर होते. शिवाय आंत दालना-दालनावर नागव्या तरवारी घेऊन हशम जागता पहारा डुकल्या घेत घेत करीत होते !

वाड्याला खोल्या, ओसऱ्या, माजघरं, कोठ्या, ओट्या, चौक, सदरा, दिवाणखाने, दरुणी महालाचे जाळीदार महाल, पाण्याचे हौद, मुदपाकखाना, अंबरखाना, शिलेखाना, आबदारखाना, दफ्तरखाना, हमामखान्याची जाळीदार खोली, एक का दोन, अनेक सदरासोप्यांनीं सजला होता लाल महाल. पंत दादोजी कोंडदेवांनीं पखालींनी पैसा ओतून बांधलेला वाडा हा. वाड्याच्या भिंती बळकट होत्या. मुख्य दरवाजाशिवाय आंत जायला वाटच नव्हतीं दुसरी. खुद्द महाराजांना आपल्या लाल महालाची खडान् खडा माहिती होती. कारण त्यांचं बालपण त्यांत गेलं होतं.

वाड्याच्या पिछाडीला कसब्यांतल्या गणपतीकडे जाणारा लहानसा रस्ता होता. तेथून नजीकच शितोळे देशमुखांचा वाडा होता.

लाल महालांत खानाच्या व जनानखान्याच्या महालांत समया व मेणबत्त्यांचीं शामदानें तेवत होतीं. खोजे, तार्तरिणी व इतर दासी (लौंड्या) खानाच्या बेगमांबरोबर गात होत्या, हातात रुमाल घेऊन नाजत होत्या, हंसत होत्या. वाड्यांत खाशा महालांत गजबज एवढीच फक्त होती.[६]

महाराज काळ्या वावरांत आले. महाराजांसह सर्वजण घोड्यावरून उतरले. महाराजानीं बाजी सर्जेराव जेध्यास आपला घोडा व इतर कांहीं घोडे घेऊन नदीच्या पलीकडे भांबुर्ड्याच्या बाजूला जाऊन उभे रहाण्यास सांगितलें.[७] लगेच बाजीनें आपल्याबरोबर कांहीं माणसें घेऊन व त्या घोड्यांचे लगाम धरून नदीकडे कूच केलें. खूप लांबचा वळसा घालून बाजीला नदीपार जावं लागणार होतं. कारण खानाच्या छावणीला चाहूलही लागूं न देण्याची खबरदारी घ्यायची होती. नदीचं नांव मुठा.

महाराजांनीं मोरोपंतांस व नेताजीस कांहीं लोकांनिशी मोंगलांच्या छावणीच्या थोडे अलीकडे झाडीत लपून रहावयास सांगितलें.[८] चिमणाजी व बाबाजी हे सख्खे भाऊ पुण्याचे व खुद्द लाल महालाचे मोठे माहीतगार होते. ह्या दोघांवर महाराजांचं मोठं प्रेम होतं.[९] महाराजांनी चिमणाजीस पूर्वी ठरल्याप्रमाणें पुढें जाऊन ठरलेला उद्योग करण्यास सांगितलें. कुणालाही फारसं सांगत बसावं लागतच नव्हतं. राजगडावरून निघण्यापूर्वी

प्रत्येकाला आपआपली कामं पक्की नेमून दिलेलीं होती. प्रत्येकाची तडफ, उत्साह, हुशारी विलक्षण होती.

चिमणाजी निघाला. त्यांच्याबरोबर ठरलेले लोक निघाले. त्यांतल्या प्रत्येकाजवळ ढाली तरवारी होत्याच पण कांहींच्या घोंगड्यांत पाठीवर अत्यंत धारदार अन् लांबीला हातभर–वावभर असलेल्या लोखंडाच्या पहारीही लपविलेल्या होत्या.

" सावध ! " महाराज निघालेल्या चिमणाजीला हळू आवाजांत म्हणाले. चिमणाजीनें मान डोलवली आणि निघाला माणसं घेऊन. अगदी गुपचुप. काळोखांत तो गुडूप झाला.

चिमणाजीला लांब मोगलांचे पांढुरके तंबू दिसूं लागले. मोंगली शिपायांची चाहूल येऊं लागली. छावणी जवळ आली ! पुण्याची हद्द आली ! प्रत्येकाची छाती धाकधूक करीत होती.

—आणि चिमणाजीनें आपल्या लोकांशीं अगदीं खुल्या आवाजांत गप्पा गोष्टी करायला सुरुवात केली ! बाकीचे मराठेही एकमेकांत बोलूं हंसूं लागले ! त्यांत साऱ्या गोष्टी सुरू झाल्या. तमाशातल्या लावणीपासून ते औंदाच्या पिकापर्यंत. आणि लगेच असं भासूं लागलं कीं ही माणसं इथलीच, खानाच्या छावणीतलीच आहेत. जरा कुठं बाहेर गेली होती ती आतां परत छावणींत चाललीत ! शिवाजीच्या गांवचीसुद्धां नव्हेत ही ! कांही आहे कां छटा त्यांच्या बोलण्या चालण्यांत शिवाजीकडची ?—इतकं बेमालूम सहज बोलणं चालणं त्यांनी सुरू केलं. कुणी बटवा खोलून तंबाखूची चिमूट दुसऱ्याच्या हातावर ठेवीत होता, तर दुसरा कुणी सोडलेली चंची काखेत दाबून सुपारी कातरीत होता.

छावणी जवळ आली ! मावळवेशीची पडकी भिंताडं अन् बुरूज अंधारांत उभे असलेले दिसूं लागले. हातांत भाले घेऊन बख्सारी हशम पहारा करीत होते. एक-दोन मशाली जळत होत्या. ह्या मंडळींची बोलण्या हंसण्याची चाहूल लागतांच पहारेवाले हशम सावध होऊन तसेच उभे राहिले.

चिमणाजी आपल्या टोळक्यासह अगदीं बेफिकीर चेहऱ्यानं हंसत बोलत चालला होता. त्याचे गुंड साथीदार तसेच. इथं कोणी पहारेकरी आहेत अन् ते आपल्याला आडवणार आहेत हे त्या कोणाच्या खिजगणतीतच

नव्हतं ! अगदीं जवळ आले. पहारेकरी पहातच होते. पहारेकऱ्यांकडे नजरही न करता चिमणाजी गप्पा मारीत सरळ आंत घुसला ! मालकाच्या रुबाबांत ! पण छातीत धडधड चालूंच होती.

" एऽएऽ ! ठैरोऽ ! " पहारेवाल्यांनीं भाला आडवा घातला.

" ऑ ? " थांबून आश्चर्यानें मूठ हनुवटीला लावीत चिमणाजी पहारेकऱ्याकडेच बघूं लागला.

" कोन हो तुम् ? "

" म्हंजी ? ठाव न्हाई व्हय ? "

" कौन ? "

" इथलीच आम्ही ! जाधवरावाकडची नव्हं का ? छबिन्याची माणसं आम्ही ![10] गस्तीला गेलो हुतो ! जायच्या वख्ताला पगितलं न्हाईसा आम्हाला ? "

" ज्यादवरावके आदमी ? "

" नव्हं का ? पुसून या, पुसून या त्येस्नी ! पहाऱ्यावर नव्यानंच आलातसा जनूं ? "—ही वर शिरजोरी !

पहारेकरीही हंसले अन् म्हणाले, " जाव जाव भाई ! जाव ! "

बनवलं पहारेकऱ्यांना ! अन् तेही वेडे बनले ! चिमणाजी आतां तर रुबाबांत निघाला. गडी मिस्किलपणानं गालांत हंसत होता. चार पावलं गेला अन् लगेच फिरून म्हणाला, " आवो खानसाहेब ! आपली निम्मी मानसं मागून येत्याती ! इसरूं नगा सा ! "

" आने दो ! आने दो ! "

चिमणाजी अन् त्याचं टोळकं शिरलं छावणीत. खानाच्या छावणींत रोजा संपून गम्मत चालली होती. लष्कराचा बाजा वाजत होता.[11] आतां मात्र चिमणाजी फार सावधतेनं लालमहालाच्या रोखानं जात होता. सहजपणें, सावकाश, फारसा गलका न करतां.

शाहिस्ताखानाच्या लष्करांत खूप मराठी फौजही होती. कारण शिंदखेडचे जाधवराव, सर्जेराव घाटगे, गाढे, कोकाटे, गायकवाड, कांकडे, खंडागळे, पवार, भोंसले, होनप–देशपांडे, रायबागन वगैरे मराठी सरदार

खानाच्या फौजेत महाराजांविरुद्ध सामील झालेले होते. त्या सर्वांचे लष्कर खानाच्या छावणीतच होते. छावणीवर छापे पडूं नयेत म्हणून नेहमीच अशी रीत असे कीं छावणीपासून कोस दीड कोस तरी लांबवर टेहळणी-साठी फिरते सैनिक ठेवावयाचे. ह्यांना म्हणायचं 'छबिन्याचे पहारेकरी'. येवढ्या मोठ्या एक लाख फौजेत कोणची माणसं कोणाची हे कोणाला ओळखूं येणार ? आणि त्यातून मोंगली कारभार. ढिलेपणा, बावळटपणा आणि निर्बुद्धपणा यांची चढाओढ लागलेली.

हे आतां पुण्यात शिरणारे मराठे असेच थेट खानाचा गळा कापायला जाणार आहेत, अशी शंकाही त्या पहारेकऱ्यांना आली नाही. इतकंच काय, पण लाल महालांत शिरून आज कोणी तरी दगा करणार आहेत असं त्यांना कोणी सांगितलं असतं तरीही त्यांना खरंच वाटलं नसतं. हंसले असते ते.

चिमणाजी आणि त्याचे साथीदार अगदी हलकेच लाल महालाच्या पिछाडीच्या रस्त्याला पांगून पांगून जाऊं लागले. ती वाड्याच्या पिछाडीची बाजू होती. आकाशांतला चंद्र आकाशांतून परतला होता. सामसूम होती. अंधार पडला होता. लाल महालाच्या मुख्य दरवाजापुढच्या भागांत लष्करचा बाजा चालला होता. जे जागे होते ते त्यांत रंगले होते. जे जागे नव्हते ते अर्थात डाराढूर झोंपले होते. लाल महालाच्या पिछाडीला तो अरुंद रस्ता अन् गणपतीच्या देवळाच्या ओळीतली घरं होती.

चिमणाजीचे साथीदार त्या पिछाडीच्या रस्त्यावर आले आणि सारा रस्ताभर पांगून उभे राहिले. आलंच कुणी तेवढ्यांत तर खबरदार असावं यासाठीं. कुणीही आतां चकार शब्द उमटूं देत नव्हतं. सजीव सांवल्याच ! चिमणाजी इकडे तिकडे पहात पहात लाल महालाच्या भिंतीपाशीं आला. काळी काळी भिंत अंधारांत उभी होती. सात आठ मराठे त्याच्या संग-तीला होतेच. चिमणाजीनें भिंत चांचपली आणि इतर मराठी गड्यांना खुणावलं आणि लगेच चिमणाजीनें अन् त्यांनीं घोंगड्यांत लपविलेल्या पहारी बाहेर काढल्या आणि दोन दगडांच्या चिरेत दणादण घांव घालाव-यास सुरुवात केली [१२] ! खणाखण पहारी वाजूं लागल्या. पण लष्करचा बाजा इतका दणाणत होता कीं, पहारीचा आवाज गाळून ऐकूं जाण्याइतके तिखट

कान छावणीत नव्हते. अन् झोपेपुढं आणि गमती जमतीपुढं कोणाला वेळही नव्हता कान टवकारायला.[१३]

चिमणाजी सारखा इकडे तिकडे पहात होता. सारेच जण घामाघूम झाले होते. किती वेळ ते घांव घालीत होते तरी अजून भिंतीतील चिरा निखळत नव्हता.! चिमणाजीची छाती धडधडत होती. पहारीच्या दणक्यानं एकदम चमकन् ठिणग्या उडत होत्या.

—आणि अखेर एक दगडी तोंड ढिली झाली. ढोस ढोसून ती सर्वांनीं बाहेर काढली. एक तोंड निघाली. आणि मग भराभर इतर दगड निखळूं लागले. चिमणाजी खूष झाला. मोठं थोरलं भगदाड पडलं.[१४] आंत अंधार अंधार गुडुप होता.

—आणि एवढ्यांत बाबाजी आणि कांहीं मराठे दबत लपत तेथें आले. चिमणाजीनें सारं तयार करून ठेवलं होतं. बाबाजी जवळ आला.

" चिमणाजी ! "— अगदीं घशातला दबलेला आवाज !

" सगळं तय्यार ! महाराज कुठंयत् ? "

" ते बघ आलेच ! "

महाराज आणि इतर कांहीं मराठे येत होते.

महाराज झप झप आले. भगदाड पाहिलं त्यांनीं. त्यांनीं ओळखलं. ह्या खिंडाराच्या आंतल्या बाजूला मुदपाकखान्याच्या कोठ्या-दालनं होतीं.[१५] महाराजांनी सर्वांना जवळ येण्याची खूण केली. सगळे आले. महाराजांनी समशेर उपसली. सर्वांच्या समशेरी अलगद बाहेर पडल्या. महाराजांच्या बरोबर चांदजी जेधेही [१६] होता. महाराज हळूंच वाकून भगदाडांत शिरले. मागोमाग एकेक जण आंत घुसला. सगळेच त्या भगदाडातल्या अंधारांत नाहीसे झाले.

महाराज डोळे ताणीत ताणीत आंत आंत चालले होते. त्यांना कांहीही दिसत नव्हतं. पण सगळं माहीत होतं. वाटेंत कमरेएवढी उंच आडवी भिंत आली. महाराज चटकन् त्या भिंतीवर चढले. आणि त्यांनी उभे राहून पुढच्या बाजूस लांब उडी टाकली.' उडी टाकण्यापूर्वी ते कांहीं तरी पुटपुटले. त्यांच्या उंचीचा उडीचा थोडासा आवाज आला. आणि त्याच्या मागोमाग तीन चार मराठ्यांनी एकदम

उड्या टाकल्या—तो पाण्यांत उड्या पडल्याचा आवाज आला! पाणी खळबळून वाजले! नाका तोंडांत पाणी शिरल्याची फुरफूर उमटली. सगळेच जण बुचकळ्यांत पडले कीं हें काय झालं? सर्वांच्या अंगावर एका निमिषांत भीतीचा कांटा उठला. तो हौद होता! त्यात पाणी होतं! तीन चार पोरं पाण्यांत पडली [१७]! गार गार गार! ओली ओली चिंब झाली! लगेच त्यांनी हौदाबाहेर उडी मारली! मागच्यांच्या उड्या मग मात्र महाराजांप्रमाणें अचूक पलीकडे पडल्या.

महाराज पुढें अन् बाकीचे मागोमाग चालूं लागले. दबत दबत. चापसत चापसत. महाराज अगदी अचूक चालले होते. अजून एकही दिवा दिसत नव्हता. माजघरं आणि इतर दालनं ओलांडीत ओलांडीत महाराज चालले होते. जर गडबड झालीच तर काय करायचं हेही आधी ठरविलेलं होतंच.

महाराज एका जिन्यापाशी आले—आणि तिथेंच एक हशम उभा!! पापणी लवायच्या आंतच एकदम महाराजांनी त्याचं मुंडकं उडविलं! एक अक्षरंही उमटलं नाही! सर्वांची काळिजं धाडधाड उडत होती. अंगं घामाघूम झाली होती. भिजलेले प्राणी सुखी त्यांतल्या त्यांत!

महाराज लगेच जिना चढून गेले. मोठं थोरलं दालन होतं. कांही बायका अस्ताव्यस्त झोंपल्या होत्या. एक दोन चिरागदानें मंद तेवत होती. महाराज तेथून पुढच्या दालनांत शिरले. हे सारं अगदी मुंगसाच्या पावलानं अन् घुशीच्या कौशल्यानं चाललं होतं. त्या छोट्या दालनातून पुढच्या दिवाणखान्याकडे ते चालले. तों तेथे चार पांच हशम तरवारी खांद्यावर टाकून भिंतीला टेकून पेंगत होते. आतां—? महाराजांनी एक निमिषभर थबकून एकदम बाकीच्यांस खुणावलं. महाराजांचे साथीदार एकदम त्या इशमांवर तुटून पडले आणि सपासप त्यांनी त्यांच्यावर घांव घातले! आणि महाराज एकदम मुसंडी मारून पुढच्या दिवाणखान्यांत घुसले. पण तरवारीचे घांव बसतांच एक दोन इशमांनी प्राणांतिक किंकाळ्या फोडल्या!! झालें! एकदम झोंपा उडाल्या! महाराज ज्या दिवाणखान्यांत घुसले त्याच दिवाणखान्यांत बायका अन् एक तरुण पुरुष झोंपलेला होता. [१८] किंकाळ्या उठतांच सारेच दचकून किंचाळून उठले! तो तरुण उठून भिंतीवरची

तरवार घेण्यासाठीं धांवला. तरवार उगारून समोरून धांवत महाराजांस येतांना पाहून त्या बायका तर भयंकरच घाबरल्या ! त्या किंकाळ्या फोडून इतस्तत: धांवूं लागल्या ! हा सैतान कोण हें त्यांना समजेचना ! हा काय प्रकार ! तो तरुण तरवार उपसून महाराजांवर धांवला ! महाराजांनी एकदम सपाऱ्याचा आडवा तडाखा उडविला[१९] ! तो तरुण किंचाळत रक्त गाळीत पडला. मेलाच तो ! हा खुद्द खानाचा मुलगा होता !— अबुल फत्तेखान[२०] ! सगळ्या वाड्यांत गोंधळ उडाला. शाहिस्ताखान जागा झाला ! सगळीकडे किंचाळ्या आरडाओरडा होत होता ! अन् बाहेर बाजा वाजत होता ! ! खानाच्या बायका, खोजे अन् लहान मुलं ओरडत धांवत होतीं.[२१] निरनिराळ्या दालनांतले पहारेवाले हशम घाबरून गोंधळून गेले होते. काय प्रकार चाललाय अन् आपण काय करायचं हें त्यांना समजेच ना. महाराजांचे साथीदार भराभर प्रत्येक दालनांत घुसून दिसेल त्या पुरुषाला मारीत होते.[२२] दिवे कमी अन् अंधारच फार. महाराज शाहिस्ताखानाला शोधीत होते.[२३] ह्या धिंगाण्यांत तो कुठेंच दिसत नव्हता.

खान घाबरून उठला ! काय तारांबळ त्याची ! जो तो ओरडतच होता ! त्याला समजेना कोण, कोठून, कसे आले ? आहेत किती ? सगळीच दाणादाण ! मराठ्यांच्या तरवारी फटाफट माणसं पाडीत इतस्तत: लाल महालभर नाचत होत्या. एकदम सगळ्या बाजूंनी आग लागल्यावरसुद्धां इतका गोंधळ उडाला नसता. खानाचे आणखी दोन मुलगे जखमी होऊन पडले ! दिवे विजून अंधार झाल्यामुळें तरवारींच्या वाराखाली बायकांही सपांडूं लागल्या[२४] ! खान केविलवाणा चेहरा करून इकडे तिकडे धांवत होता. तो एका मोठ्या महालांत शिरला. त्याच्या जनान्यांतल्या बऱ्याचशा बायका तिकडे धांवल्या. महाराज खानाला शोधीत शोधीत एकेका दालनातून धांवत होते. आतां गोंधळ फार माजला होता. खालीं अंगणांत चौकांत मोंगली शिपायी अन् मोंगलांच्या फौजेतले मराठेही खूप जमले होते. जो तो जागच्या जागीच धडपड धांदल करीत होता. पण आंत खुद्द वाड्यांत शिरायची छाती कुणाला होत नव्हती ! लाल महालाचा दुसरा मजला आगीविना पेटला होता ! खचाखच तरवारीचे घाव पडत होते ! किंकाळ्या उठत होत्या[२५] !

खानाच्या मागोमाग त्या महालांत बायका शिरल्या. त्या खानाला भयंकर रडत ओरडत लपायला सांगत होत्या.[२६] तेथें शामदानें जळत होतीं. खानाच्या तोंडचं पाणी पळालं होतं! तो कुठं जाऊं, कुठून जाऊं, लपूं तरी कुठं म्हणून करुण कांपऱ्या आवाजांत विचारतोय न विचारतोय तोंच बायकांनी मोठ्यानें किंकाळ्या फोडल्या! दारावरचा पडदा टर-टर-टर-टर फाडीत महाराज आंत घुसले! खानानें त्यांना पाहिलें!—मूर्तिमंत भीति उभी!!! खानानें भयंकर घाबरून डोळे विस्फारले! महाराज खानावर धांवले[२७]! तेवढ्यांत–तेवढ्यांत बायकांनी एकदम दिवे फुंकून विझविले[२८]! एकदम अंधार झाला! महाराजांना कांहीच दिसेना! खान निसटला.—पण तेवढ्यांत एका खिडकींत पांढरे पांढरे कपडे हलताना दिसले! खानच! खान खिडकीबाहेर उडी टाकायचा प्रयत्न करीत होता! महाराज एकदम खिडकीकडे धांवले आणि दांत-ओठ खाऊन त्यांनी समशेरीचा खाडकन् घांव खिडकीवर घातला! एक आर्त किंकाळी उमटली अन् धप्पकन खाली चौकांतल्या बगिच्यांत आवाज आला! खान मेला!! महाराजांना वाटले खान मेला[२९]! ते लगेच तेथून बाहेर निघाले. ते मोठ्यानें म्हणत होते. "कामगिरी फत्ते! चला जलदी!"

खाली जमलेले मोंगल आणि मोंगली मराठे आतां जिवाचा धडा करून लाल महालांत घुसले. "गनीम गनीम!", "दुष्मन दुष्मन!" करून ते अन् बाकीचे ओरडत होते. महाराजांच्या मागोमाग भराभरा त्यांचे साथीदार गोळा होऊन निघाले. बाहेरचा गलका त्यांना ऐकूं येत होता. "गनीम गनीम!" हा ओरडा ऐकूं येतांच महाराजही आपल्या लोकांना मानेनें खुणवीत ओरडले, "गनीम गनीम!" आणि मग सगळेच्चजण ओरडूं लागले, "गनीम गनीम! धांवा धांवा! दगा! गनीम, गनीम!"[३०]

सगळी गर्दी आंत घुसली ओरडत ओरडत! महाराजही साथीदारांसह ओरडत ओरडत त्यांत मिसळले.[३१] अंधार, अर्धवट उजेड, ओरडा, रडारड यांनीं मोंगल बावचळून गेले. महाराज ह्या गर्दीतून वाट काढीत काढीत अन् गम्मत पहात पहात खास दरवाजापाशी आले[३२]! आणि इतक्या सहजपणे अन् सफाईनें बाहेर पडले कीं कोणाला त्या गर्दींत शंकासुद्धां

आली नाही[३३] ! कुणाचं त्यांच्याकडे लक्षही गेलं नाही. मोंगलांची अद्याप चौकशी चालली होती, कोण गनीम ? कोण दुष्मन ? कोठून आला ? अन् त्यानं केलं तरी काय ?

चिमणाजी, बाबाजी, चांदजी व इतर सर्व साथीदार असेच निसटले[३४] ! महाराज लगेच नदीकडे तिघा चौघांसह सटकले.[३५] बाकीचेही असेच पसार झाले. नदीच्या पलीकडे बाजी जेधे घोडे धरून वाट पहात होता.[३६]

महाराज नदीतून पलीकडे गेले. ह्या चैत्राच्या दिवसांत पुण्याच्या नदीला पाणी फारसं नसतं. बाजीनं पाहिलं. तो उत्सुकतेनें लगाम धरून पुढें आला.

महाराजांनी अन् बाकीच्यांनी घोड्यावर टांग मारली. अन् कोंडाण्याच्या दिशेला भरधांव घोडे सोडले.[३७]

बाबाजी, चिमणाजी वगैरे सर्वजण छावणीतून निसटले आणि त्यांनी काळ्या वावरांत ठेवलेल्या मोरोपंतांस व नेताजीस गांठलें. त्यांनीहि सर्वांनी कोंडाण्याकडे धूम ठोकली.

खान खिडकीतून खाली झुडपांवर कोसळला होता. त्याच्या उजव्या हाताला भयंकर वेदना होत होत्या ! तो उठला. आणि हळूहळू पुढच्या चौकाकडे येऊं लागला. तो भयंकर घाबरला होता. पण त्याहूनही तो जास्त संतापला होता. लाल महालाभोंवती लाख फौजेचा गराडा असतांना दुष्मन आलाच कसा ? खुदानं खैर केली ! जान बचावली !

खानानें हाताची जखम चांचपली !—तों काय ! तीन बोटे साफ तुटली होतीं[३८] ! रक्त गळत होतें ! तो ती धरून पुढच्या चौकांत आला ! मशालींच्या उजेडांत खानाची—हातातून रक्त शिंपडणारी संतप्त आकृति लोकांस दिसली !

सारे अमीर, सरदार, उमराव भयभीत होऊन पुढें गेले. खानाचे डोळे लाल झाले होते. आपल्या सरदारांचा अन् पहारे करणाऱ्या हशमांचा त्याला भयंकर राग आला.

“ हुजूर !––”

“ फिजूल बक् बक् बंद करो ! बेवकूफ, नादान ! गाफील, बेवफादार ! जाव जाव ! आराम करो ! सो जाव ! ” खान चिडून संतापून म्हणाला.

आतां खानापुढं कांहींही बोलायची सोयच नव्हती ! तो फारच गरम

झाला होता. त्याला खात्रीच पटली होती कीं ही दगाबाजी त्या दगाबाज शिवाजीची ! तोच तो शिवाजी ! तरवार उगारून अंगावर धांवलेला ! आणि एक लाख फौज निव्वळ गाफील, बेजबाबदार अन् झोपाळू !

—येवढ्यांत दोन चार हशम बाहेरून घाबऱ्या घाबऱ्या धांवत आले ! आणि कात्रजच्या दिशेला हात करीत घाई घाईने सांगू लागले, " हुजूर ! हुजूर ! वो देखो दुष्मन दौड रहा है ! उधर मशालोंकी जगमग दिखाई दे रही है ! "

—आणि खरोखरच दोन-तीनशें मशाली लांब तिकडे कात्रजच्या घाटांतून नाचत नाचत धांवतांना दिसत होत्या !

खानानें एकदम आपल्या सरदारांस, त्या पळत सुटलेल्या दुष्मनांचा पाठलाग करण्यास फर्मावलें ! झालें ! लगेच हजारों घोडेस्वार तयार होऊन कात्रजच्या घाटाकडे दौडत निघाले ! आत्ता दुष्मन खास सांपडणार कारण पळून पळून किती पळेल ? त्या पहा अजून मशाली तेथेंच आहेत !

मोंगली फौज दौडत दौडत घाटाच्या पायथ्यापर्यंत आली ! सारे खूष झाले होते ! आतां दुष्मन सांपडणार ! मोंगली घोडे घाट चढूं लागले ! मशाली अगदी संथपणे हलत हलत पुढें सरकत होत्या ! आतां आल्या, अगदी टप्प्यात आल्या ! स्वारांनी लगाम ताणले ! घोड्यांच्या टापांची मशालींना चाहूल लागलेली दिसली ! कारण आडव्या तिडव्या वाटेल तशा हालत त्या पळूं लागल्या !

मोंगली स्वार दांत खाऊन दौडत आले ! आणि ! हाय रे खुदा ! पहातात तो काय ! सारी बैलांची फौज ! ! ! एकेका बैलाच्या शिंगांना दोन दोन पेटते पलिते बांधलेले होते आणि हे शें-दीडशें बैलोबा चालले होते माना हालवीत ! मोंगल मंडळी खजिल झाली ! हे कसले दुष्मन ? हे तर सारे आपले भाऊबंदच ! !

बुजून बावरून आतां शेंपट्या उभारून अन् कान टवकारून पळत होते ते !

शिवाजीच्या नांवानें खडे फोडीत सारेजण हात हालवीत परत आले ! खानाला हें सारं समजलं ! अरे बापरे ! केवढा जळफळाट ! खान महाराजांच्या नांवानं कडकडून बोटं मोडूं लागला ! छे छे ! चुकलों, चुकलों सांगायला ! खानाला बोटं होतींच कुठं !

—तिकडे सर्वांसह महाराज सुखरूप कोंडाण्यावर पोहोंचले. आईसाहेबांना निरोप गेला.

लाल महालांत फारच रक्तपात झाला होता. जखमी अन् मेलेल्यांची व्यवस्था खानानें लावली.

एकूण तेरा ठार, पंन्नास जखमी ! ठार झालेल्यांत खुद्द खानाचा मुलगा होता. जखमी झालेल्यांत खानाची इतर दोन मुलें होतीं. खास शाहिस्तेखानाच्या कुटुंबाची फार हानि झाली. तीन बोटं गेली ती गेलींच !

झालेल्या भयंकर प्रकारानें खानाने इतकी दहशत खाल्ली कीं त्यानें ताबडतोब पुण्याहून कूच केले व तो औरंगाबादेस चालता झाला ! लाख फौजेचा सुभा बोटं फुंकीत फुंकीत चालता झाला ! सारी मोहीम मातीत गेली !

सिदी जौहरचं आणि शाहिस्ताखानाचं महाभयंकर संकट एकदम आलं होतं. स्वराज्यानें या काळांत भारी हाल अन् कष्ट सहन केले. पण जगदंबेच्या कृपेनं महाराजांच्या हातून सारे दुष्ट दानवी रिपुदल पराभवाते पावते झाले. तो महिमा काय वर्णन करावा ? आईसाहेबांना फार कौतुक वाटलं. सर्व जग आश्चर्यानें चकीत झालं. पृथ्वी मोहित झाली. तिनं ठरविलं कीं विवाह करायचा तो शिवराजाशींच ! हाच पति योग्य आहे !

सगळीकडे आनंदी आनंद उसळला. पावसाच्या सरी कोसळूं लागल्या. सृष्टि फुला-फळांनीं नटली. शेतं भातं रसरसली, घरोघरीं आनंद मावेना. यमुनेच्या डोहातून कालिया पळून गेला. महाराजांनी कालियामर्दन केलं. गाई गुरं आनंदली. मराठ्यांचा श्रीकृष्ण यशवंत झाला.

लौकरच श्रावण आला. कृष्णाष्टमी झाली. दुसऱ्या दिवशी दही-हंड्या शिंकाळ्यावर चढल्या. साऱ्या महाराष्ट्रांतली गोंडस गोजिरी पोरं घरोघर उड्या मारीत जाऊन त्या त्या घरच्या यशोदेच्या अन् राधेच्या भोंवती नाचलीं अन् म्हणलीं,

गोविंद आला ! गोविंद आला ! दही दे, दूध दे, साय दे, लोणी दे ! दही दे, दूध दे, साय दे, लोणी दे !

लेखनसीमा

८२०३

REFBK-0008203